ग्रं. सं. ठाणें
निबंध
१५१५.

लोकसंख्येचा प्रश्न

...आपटे

REFBK-0013092

...प्रबोधन संस्था-प्रकाशन : ११

निबंध
३६६००
१५.८.६८
सं. २१
१५१५.

लोकसंख्येचा प्रश्न

ज. शं. आपटे

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६६०० वि: निबंध
क्रमांक १५१५ नों वि: २५.८.६८

समाज प्रबोधन संस्था
विद्यापीठ वाडा, १२४२, सदाशिव पेठ, पुणे २



प्रकाशक :
शंकरराव देव
अध्यक्ष, समाज प्रबोधन संस्था,
विद्यापीठ वाडा, १२४२, सदाशिव पेठ,
पुणें २.

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन.

जानेवारी, १९६३.

किंमत रु. २–००

मुद्रक :
श्री. सौ. सरस्वतीबाई मोहनी.
विकास मुद्रा-मंदिर, धरमपेठ,
नागपुर १

समाज प्रबोधन संस्था

मानवी जीवनाचा प्रवाह अखंड वाहत असल्यामुळें त्यांतील समस्या कालानुसार बदलत असतात. कांहीं समस्यांची उकल होते व विकासास अनुकूल वातावरण निर्माण होतें. परंतु या बदललेल्या परिस्थितींतून पुनः नवे प्रश्न निर्माण होतात. आणि ते सोडविण्यासाठीं नवे मार्ग शोधण्याची आवश्यकता असतें. एकोणिसाव्या शतकांत आधुनिक भारताच्या उदयास प्रारंभ झाला. जीवन सांचेबंदपणांतून बाहेर पडून प्रवाही बनूं लागलें. आणि नव्या जाणीवा निर्माण झाल्या. स्वत्वाच्या जाणिवेंतून स्वातंत्र्यलढा निर्माण झाला. आणि अत्यंत बिकट परिस्थितीशीं झुंज देऊन भारतीय जनतेनें स्वातंत्र्य मिळविलें

स्वातंत्र्योत्तर कालांत नव्या जीवनाच्या आकांक्षा वाढूं लागल्या. यांतूनच रूढिग्रस्त व मागासलेल्या भारतीय समाजाला सुजाण समृद्ध अवस्थेकडे नेण्याचा प्रयोग सुरू झाला. आज आपल्या समाजाच्या आर्थिक जीवनांत स्थैर्य व सुस्थिति आणण्यासाठीं पंचवार्षिक योजनांची आंखणी करून त्या पार पाडण्याचा प्रयत्न होत आहे. ग्रामीण जनतेंत नवचैतन्य निर्माण व्हावें यासाठीं समाज विकास योजनांचें आंदोलन उभें करण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें समाज-जीवनांत मूलगामी बदल घडवून आणण्याच्या दृष्टीनें झालेल्या भूदान आंदोलनाचेंहि महत्त्व अनन्य-साधारण आहे. नैतिक पातळीवरुन केलेल्या या आंदोलनाचें ध्येय समाजाला नवीं मूल्यें देणें व त्या मूल्यांच्या आधारें सामाजिक संबंधांत परिवर्तन घडवून आणणें हें आहे.

समाज-परिवर्तनासाठीं वरील बाह्य आंदोलनाइतकीच वैचारिक आंदोलनाचीहि जरूरी आहे. आज देशांत परिवर्तनाचे प्रयत्न अपेक्षेप्रमाणे यशस्वी होत नाहींत याचें मुख्य कारण या प्रयत्नांना विचारांचा पुरेसा आधार नाहीं. विचाराधिष्ठित प्रयत्नांतून समाज बदलतां येईल ही जाणीव समाजांतील सर्व थरांत वाढणें आवश्यक आहे.

या विचार-परिवर्तनाची प्रक्रिया सुशिक्षित वर्गांत थोड्या फार प्रमाणांत सुरू झाली आहे. पण खरी निकड आहे ती सर्व-साधारण शिक्षित समाजाला या प्रवर्तनाचें भान करून देण्याची. येथें नवी समाज-रचना रूढ होणार आहे ती मुख्यतः त्या लोकांच्या प्रयत्नांनींच. आज भौतिक विकासाच्या कार्यक्रमांत हे लोक कमी जास्त प्रमाणांत सहभागी होत आहेत. पण त्यांच्या प्रयत्नांना योग्य वळण व नवें तेज प्राप्त होण्या-साठीं त्यांच्यांत आधी विचार-परिवर्तन घडलें पाहिजे. नव्या समाज-रचनेला पायाभूत असणाऱ्या जीवन-मूल्यांची त्यांना स्पष्ट कल्पना आली पाहिजे व त्याचबरोबर समाजांतील जुने अन्याय दूर करून नव्या सुधारणा रुजविण्यासाठीं व्यावहारिक बाबतींत देखील त्यांना मार्ग-दर्शन होणें आवश्यक आहे. तालुक्याच्या गांवीं व खेडेगांवीं काम करणारे सामाजिक व राजकीय कार्य-कर्ते, प्राथमिक व दुय्यम शिक्षक, ग्रामसेवक, सरकारी व बिन सरकारी सेवकवर्ग या लोक-सेवकांच्या सेनेत हें विचार-परिवर्तन घडवून आणणें अगत्याचें आहे.

या स्वरूपाचें वैचारिक आंदोलन भारतांत अनेक थोर विचार-वंतांच्या प्रयत्नानें सुरू झालें आहे. त्या आंदोलनांत गति आणावी, व त्या दृष्टीनें होणाऱ्या विविध प्रयत्नांचें जमेल तितकें संयोजन करावें या हेतूनें 'समाज प्रबोधन संस्था' स्थापन करण्यांत आली आहे. मराठी भाषेंत छोटया पुस्तिका मुद्दाम लिहवून घेऊन प्रसिद्ध करणें, ठिकठिकाणीं व्याख्यानमाला, परिसंवाद, शिबिरें, संघटित करणें, या सारखे लोकशाही जीवनदृष्टि व सर्व-कल्याणकारी समाज-रचना यांना पोषक असे लोक-शिक्षणाचे कार्यक्रम हातीं घेणें हें या संस्थेचें उद्दिष्ट आहे. नव्या जीवन-मूल्यांची ओळख करून देणें, सामाजिक व वैयक्तिक जीवनांतील प्रश्न सोडविण्यासाठीं विज्ञान-निष्ठ मानवतावादी विचार-पद्धतीचा प्रसार करणें; यासाठीं तत्त्वचर्चे-बरोबरच भारतीय व महाराष्ट्रीय समाजापुढील आजच्या प्रश्नांची वस्तुनिष्ठ भूमिकेवरून चर्चा करून ते सोडविण्यासाठीं जनतेस कार्यप्रवण करणें, यासाठीं ही संस्था प्रयत्न करील.

साधना केंद्र
राजघाट, काशी

—शंकरराव देव

प्रस्तावना

भारतीय जनतेचें जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न सध्यां चालू आहे. त्यासाठीं उद्योगधंद्यांची स्थापना व उत्पादनवाढ हे कार्यक्रम जितके महत्त्वाचे आहेत, तितकेंच लोकसंख्येची वाढ नियंत्रित करणें हेंहि आवश्यक आहे. नाहीं तर उत्पादन थोडें थोडें वाढूनहि प्रत्येकाच्या वांटचाला येणारें धनधान्य कमीकमी होत जाईल. उत्पादनवाढीचे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठीं कुशल, कार्यक्षम व दमदार श्रमशक्तीचा पुरवठा व्हायला हवा. त्यासाठीं लोकसंख्येचा कस वाढविला पाहिजे. आणि कुटुंबाचें स्वास्थ्य टिकावें, स्त्रीच्या शरीरप्रकृतीवर फाजील ताण पडूं नये, तिच्या वैयक्तिक गुणविकासाला सवड मिळावी याहिसाठीं कुटुंब-नियोजनाची गरज आहे.

लोकसंख्येच्या प्रश्नाचें हें व्यापक स्वरूप लोकांना जितकें अधिक समजेल तितकी त्याची सोडवणूक अधिक सोपी होणार आहे. ग्रामीण विभागांत तर या प्रश्नावर फार मोठी जागृति होण्याची गरज आहे. त्या दृष्टीनें प्रस्तुतचें पुस्तक प्रसिद्ध करतांना एक कर्तव्य तत्परतेनें पार पाडल्याचा आम्हाला आनंद होत आहे.

श्री. ज. शं. आपटे यांनी १९६१ च्या जनगणनेच्या आंकडेवारीवर आपलें विवेचन आधारून हें पुस्तक तयार केलें आहे. ती आंकडेवारी मिळायला उशीर झाला, तरी त्यानंतर अगदीं अल्पावधींत श्री. आपटे यांनीं हें काम पूर्ण करून दिलें याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

या पुस्तकाच्या हस्तलिखिताचें वाचन-शिबिर बार्शी (जि. सोलापूर) येथील श्री. शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयांत झालें. शिबिर यशस्वी करण्याच्या कामीं प्रा. सी. बी. शितोळे, श्री. के. ना. देशपांडे व विद्यार्थीवर्ग यांचें बहुमोल सहकार्य मिळालें. याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळानें १९६२-६३ साला-साठीं या संस्थेस दिलेल्या रु. ३०००/-च्या अनुदानाचाही या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ उपयोग झाला हें आम्ही कृतज्ञतापूर्वक नमूद करूं इच्छितों.

पुणें,
दि. २६ जानेवारी १९६३

—प्रकाशक

लेखकाचें निवेदन

आपल्या देशावर चीनने आक्रमण केल्यामुळें एक गंभीर परिस्थिति निर्माण झाली आहे. देशावर परचक्राचें संकट आलेलें असतांना कुटुंब-नियोजनकार्याची आवश्यकता कशाला अशा स्वरूपाचा प्रश्न सर्वसामान्य माणसाच्या मनांत निर्माण होणें स्वाभाविक आहे. आघाडीवर अधिक सैन्याची जरूरी असतांना लोकसंख्यावाढीचा प्रश्नच राहत नाही, असेंहि मनांत येतें. पण आजच्या काळांतील युद्धाचें यशापयश कमी वा जास्त लोकसंख्येवर अवलंबून नाहीं.

कोणत्याहि देशाच्या आर्थिक विकासांत लोकसंख्येच्या गुणात्मक (Qualitative) व संख्यात्मक (Quantitative) अंगास महत्त्वाचें स्थान आहे. आपल्यासारख्या अर्धविकसित देशांत तर लोकसंख्येच्या प्रश्नास निर्णायक (Decisive) स्वरूप प्राप्त झालें आहे. या प्रश्नाची तीव्रता व गांभीर्य कमी करण्याचा कुटुंबनियोजनासारखा अन्य प्रभावी मार्ग नाही. कुटुंबनियोजनाचा प्रचार स्वातंत्र्यपूर्व काळांत कै. र. धों. कर्वे प्रभृतींनी अत्यंत तळमळीनें व बुद्धिवादी दृष्टीनें करून या कामासाठीं एक वैचारिक पार्श्वभूमि तयार केली. स्वातंत्र्योत्तर काळांत या कार्यास अधिकच वेग मिळून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत कुटुंबनियोजन कार्यक्रम हा महत्त्वाचा (Key Programme) मानला गेला आहे. हा कार्यक्रम जनतेपर्यंत पोंहोचविण्यासाठीं पद्धतशीर व संघटित प्रयत्नांची आवश्यकता आहे. जो कांही थोडासा प्रचार झाला आहे तो सरकारी यंत्रणेमार्फत व या क्षेत्रांतील खासगी संस्थांच्या प्रयत्नांनी दुर्दैवाने या कार्याबाबत राजकीय पक्ष व समाज कार्यकर्ते यांनी विशेष उत्साह व आत्मीयता दाखविली नाहीं. या कामाबाबत युवक संघटना, कामगार संघटना, महिलासंस्था यांना मोठी कामगिरी बजावतां येईल. लोकशाही विकेंद्रीकरणामुळें ग्रामपंचायती, तालुका समिति, जिल्हा परिषदा यांनाहि या कामांतील वांटा उचलावयाचा आहे. तालुक्याच्या पातळीवर काम करणारे शिक्षक, समाजसेवक व अन्य कार्यकर्ते यांचेसाठींच समाज प्रबोधन संस्थेच्या

उद्दिष्टानुसार प्रस्तुत पुस्तकाचा प्रपंच मांडला आहे. लोकसंख्या प्रश्नाचें स्वरूप सोप्या भाषेंत समजावून देण्याचा हा प्रयत्न आहे. हा प्रयत्न कितपत यशस्वी झाला आहे हें वाचकांनींच ठरवावें.

प्रस्तुत पुस्तक लिहिण्याची संधि दिल्याबद्दल समाज प्रबोधन संस्था व संस्थेचे सेक्रेटरी श्री. पन्नालाल सुराणा यांचा मी आभारी आहें. पुस्तकाचें हस्तलिखित तयार करतांना श्री. सुराणा यांच्याबरोबर अनेक वेळा चर्चा झाली. पुस्तकांतील विवेचन, मांडणी व प्रतिपादन सोपें व स्पष्ट होण्यास त्याचा फार उपयोग झाला. जनगणनेच्या अहवालावरून तक्ते करण्याच्या कामींहि श्री. सुराणांचें खूप साह्य झालें. पुस्तक लिहिण्यास परवानगी दिल्याबद्दल भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालयांतील कुटुंबनियोजन विभागाचे संचालक लेफ्टनंट कर्नल रैना ह्यांचे आभार मानणें अगत्याचें आहे.

परिवार आयोजन प्रशिक्षण संशोधन केंद्राच्या (फॅमिली प्लॅनिंग ट्रेनिंग अँड रिसर्च सेंटर) प्रमुख डॉ. सौ. सुशीलाबाई गोरे ह्यांच्या प्रोत्साहनामुळें मी हें पुस्तक लिहूं शकलों. हस्तलिखित वाचून त्यांनीं कांही मोलाच्या सूचना दिल्या त्याबद्दल त्यांचें ऋण मानणें माझें कर्तव्य आहे.

संस्थेच्या योजनेनुसार हस्तलिखिताच्या वाचनाचा कार्यक्रम बार्शी येथील ट्रेनिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोर झाला. ह्या कार्यक्रमामुळें विद्यार्थ्यांनी कांही महत्त्वाच्या सूचना केल्या. त्यांचा उपयोग मला करतां आला.

मुंबई
१४-१-१९६३

—ज. शं. आपटे

अनुक्रमणिका

—:○:—

		पृष्ठ
१	अर्थव्यवस्था व मानवी जीवन	१
२	लोकसंख्येच्या प्रश्नाचें स्वरूप	७
३	आपल्या लोकसंख्या–प्रश्नाचीं वैशिष्ट्यें	१९
४	परिवार नियोजनाची गरज	३६
५	कुटुंबनियोजनाची पार्श्वभूमि	४९
६	स्वातंत्र्योत्तर काळांतील प्रयत्न	५६
७	प्रश्नोत्तरें	६६
	परिशिष्टांची यादी	७१
	संदर्भ ग्रंथ	७२
	परिशिष्टें १ ते ८.	

अनुक्रम ३९९०० वि: निबंध
वाक १५२५ १५-९-८४

१ : अर्थव्यवस्था व मानवी जीवन

मानवी जीवनाच्या तीन मूलभूत गरजा म्हणजे अन्न, वस्त्र व निवारा या होत. माणसाच्या या तीन गरजा अनादिकाळापासून आहेत. फक्त त्या गरजांचें स्वरूप आज बदललें आहे. 'अन्नं ब्रह्म' हें आपल्या वेदांत सांगितलें आहे. अन्नाशिवाय माणूस जगूं शकत नाहीं. हवा, पाणी, यांच्या जोडीस अन्नाचीहि गरज आहे. अगदीं पुरातन काळीं ही गरज माणूस कंदमुळें खाऊन भागवीत असे, वल्कलें नेसून तो शरीराचें थंडी-वाऱ्यापासून रक्षण करी. आसरा म्हणजे रानावनांतील लाकूडगवतांपासून बनविलेली झोपडी. पण ही परिस्थिति सतत कायमची कशी राहणार ? काळ बदलत आहे, नवनवे वैज्ञानिक शोध लागत आहेत, सुधारणा होत आहेत, जग पुढे जात आहे.

पूर्वीचें जीवन

पूर्वी माणूस जनावरांची शिकार करून आपली भूक भागवीत असे. जंगलांत, पर्वतावर राहणाऱ्या लोकांचा शिकार हा मुख्य व्यवसाय होता. कांही काळानंतर माणूस जमिनीची मशागत करूं लागला. जमिनींतून तो कडधान्यें, भाजीपाला पिकवूं लागला. ओसाड, उपयोगांत न आलेली जमीन शेतकऱ्यांच्या श्रमानें, कष्टानें जीवनदायी ठरली. लाखों लोक खेड्यांत राहून शेती करूं लागले. शेतीला जोडून कांहीं घरगुती धंदेहि फावल्या वेळांत सुरू झाले. वर्षांतील आठ महिने काम करणारा शेतकरी उरलेल्या चार महिन्यांत विणकाम, वस्त्रोत्पादन आणि छोटे धंदे घर-बसल्या करूं लागला. खेड्यांतील लोकांना आसऱ्याची कधींच चिंता वाटली नव्हती. त्यामुळें घरटंचाईचा प्रश्न खेड्यांत फारसा कधींच जाणवत नव्हता. म्हणून माणसाच्या तीन मुख्य गरजांच्या दृष्टीनें पूर्वीचें जीवन कितीतरी सुखी, स्वास्थ्यपूर्ण व समाधानी होतें.

पण हें साधें, समाधानी, स्वास्थ्यपूर्ण जीवन फार काळ टिकूं शकलें नाही. मानवी गरजा भागविण्यासाठीं उत्पादनतंत्रांत बदल झाला. कारण मानवी गरजांचें स्वरूप बदललें. त्यांत विविधता आली. नवीनता निर्माण

झाली. आणि ही विविधता व नवीनता पुरवावी यासाठीं उत्पादनाच्या नव्या पद्धती अंमलांत आल्या.

उत्पादन व उपभोक्ता वर्ग

उत्पादन व उपभोक्ता वर्ग यांचें नातें परस्परावलंबी आहे. एखाद्या गोष्टीचें उत्पादन झालें कीं त्याचा उपभोक्ता वर्गहि तयार होत असतो. त्या वर्गास नवी न गोष्टी हव्याशा वाटल्या, नवीन गरजा भागवाव्याशा वाटल्या कीं त्यांचें उत्पादन होऊं लागतें. उत्पादनाचा हेतु मानवी गरजांची पूर्ती हा आहे. उत्पादित वस्तु माणसानें उपयोगांत आणल्या, त्यांचा उपभोग घेतला कीं उत्पादनाचें कार्य सफल झालें असें म्हणावयास हरकत नाहीं. उपभोक्ता वर्गाचें प्रमाण किती याच्या आधारानेंच उत्पादन व्हावयास हवें. पण असें होऊं शकत नाहीं. कारण कांहीं वेळीं भरपूर उत्पादन व त्यामानानें खूपच कमी असा उपभोक्ता वर्ग असतो तर कांहीं ठिकाणीं अगदीं कमी उत्पादन व मोठचा संख्येचा उपभोक्ता वर्ग असतो. कांहीं पाश्चिमात्य देशांत अति उत्पादन झाल्यामुळें कांहींसा भाग (उत्पादनाचा) टाकून द्यावा लागतो. म्हणजे उत्पादनाच्या मानानें उपभोक्ता वर्ग नसतो. याच्या उलट आपल्या देशाचें उदाहरण आहे. अनेक जीवनावश्यक वस्तूंचें, धान्याचें पुरेसें उत्पादन आपल्या देशांत होऊं शकत नाहीं. कोटचवधि लोकसंख्येला पुरें पडणारें अन्नधान्य, इतर जीवनावश्यक वस्तु, आपल्या देशांत आपण निर्माण करूं शकलों नाहीं. त्यामुळें उत्पादन, उपभोक्ता वर्ग यांचें नातें बिघडलें आहे.

उत्पादनाचे घटक

हें नातें बिघडलें कसें हें समजावें म्हणून आपल्याला मानवी जीवन व अर्थव्यवस्था यांचा विचार केला पाहिजे. 'अर्थस्य पुरुषो दासः' हें संस्कृत वचन लौकिक अर्थानें खरें आहे. सारीं सोंगें करतां येतात, पण पैशाचें सोंग करतां येत नाहीं असें आपण नेहमींच्या व्यवहारांत म्हणतों. त्यांतील अर्थ हाच आहे कीं पैशावाचून कांहीं चालत नाहीं. कारण सारे मानवी व्यवहार व जीवन पैशामुळें होणाऱ्या देवाण–घेवाणीवरच अवलंबून आहे. पैसा हें माध्यम आहे, साधन आहे, साध्य नव्हे. साध्य

आहे सर्वांना किमान मानवी गरजा भागवितां याव्या अशी परिस्थिति निर्माण करण्याचें. उदिष्ट आहे सर्वांना जगण्यासाठीं अन्न, वस्त्र, निवारा मिळून सुखासमाधानाचें जीवन कंठतां यावें हें. मानवी जीवनाचा गाडा सुरळीत चालावा म्हणून उपभोग्य वस्तूंचें उत्पादन आवश्यक आहे हें आपण वर पाहिलेंच. अर्थव्यवस्थेंत उत्पादन पद्धतशीर व्हावें म्हणून जमीन, श्रमशक्ति, भांडवल व संघटन हे चार मूलभूत घटक मानले गेले आहेत. ह्या चार घटकांचा व लोकसंख्येचा अन्योन्य संबंध काय आहे ह्याचा विचार करूं.

जमीन

खेड्यांत असें मानलें जातें कीं जमीन म्हणजे शेतजमीन. पण येथे 'जमीन' हा शब्द एकूण जमीन व नैसर्गिक साधनसामग्री या अर्थानें वापरला आहे. त्यांत शेतीची जमीन,–पडिक व लागवडी खालील–डोंगर, पर्वत यांनीं व्यापलेली जागा, व जंगलें, खनिज पदार्थ, समुद्र, या सर्वांचा अंतर्भाव होतो. उत्पादनांतील सर्वांत महत्त्वाचा घटक नैसर्गिक साधन-सामग्री हाच आहे. हा घटक नसेल तर उत्पादन अजिबात होऊं शकणार नाहीं, कारण उत्पादनाचा आधारच मुळीं जमीन आहे. सर्व उद्योग, सर्व कारखाने व गिरण्या आणि अन्य उत्पादक व्यवसाय व धंदे हे जमिनीवरच उभारले जातात. त्याच अर्थानें निर्माण झालेल्या प्रजेला वा प्रजागटास––लोकसंख्येस ह्या पृथ्वीवर जगायचें असेल, नव्हे नुसतें जरी रहावयाचें असेल तर कोणत्या तरी जमिनीचा आसरा हा हवाच. 'जमीन' ह्या घटकामुळेंच झोंपड्या, वाडे, घरें, बंगले हे बांधले जातात. जागेची किंमत शहरांप्रमाणें खेड्यांतहि आहे.

श्रमशक्ति

श्रमशक्ति हा उत्पादनाचा जमिनीइतकाच महत्त्वाचा व प्राथमिक स्वरूपाचा घटक आहे. निसर्गसंपत्तीवर कांही तरी क्रियाप्रतिक्रिया केल्याशिवाय तिचा मानवी गरजा भागविण्यासाठीं उपयोग होऊं शकत नाहीं. या क्रियाप्रतिक्रिया करण्यासाठीं श्रमशक्ति लागते. अगदीं सुरवातीला शेतीसाठीं जमीन भुसभुशीत करायचें काम करायला हातांची जरुरी

भासली. पुढे त्या हातांच्या मदतीला कुदळ, नांगर, ट्रॅक्टर वगैरे साधनें आलीं. तरी हातांचें काम राहतेंच. तंत्रविद्येचा कितीहि विकास झाला तरी उत्पादनासाठी श्रमशक्ति लागणारच, तिचें प्रमाण कमी जास्त होईल एवढेंच.

ही श्रमशक्ति लोकसंख्येंतून मिळते. साधारणपणें १५ ते ५९ या वयगटांतील माणसें श्रम करूं शकतात. म्हणून एखाद्या समाजांतील श्रमशक्तीचा पुरवठा किती याचें उत्तर त्या समाजांत १५ ते ५९ या वयगटांतील लोकसंख्या किती हें आहे. याचा एक अर्थ असा कीं केवळ मोठी लोकसंख्या असली म्हणजे श्रमशक्तीचा पुरवठाहि मोठा असेलच असें नाहीं. लोकसंख्या मोठी असूनहि जर बालमृत्यूचें प्रमाण जास्त असल्यामुळें किंवा सरासरी आयुर्मान कमी असल्यानें १५ ते ५९ या वयगटांतील लोकसंख्या प्रमाणापेक्षा कमी असेल तर त्या समाजांत श्रमशक्तीचा पुरवठा लोकसंख्येच्या मानानें कमी आहे असें म्हणावें लागेल.

भांडवल

भांडवल हा उत्पादनाचा तिसरा घटक. भांडवल नसेल तर उत्पादन होऊंच शकणार नाहीं असें नाहीं. नदींतील मासे कांहीं जण हातानें पकडूं शकतात. म्हणजे नैसर्गिक साधनसामग्री व श्रमशक्ति यांच्यामुळें तें उत्पादन साध्य झालें. पण उत्पादन मोठ्या प्रमाणावर, चांगलें, विविध वस्तूंचें व हुकमी करायचें असेल तर भांडवलाची गरज वाढत्या प्रमाणांत भासते. भांडवल म्हणजे उत्पादनाला साह्यभूत होणाऱ्या वस्तू. यांत यंत्रसामग्री वगैरे गोष्टी आल्या. या गोष्टी विकत घेण्यासाठी पैसा लागतो. पण केवळ पैसा म्हणजे भांडवल नव्हें. भांडवली वस्तु हें खरें भांडवल. त्या निर्माण करण्यासाठी चालू उत्पादनांतून बचत करावी लागते. ही बचत योग्यप्रकारें गुंतवली म्हणजे तें भांडवल झालें. श्रमशक्तीचें देखील भांडवलांत रूपांतर मोठ्या प्रमाणावर करणें शक्य आहे.

संघटन

जमीन, श्रमशक्ति, भांडवल याचेबरोबर उत्पादनाची व्यवस्थाहि महत्त्वाची आहे. उत्पादन सुरू करण्याचा निर्णय कोणी तरी घ्यावा लागतो.

असा निर्णय घेण्यांत धोका असतो. नफा होईल किंवा कदाचित नुकसानहि होईल. पण कुणीतरी ही जोखीम उचलावी लागते. नंतर वेगवेगळ्या साधनांची जमवाजमव करावी लागते, व्यवस्था करावी लागते. तरच उत्पादन सुरू होऊं शकतें. कोणतीहि गोष्ट नीटपणें पार पाडावयाची असेल तर प्रथमपासून कामांत एक प्रकारची शिस्त, सुसूत्रता, नियम असावे लागतात. उद्योगधंदा–कारखाना वा गिरणी–उत्पादन यांचे बाबतींत तर व्यवस्थेची अत्यंत जरूरी आहे. जमीन, श्रमशक्ति व भांडवल यांच्यांत योग्य तो मेळ व संबंध आणून अधिकाधिक उत्पादन होईल अशी परिस्थिति निर्माण करण्याचें काम व्यवस्थापकांना करायचें असतें. म्हणजे योग्य तें भांडवल, श्रमशक्ति वापरून एखाद्या गोष्टीचें वाजवी खर्चांत जास्तींत जास्त उत्पादन होऊं शकतें.

लोकसंख्या व उत्पादन

म्हणजे लोकसंख्येचा व उत्पादनाचा दोनतीन प्रकारांनीं संबंध येतो. लोकसंख्येमुळे श्रमशक्ति हा घटक पुरविला जातो. तसेंच संघटनेसाठी आवश्यक असणारा नेतृत्वगुणहि लोकसंख्येंतूनच येतो. उत्पादनाला पोषक असे हे लोकसंख्येचे गुणविशेष झाले. पण लोकसंख्या हीच शेवटी त्या उत्पादनाची उपभोक्ती असते. आणि लोकसंख्येचें जीवनमान सुखावह ठेवणें ही उत्पादनाकडून अपेक्षा असते. अशावेळीं जर लोकसंख्या मर्यादेपलिकडे वाढत राहिली तर जीवनमान वाढणें कठीण होऊन बसतें.

उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या घटकांचा पुरवठा मर्यादित असतो. त्यामुळें उत्पादनवाढीवर मर्यादा पडतात. पण ज्यासाठीं उत्पादन करावयाचें ती लोकसंख्या मात्र वेगळ्या गतीनें, निराळ्या वेगानें वाढत असते. वाढत्या लोकसंख्येस अन्नधान्य पुरविणें आवश्यक असतें. पण धान्याचें उत्पादन कमी असल्यामुळें सर्व लोकांना पुरेसें अन्न व इतर जीवनावश्यक गोष्टी पुरविणें शक्य होत नाहीं. म्हणून लोकसंख्या व उत्पादन यांचें वेगळें नातें निर्माण होतें, त्यांच्यांत समतोलपणा रहात नाहीं. सर्वांच्या किमान गरजा पुरविण्याच्या आग्रहांतून हा समतोल ठेवण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. अन्न, वस्त्र, आसरा, आरोग्य व शिक्षण या पांच

मूलभूत मानवी गरजा सर्वांच्या चांगल्याप्रकारें भागवितां आल्या पाहिजेत. लोकसंख्या व उत्पादन यांच्यांत समतोल साधला तर अन्न, वस्त्र व आसरा याबाबतींतहि समतोल साधला जाईल. जेव्हां तो समतोल साधला जात नाहीं तेव्हां अन्न, वस्त्र, आसरा यापैकीं कांहीं गरजा, कांहीं प्रमाणांत, कांहीं लोकांच्या अपुऱ्या राहतात, संपूर्ण भागल्या जात नाहींत. मग दारिद्र्य, बेकारी, दैन्य ठाण मांडतात व त्यामुळें कांहीं अनिष्ट प्रवृत्ति उत्पन्न होण्यास मदत होते. लोकसंख्या व उत्पादन यांचेमधील समतोल कसा बिघडतो, कोणती परिस्थिति कारणीभूत होते याचें विवेचन पुढील प्रकरणांत पाहूं.

* * *

मनुक्रम ३६६०२ वि: निबंध
अनुक्रम १५१५ ने. दि. २५-६-५८

२ : : लोकसंख्येच्या प्रश्नाचें स्वरूप

माल्थसचा सिद्धान्त

लोकसंख्या व उत्पादन यामधील समतोल कसा बिघडतो याचा विचार सर्वांत प्रथम, थॉमस माल्थस या अर्थशास्त्रज्ञानें केला. माल्थसनें आपला सिद्धांत १७९८ सालीं एका पुस्तकाद्वारें मांडला. त्याचें म्हणणें असें कीं अन्नधान्याचें उत्पादन गणितश्रेणीनें वाढतें, तर लोकसंख्या ही भूमिति श्रेणीनें. उदाहरणार्थ, एका वर्षीच्या अन्नधान्याचें उत्पादन १ मण असेल तर त्याची वाढ पुढील वर्षांत २ मण, त्याच्यापुढील वर्षांत ३ मण, त्याच्यापुढील वर्षांत ४ मण, अशा प्रकारें होत असते व लोकसंख्या जर १ असेल तिची वाढ १ चे २, २ चे ४, ४ चे १६ अशा प्रमाणांत होते. म्हणजे लोकसंख्येची वाढ ही अन्नधान्याच्या वाढीपेक्षां कितीतरी पटीनें जास्त आहे. माल्थसच्या सिद्धांताप्रमाणें प्रजोत्पादन हें अन्नधान्योत्पादनापेक्षां खूपच अधिक वेगानें वाढतें. म्हणजे कामवासना ही अधिक प्रबळ आहे. तिच्याशीं मानवी नाजूक भावनांचा संबंध असल्यामुळें लोकसंख्यावाढीची निश्चित गति वा वेग ठरविणें, रोखणें किंवा तिचा अंदाज करणें कठीण आहे. धान्योत्पादनास मात्र बरीच मर्यादा आहे. सुधारलेलें बियाणें वापरून व इतर वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करूनहि शेवटीं उत्पादनास एक निर्बंध पडतो. त्यामुळें धान्योत्पादनाच्या वाढीचा वेग हा लोकसंख्यावाढीशीं बरोबरी करूं शकत नाहीं. म्हणूनच उत्पादन व लोकसंख्या यामधील समतोल राहत नाहीं, दोहोंचा मेळ बसत नाहीं, दोघांची जुळणी होत नाहीं. धान्यउत्पादनाप्रमाणें इतर उत्पादनाचेंहि होतें. त्यामुळें एकीकडे लोकसंख्या भरमसाट वाढत राहते, आणि तिच्या गरजा भागविण्यासाठी आवश्यक असलेलें उत्पादन मात्र फार मागे पडतें. अशी ही विषम शर्यत सुरू होते.

विषम शर्यत

ही विषम शर्यत सारखी चालूं आहे. त्यामुळें लोकसंख्या खूप वाढणें

व उत्पादन कमी पडल्यानें पेंचप्रसंग निर्माण होणें असें वारंवार घडत आलें आहे. अशा पेंचप्रसंगावर निसर्गानें वेळोवेळीं क्रूर उपाययोजना केली. दुष्काळ, रोगराई व लढाई या मार्गांनीं निसर्ग लोकसंख्या कमी करीत असे. त्यामुळें मृत्यूचें प्रमाण वाढलें. रोगराई आली कीं मोठ्या संख्येनें माणसें जगाचा निरोप घेत. लढाई झाली कीं दोन्ही पक्षांचे असंख्य लोक मृत्युमुखीं पडत. वरुणराजानें दगा देऊन अन्नधान्योत्पादन कमी झालें, दुष्काळ पडला, अन्न पुरेनासें झालें कीं माणसें भुकेनें तडफडून आयुष्य संपवीत. एखाद्या विशिष्ट प्रदेशांत, भूभागांत वाजवीपेक्षां जास्त लोकसंख्या वाढली कीं लोक दुसऱ्या भूप्रदेशांत स्थलांतर करीत. स्थलांतर प्रथम प्रथम सहज होई. पण पुढें जागेवरून, प्रदेशावरून तंटे, बखेडे व लढाया सहज होऊं लागल्या.

अपुरें उत्पादन व भरमसाट लोकसंख्या या समस्येवर निसर्गाकडून ही जी उपाययोजना केली जाते ती क्रूर आहे. माणसें आधी जन्माला येऊं द्यायचीं, आणि मग तीं अशा कारणांनीं मोठ्या प्रमाणावर मरूं द्यायचीं हें योग्य नव्हे. म्हणून माल्थसनें असें सुचविलें की असा पेंचप्रसंग निर्माण होऊं नये म्हणून कमीच माणसें जन्माला येऊं द्यावींत. जननसंख्येवर नियंत्रण घालावें. त्यासाठीं तरुण मंडळींनीं उशिरा लग्नें करावींत अशी सूचना त्यानें केली.

माल्थसचें हें म्हणणें त्या काळांत कोणाला पटलें नाहीं. जन्ममृत्यु निसर्गाच्या स्वाधीन असलेल्या गोष्टी आहेत, त्यांत माणसानें ढवळाढवळ करूं नये असें मत धार्मिक वृत्तीची मंडळी मांडीत. याचवेळीं योगायोगानें इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीचें युग सुरू झालें. विज्ञानाच्या साह्याने सर्व प्रकारचें उत्पादन फार मोठ्या प्रमाणावर वाढवितां येऊं लागलें. तेव्हा उत्पादन हें गणितश्रेणीनें वाढतें हें माल्थसचें म्हणणें व्यवहारांत चूक ठरलें असें अनेकांना वाटूं लागलें. व त्यामुळें माल्थसचा सिद्धान्त त्यावेळीं समाजाला पटला नाहीं.

अगदी कांटेकोरपणें पाहिलें तर माल्थसचा सिद्धान्त जसाच्या तसा स्वीकारतां येणार नाहीं हें उघड आहे. तरीपण इतर वस्तूंच्या उत्पादनाला

शेवटीं मर्यादा पडणार व लोकसंख्या मात्र वाटेल तेवढी वाढूं शकेल एवढी गोष्ट मान्य करावी लागेल.

जीवनमानाची कल्पना

माल्थसचा सिद्धान्त मान्य झाला नाहीं तरी त्यामुळें लोकसंख्येच्या प्रश्नावरील विचाराला चालना मिळाली. लोकसंख्या व उत्पादन यांचा ताळमेळ बसला पाहिजे ही गोष्ट मान्य होऊं लागली. माणसाला अनेक गरजा असतात. त्या चांगल्या रीतीनें भागविल्या जाव्यात अशी प्रत्येकाची इच्छा असते. हळूहळू जास्त जास्त सुखसोयी मिळाव्यात, म्हणजे इतर सांस्कृतिक छंदांची आवड भागवितां येते. यामुळें आपलें जीवनमान शक्य तेवढें उंच होत जावें असें प्रत्येकाला वाटूं लागतें. पण जीवनमान हें शेवटीं उत्पन्नावर अवलंबून असतें. उत्पन्न मर्यादित असेल तर जीवन-मानहि खालचें राहणार. त्यांतच त्या उत्पन्नाच्या वांटेकऱ्यांची संख्या वाढली म्हणजे सगळ्यांचेंच जीवनमान आणखी घसरत जाणार. एका कुटुंबांत दोन माणसें आहेत. व त्यांचें उत्पन्न शंभर रुपये आहे. त्यामुळें त्यांना बऱ्यापैकी घर भाड्यानें घेतां येतें. दूध चहावर खर्च करतां येतो. एखादें वर्तमानपत्र घेतां येतें. पण जर त्या कुटुंबांत आणखी एकाची भर पडली, आणि उत्पन्न मात्र शंभर रुपयेच राहिलें तर मग कांही गोष्टींना कात्री लावावी लागते. वर्तमानपत्र घेणें बंद करावें लागतें. म्हणजेच पर्यायानें सगळ्यांचें जीवनमान खालावतें.

जी गोष्ट कुटुंबाची, तीच समाजाची. समाजाचें उत्पादन वाढण्याला मर्यादा असतात. आणि लोकसंख्या जर सारखी वाढत राहिली तर मग समाजाचें सरासरी जीवनमान खालावत जातें. तेव्हा जीवनमान घसरणार नाहीं, शक्य तितकें वाढत जाईल, अशा दृष्टीनें लोकसंख्येच्या प्रश्नाचाहि विचार झाला पाहिजे ही गोष्ट सर्वांना पटूं लागली.

लोकसंख्या कमी कीं जास्त ?

एखाद्या प्रदेशाची लोकसंख्या कमी आहे कीं जास्त आहे हें अनेक गोष्टींचा विचार करून ठरवावें लागतें. लोकसंख्या मोजण्याची सोपी पद्धत म्हणजे एखाद्या प्रदेशांत दर चौरस मैलांत किती लोकसंख्या राहते

हें पाहणें. एकूण लोकसंख्येला त्या प्रदेशाच्या एकूण क्षेत्रफळानें (चौरस मैलांत) भागलें म्हणजे सरासरी दर चौरस मैली लोकसंख्या किती हें समजतें. यालाच लोकसंख्येची **घनता** असें म्हणतात. १९६१ च्या शिरगणतीप्रमाणें भारताची घनता ३८४ आहे, तर अमेरिकेची ५६ व जपानची ५८१ आहे.

पण एखाद्या देशाच्या लोकसंख्येची घनता इतर देशांच्या तुलनेनें कमी आहे कीं जास्त आहे एवढें पाहून भागत नाहीं. जपानच्या मानानें भारताची घनता कमी आहे. पण म्हणून भारताची लोकसंख्या कमी आहे, किंवा भारतांत लोकसंख्येचा प्रश्न विकट बनलेला नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. लोकसंख्या कमी कीं जास्त हें त्या प्रदेशाची किंवा देशाची उत्पादनक्षमता किती आहे, हें पाहून ठरवावें लागतें. एखाद्या वैराण प्रदेशांत दर चौरस मैलांत पांच माणसें राहात असलीं तरी जर तेथें कांहींच उत्पादन होणें शक्य नसेल तर ती लोकसंख्यादेखील जास्त आहे असें म्हणावें लागेल. नैसर्गिक साधनसामग्री, इतर उत्पादनसाधनें व तंत्रविज्ञानाची प्रगति या गोष्टी त्या देशांत किती प्रमाणांत आहेत हें पहावें लागतें. जेवढे लोक काम करायला समर्थ आहेत व तयार आहेत त्या सगळ्यांना पुरेसा रोजगार देण्याची शक्यता त्या उत्पादनसाधनांमुळे असली तर मग त्या देशांतील लोकसंख्या पुरेशी आहे असें म्हणतां येईल. देशांत बेकारीचें प्रमाण जास्त असेल, व ती लवकर दूर करतां येण्याची शक्यता नसेल तर मग लोकसंख्या जास्त आहे असें म्हणावें लागेल रोजगारीप्रमाणेंच दरडोई उत्पन्न किती पडतें हेंहि पहायला हवें.

संख्या व प्रवृत्ति

लोकसंख्या एका विशिष्ट क्षणीं किती आहे, कमी आहे कीं जास्त, हें ठरवितांना वरील गोष्टींचा विचार करावा लागतो. पण केवळ त्या क्षणीं लोकसंख्या कमी कीं जास्त एवढें पाहून भागत नाही. लोकसंख्या वाढत आहे कीं घटते आहे हेंहि पहावें लागतें. यालाच लोकसंख्येची 'प्रवृत्ति' असें म्हणतात. एका वर्षीं लोकसंख्या १०० आहे. पुढील वर्षीं ११० व त्याच्या पुढील वर्षीं १२१ अशी झाली तर लोकसंख्या वाढती आहे--किंवा

लोकसंख्येची प्रवृत्ति वाढण्याची आहे असें म्हणावें लागेल. जर शंभरची शंभरच राहत असेल तर प्रवृत्ति स्थिर आहे, व शंभरची नव्वद, नव्वदची एकोणऐंशीं होत असेल तर ती घटती आहे असें म्हणावें लागेल.

लोकसंख्येची प्रवृत्ति वाढती असेल तर ती समस्या आहे, त्यामुळे जीवनमान घसरण्याची भीति आहे असें सध्या म्हटलें जातें. भारताबाबत तें खरें आहे. पण नेहमीं तसेंच असतें असें नाहीं. अठराव्या व एकोणिसाव्या शतकांत अमेरिकेंत नवानवा प्रदेश वसाहतीखालीं येत होता. त्यावेळीं लोकसंख्या वाढती असणें फायद्याचें ठरलें. पण जेव्हा उत्पादनसाधनांचा विकास थांबलेला असतो, तेव्हा वाढती लोकसंख्या ही एक समस्या होऊन बसते. एखाद्या विशिष्ट देशानें लोकसंख्येबाबत काय धोरण ठेवावें, ती वाढूं द्यावी कीं देऊं नये, याचा निर्णय करण्यापूर्वी अनेक गोष्टी विचारांत घ्याव्या लागतात. त्या देशाजवळ नैसर्गिक साधनसामग्री किती आहे, त्या सामग्रीचा चांगल्या प्रकारें उपयोग करतां यावा यासाठी आवश्यक असलेलें तंत्रज्ञान व साहित्य किती आहे, भांडवलनिर्मितीचा वेग काय आहे, या सर्व गोष्टींचा विचार करावा लागतो. साधारणपणें सर्वांचें जीवनमान चांगल्या प्रकारचें ठेवतां येईल, आज जीवनमान निकृष्ट असलें तर तें जलद गतीनें वाढवितां येईल, अशी कांही सोय करणें हें कोणत्याहि देशाचें प्रथम कर्तव्य होय. तें साधण्यासाठीं लोकसंख्या वाढती हवी, स्थिर हवी की घटती हवी हें पाहून त्याप्रमाणें धोरण ठरवायला हवें. भारताला सध्या तरी वाढती लोकसंख्या नको आहे. लोकसंख्येची वाढ कमी व्हावी असें धोरण आंखणें आवश्यक झालें आहे.

लोकसंख्यावाढीच्या प्रश्नाबरोबरच आपल्या देशासारख्या अर्धविकसित देशांत अज्ञान, निरक्षरता, रूढींचें प्राबल्य आदि गोष्टी पहावयास मिळतात. ८२% लोक खेड्यांत रहात असल्यामुळें शेती हाच मुख्य व्यवसाय झाला आहे. परंपरागत चालीरीतींचा, जुन्या रूढींचा प्रभाव खोलवर मनावर बसलेला असल्यामुळें आधुनिक, नव्या शास्त्रीय विचारांचें महत्त्व पटवून देणें हें कठीण काम झालें आहे. यामुळें ग्रामीण भागांत वैचारिक दास्य आलें आहे. याशिवाय जमिनीवरील जादा लोकसंख्येचा

भार, औद्योगीकरणाचा मंद वेग हेहि प्रश्न आहेत. शेतीव्यतिरिक्त दुसऱ्या जोडधंद्याची फारशी सोय नसल्यामुळें बहुतेक कुटुंबांतील सर्व माणसांना शेतीवर आपला उदरनिर्वाह करावा लागतो. ज्या जमिनींतील उत्पन्नावर अनेक कुटुंबांची गुजराण होते त्या जमिनी आकारानें मोठ्या नसतात. जमिनीच्या टिचभर तुकड्यावर १०–१५ माणसांच्या कुटुंबाला वर्षानुवर्षें दिवस काढावे लागतात. शेतीवरील ताण कमी व्हावा म्हणून कांहीं खेडूत शहराकडे धांव घेऊं लागतात. पण शहरांतील उद्योगधंद्यांची वाढ फारशा वेगानें होत नसल्यास सर्वच माणसांना पुरेसें काम शहरांत मिळत नाहीं. म्हणून व्यवहार्य, समतोल धोरणाची निकड आहे. आपल्या देशाची सांस्कृतिक पद्धति, सामाजिक व आर्थिक परिस्थिति, लोकसंख्येचें स्वरूप या तीनहि गोष्टी साकल्यानें विचारांत घेऊनच पुढील कामाची दिशा व गति ठरवावी लागेल. या संदर्भांत लोकसंख्येची आंकडेवारी किंवा शिरगणती कशी गोळा केली जाते हें पहाणें आवश्यक आहे. कोणत्याहि देशाच्या विकासाच्या प्रयत्नांत जनगणनेस महत्त्वाचें स्थान असतें. जनगणना हा लोकजीवनाच्या प्रगतीचा आरसा आहे. जनगणना ही लोकांच्या आर्थिक जीवनाचें चित्र उभें करते.

जनगणना

आपल्या देशांत दर दहा वर्षांनी एकदा जनगणना होते. पहिली जनगणना १८७२ सालीं झाली. व १९६१ च्या फेब्रूवारी–मार्चमध्यें दहावी जनगणना झाली. आपला देश स्वतंत्र झाल्यानंतरची ही दुसरी जनगणना होय. ह्या जनगणनेस आपल्या देशाच्या प्रगतीच्या दृष्टीनें विशेष महत्त्व होतें. कारण गेल्या चौदा-पंधरा वर्षांच्या स्वातंत्र्याच्या काळांत निरनिराळ्या विकास व इतर योजनांचे प्रत्यक्ष परिणाम काय झाले व सामाजिक, आर्थिक व इतर विकासाच्या भावी प्रयत्नांच्या दिशा व गति कोणत्या असाव्यात तें ठरवितांना त्या जनगणनेंतून मिळविलेल्या माहितीचा, आंकडेवारीचा व निष्कर्षांचा उपयोग होतो.

लोकसंख्या, तिची विभागीय व प्रादेशिक वांटणी, वाढ, तिची घटना व आजचें स्वरूप याविषयीं मूलभूत माहिती मिळविणें हा जन-

गणनेचा उद्देश असतो. प्रत्येक व्यक्ति व कुटुंबासंबंधीच्या कांहीं विशिष्ट गोष्टींची माहिती प्रथम गोळा करून ती संकलित केली जाते. नंतर निरनिराळ्या शासकीय विभागासाठीं तौलनिक अभ्यासास सोयीस्कर अशा स्वरूपांत ती प्रसिद्ध करण्यांत येते. आपल्या देशाचा मोठा विस्तार, लोकांची निरक्षरता, अपुरीं दळणवळणसाधनें व इतर अडचणी असूनहि प्रत्येक दहा वर्षांत होणारी भारतीय जनगणना ही एक वैशिष्ट्यपूर्ण बाब झाली आहे. जनगणनेचें काम साधारणतः २० दिवसापर्यंत चालतें. ह्या काळांत प्रत्येक व्यक्तीची नोंद केली जाते.

१९६१ च्या जनगणनेची माहिती

१९६१ सालीं झालेल्या भारतीय जनगणनेंत पुढील चार गोष्टी-संबंधीं माहिती गोळा करण्यांत आली.

१ घर, २ कारखाना, ३ कुटुंब, ४ व्यक्ति. ह्या शिवाय देशांतील तांत्रिक शिक्षण घेतलेल्यांची वेगळी गणना केली गेली. चार बाबींतील प्रत्येकासंबंधीं पुढील कलमें माहिती गोळा करण्यासाठीं होतीं;

(अ) **घर**--(१) घरांचा उपयोग कशासाठीं होतो?
(२) घरांच्या भिंती व छतें कशाचीं आहेत?

(ब) **कारखाना**--(१) मालकाचें नांव
(२) तयार होत असलेल्या वस्तु
(३) रोज कामावर असलेल्या माणसांची संख्या
(४) कोणतें जळण अथवा शक्ति वापरण्यांत येतें

(क) **कुटुंब**—(१) कुटुंबाकडे राहावयास किती खोल्या आहेत?
(२) राहतें घर–मालकीचें कीं भाड्याचें?
(३) घरी कसलेली जमीन किती, पैकीं मालकीची किती, लोकांकडून केलेली किती.
(४) इतरांस कसण्यासाठीं दिलेली जमीन
(५) घरगुती उद्योग आहे काय? असल्यास किती महिने चालतो?
(६) शेती व घरगुती उद्योग यांमध्यें काम करणाऱ्यांची संख्या.

(ड) व्यक्ति—(१) नांव, स्त्री किंवा पुरुष

(२) कुटुंबप्रमुखाशीं नातें

(३) वय

(४) विवाहित, अविवाहित वगैरे

(५) जन्मस्थान खेडें कीं शहर, इतर ठिकाणीं जन्म झाला असल्यास सध्याच्या ठिकाणीं किती वर्षांपासून ?

(६) राष्ट्रीयत्व, धर्म, अनुसूचित जाति किंवा वन्य जमातीपैकीं आहे काय ?

(७) साक्षरता व शिक्षण

(८) मातृभाषा, इतर भाषांचें ज्ञान

(९) करीत असलेल्या कामाचें स्वरूप–घरच्या शेतीवर, शेतमजूर म्हणून, घरगुती उद्योगधंद्यांत किंवा इतर व्यवसायांत

(१०) काम करीत नसेल तर काय करीत आहे ?

वरील कलमें आपल्या देशाच्या नियोजित विकास कार्यक्रमास उपयोगी पडावी म्हणून घेतलीं गेलीं. १९६१ च्या जनगणनेंत १० फेब्रुवारी १९६१ ते २८ फेब्रुवारी १९६१ पर्यंत माहिती गोळा करण्याचें काम झालें. देशाच्या निरनिराळ्या राज्यांतून शिरगणतीचें काम पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक राज्याच्या लोकसंख्येचे आंकडे, एकूण लोकसंख्येंत दहा वर्षांत झालेली वाढ, दर चौरस मैली घनता, स्त्री–पुरुषप्रमाण, साक्षरताप्रमाण आदि बाबींसंबंधी आकडे तात्पुरत्या अंदाजाच्या स्वरूपांत प्रसिद्ध केले गेले.

भारतीय लोकसंख्येची वाढ

नुकत्याच झालेल्या जनगणनेनुसार आपल्या देशाची लोकसंख्या ४३·९२ कोटी झाली आहे. ही वाढ कोणत्या अवस्थेंतून कशी झाली हें पाहणें अगत्याचें आहे. भारताची लोकसंख्या एकदम झपाट्यानें वाढली असें नाहीं. मोरलँड ह्या इतिहासकारानें १६०० सालीं असलेल्या लोकसंख्येचा अंदाज १० कोटी असा दिला आहे. युरोपची व भारताची १६०० ते १९४७ या काळांतील लोकसंख्यावाढीची तुलना पाहतांना सबंध युरोप-

खंडाची व भारताची १६०० सालची लोकसंख्या अनुक्रमें ९·५० कोटी व १२.५० कोटी होती. म्हणजे भारताची १६०० सालची १२.५० कोटीचो लोकसंख्या संभाव्य वाटते.

१८७१ ते १९६१

१८७१ ते १९६१ हा नव्वद वर्षांचा काळ भारतीय इतिहासांत क्रांतिकारी काळ आहे. ह्या काळांत अनेक महत्त्वपूर्ण घटना घडल्या. १८७६–७८, १८९८–१९०० ह्या वर्षांतील दोन मोठे दुष्काळ, १९१८ मधील इन्फ्लूएंझाची साथ, १५ ऑगस्ट १९४७ रोजीं झालेली देशाची फाळणी व स्वातंत्र्यप्राप्ति, या घटनांनीं व घडामोडीनीं भारतीय लोकसंख्येस एक वेगळें वळण मिळालें आहे. १८७१ ते १९६१ ह्या ९० वर्षांच्या काळाचे तीन भाग पडतात ते असे : (१) १८७१ ते १९२१–५० वर्षांचा. (२) १९२१ ते १९४१–२० वर्षांचा आणि (३) १९४१ ते १९६१–२० वर्षांचा. हे तिन्ही कालखंड वैशिष्ट्यपूर्ण आहेत. कारण असें कीं पहिल्या ५० वर्षांची लोकसंख्यावाढ ही प्रत्येक दशकांत झालेली नाहीं. यापैकी कांहीं दशकांत लोकसंख्या खूप वाढली, तर कांहीं दशकांत दुष्काळ, रोगराई, साथीचे आजार यामुळे लोकसंख्या घटली. यापुढच्या काळांत दुष्काळ व रोगराईचा या लोकसंख्येवर फार कमी परिणाम झाला आहे. दुसऱ्या कालखंडांत लोकसंख्यावाढ होऊं लागली. तिसऱ्या कालखंडांत भारताची राजकीय, भौगोलिक रचना व एकंदर चित्रच बदललें. तिन्ही कालखंडांतील घटना व घडामोडी वैशिष्ट्यपूर्ण आहेत, पण इतर राष्ट्रांशीं तुलनेच्या दृष्टीनें १८७१ ते १९४१ हा ७० वर्षांचा काळ एक मानला आहे. ह्या काळांत आपल्या देशाची एकूण लोकसंख्या ५२ टक्क्यांनीं वाढली आहे. ह्याच काळांत ब्रिटिश बेटें–ग्रेट ब्रिटन व आयर्लंड-यांची लोकसंख्यावाढ एकूण ५७ टक्के आहे.

जपानची ह्या काळांतील लोकसंख्यावाढ जवळजवळ १२० टक्क्यांनीं झाली आहे, तर अमेरिकेच्या लोकसंख्येच्या वाढीचा आंकडा २३० टक्के आहे. ह्या सर्व आंकड्यांवरून आपल्या देशाची लोकसंख्यावाढ ही कांहीं विशेष अपवादात्मक बाब आहे असें नाहीं. ती जगाच्या

सरासरी वाढी बरोबरची आहे. औद्योगिक दृष्टया प्रगत राष्ट्रांतील लोकसंख्यावाढीच्या दृष्टीनें भारताची ह्या काळांतील लोकसंख्यावाढ ही विशेष नाहीं. पण १९२१ ते १९६१ या कालखंडांत झालेली वाढ व मृत्यूचें घटलेलें प्रमाण ध्यानांत घेतां परिस्थिति चिंताजनक आहे. ह्या काळांतील वाढ निश्चितपणें द्रुतगतीची, जलद, आहे असें म्हणावें लागतें. १८७१ ते १९६१ ह्या ९० वर्षांत झालेली लोकसंख्यावाढ पुढील तक्त्यांत दिली आहे.

शिरगणती वर्ष	टक्के वाढ (पूर्वीच्या १० वर्षांत झालेली)
१८८१	०.९
१८९१	९.४
१९०१	१.०
१९११	६.१
१९२१	०.९
१९३१	१०.६
१९४१	१५.०
१९५१	१३.३४
१९६१	२१.४९

वरील तक्त्यावरून असें दिसून येतें कीं एक सोडून एका दशकांत मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. १८८१, १९०१, १९२१, या शिरगणतींच्या आधी ३–४ वर्षें कांहीं तरी दुष्काळ वा सांथ असल्यामुळें एकदम मोठी घट झाली आहे. १८७६–७८ च्या दुष्काळाचा परिणाम १८८१ च्या शिरगणतींत दिसून आला. १८९८–१९०० च्या दुष्काळानें १९०१ च्या शिरगणतींत ०.९ टक्क्यांनीं घट झाली. आणि जेव्हां अशा नैसर्गिक आपत्ति आल्या नाहींत तेव्हा लोकसंख्येची वाढ वेगानें झाली. तिचें स्वरूप शिरगणतींतील आंकडचांत पहावयास मिळतें. १९२१ ते १९४१ या २० वर्षाच्या काळांत लोकसंख्येंत जलद गतीची वाढ झाली. नंतरच्या २० वर्षांच्या काळांत १ ते २ टक्कचाच्या वार्षिक वाढीनें आपल्या देशाच्या प्रचंड लोकसंख्येंत ८ कोटी २० लक्ष संख्येची भर पडली.

जन्मप्रमाण व मृत्युप्रमाण

लोकसंख्यावाढीचें स्वरूप दोन गोष्टींवर—जन्माचें प्रमाण व मृत्यूचें प्रमाण-अवलंबून असतें. भारतांत गेल्या ६० वर्षांत आरोग्य-योजना व रोगराईविरुद्ध वाढत्या सोयींमुळें मृत्यूचें प्रमाण खूपच कमी झालें आहे. पण त्या मानानें जन्मप्रमाण फारसें घटलें नाहीं. १९०१ सालीं दर हजारीं जन्मप्रमाण ३४ होतें. व दर हजारीं मृत्युप्रमाण ४४.४ होतें. १९४१ च्या शिरगणतींत जन्मप्रमाण तितकेंच (३४) राहिलें व मृत्युप्रमाण १३.२ नी (३१.२) कमी झालें. १९२१ च्या पूर्वी मृत्युप्रमाण ४० ते ५० (दर हजारी) होतें तें १९२१ नंतर हळूहळू कमी होऊं लागलें. १९५१ च्या शिरगणतीनुसार (स्वातंत्र्योत्तर भारतांतील पहिली शिरगणती) आपली लोकसंख्या ३५ कोटी ६८ लक्ष होती व १९६१ च्या शिरगणतीनुसार ती ४३ कोटी ८० लक्ष झाली आहे. १९५१ ते १९६१ ह्या १० वर्षांत आपली लोकसंख्यावाढ २१.५% इतकी झाली. ह्याच काळांत पाकिस्तानची लोकसंख्यावाढ २३.७% झाली आहे.

गेल्या ९० वर्षांच्या काळांत भारताच्या प्राकृतिक आकारांत बरेच बदल झाले आहेत. सिलोन, ब्रह्मदेश व फाळणीनंतर पाकीस्तान हे तीन भाग भारताच्या भूप्रदेशांतून वेगळे झाले असून आता आपल्या देशाचा आकार १२,६९,६४० चौरस मैलांइतका आहे.

स्वातंत्र्योत्तर काळ

स्वातंत्र्योत्तर काळांत दोन पंचवार्षिक योजना पुऱ्या झाल्या. आणि तिसरी योजना सुरू होऊन तिनें एक वर्षाची वाटचाल पुरी केली आहे. लोकसंख्याशास्त्रज्ञांच्या अंदाजाच्या आधारावर तिसऱ्या योजनेचा आराखडा तयार करण्यांत आला आहे. १९६१ च्या शिरगणतींत भारताची लोकसंख्या ४३ कोटी १० लक्ष इतकी होईल असा त्यांचा अंदाज होता. पण प्रत्यक्षांत ती ४३ कोटी ९२ लक्ष झाली आहे. म्हणजे अंदाजापेक्षां ८२ लक्षांनीं अधिक लोकसंख्या झाली आहे. तज्ञांच्या मतें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत भारताची लोकसंख्या दरवर्षीं २ टक्क्यांनी वाढेल. म्हणजे साधारणत: दरवर्षीं ८० ते ८७ लाखाची भर पडेल. पुढील २०

वर्षांत म्हणजे १९८१ पर्यंत आपली लोकसंख्या किती होईल ह्याचे अंदाज अनेक तज्ज्ञांनीं व संस्थानीं वर्तविले आहेत. १९६६ सालीं व्हावयाच्या लोकसंख्येसंबंधी बहुतेकांचें एकमत आहे. म्हणजे तेव्हाची लोकसंख्या साधारणतः ४७·२ कोटी इतकी असेल.

भावी वाढीचे अंदाज

भारताच्या लोकसंख्येसंबंधीं अभ्यास करणारे श्री. आगरवाला व श्री. कोल व हूवर या व्यक्तींनीं व राष्ट्रसंघ व भारतांतील मध्यवर्ती संख्याशास्त्रीय संघटना या संस्थानीं वेगळे वेगळे अंदाज येत्या वीस वर्षांतील लोकसंख्येसंबंधी मांडले आहेत. त्यांचे अंदाज दर पांच वर्षांसाठीं आहेत. ते पुढीलप्रमाणें–

अंदाज (आंकडे कोटींतील)

वर्ष	आगरवाला	राष्ट्रसंघ	कोल व हूवर	मध्यवर्ती संघटना
१९६६	४७.२	४५.६	४६.९	४८.०
१९७१	५२.६	५०.४	५१.७	५२.८
१९७६	५७.४	—	५५.७	५६.८
१९८१	६२.६	६६.०	५८.८	—

वरील तक्त्यांतील अंदाजावरून आणखी २० वर्षांनी म्हणजे १९८१ सालीं आपली लोकसंख्या ५८ ते ६६ कोटी असूं शकेल.

भारतीय लोकसंख्येच्या प्रश्नाचें स्वरूप थोडक्यांत असें सांगता येईल कीं, भारतांतील लोकसंख्या ही मोठी आहे. तिची प्रवृत्ति वाढती आहे. तिची होणारी घट ही अगदी थोडी (जन्म प्रमाण कमी होण्यामुळें होणारी) आहे. तिचें मृत्युप्रमाण हें बरेंच कमी झालें आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिची वाढ ही नियंत्रित झाली पाहिजे. तिची वाढ कशी रोखतां येईल हें समजावून घेण्यासाठीं भारतांतील लोकसंख्याप्रश्नाची विविध अंगें व वैशिष्ट्यें यांचा विचार झाला पाहिजे. त्याची चर्चा व विवेचन आपण पुढील प्रकरणांत पाहूं.

३ : : आपल्या लोकसंख्याप्रश्नाचीं वैशिष्ट्यें

भारतीय लोकसंख्यावाढीच्या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी आपल्या देशांतील सामाजिक परिस्थिति कशी आहे हें प्रथम समजावून घेतलें पाहिजे. खंडप्राय अशा आपल्या देशाला प्राचीन काळापासून एक इतिहास, संस्कृति व जीवनपद्धति लाभलेली आहे. त्या तीन गोष्टींत (इतिहास, संस्कृति व जीवनपद्धति) कालमानानुसार व आधुनिक यंत्रयुगामुळें अनेक बदल झाले आहेत. पण हे बदल आमूलाग्र झालेले नसल्यामुळें जीवनाचा मूळ गाभा अद्याप कायम आहे.

एकत्र कुटुंबपद्धति

एकत्र कुटुंबपद्धति हा आपल्या समाज रजनेचा पायाभूत घटक आहे. पूर्वी समृद्धीच्या काळांत व्यक्तीचीं, कुटुंबाचीं व जीवनाचीं मूल्यें वेगळीं होतीं. मोठचा, एकत्र कुटुंबासाठीं प्रत्येक व्यक्ति व प्रत्येक व्यक्तीसाठीं सारें कुटुंब ही भावना त्यावेळीं होती. त्यामुळें कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीला अवघ्या कुटुंबासाठीं योग्य असा आचार व उद्योग करावा लागे. कुटुंबाचें सुख-दुःख त्याच्या सुख-दुःखाशीं जोडलेलें असे. अशा ह्या कुटुंबांत विवाहा-संबंधींचा दृष्टिकोनहि वेगळा होता. कुटुंबांतील मुली आठ–दहा वर्षांच्या झाल्या कीं वडील मंडळी योग्य तो वर पाहून त्यांना उजवीत. अशा कोवळचा वयांतच मुली सासरीं जात. त्यांच्यापैकी ९९ टक्के मुली निरक्षर असत. हळूहळू शिक्षणाचा प्रसार वाढला, पण तरी मुलींचें शिक्षण बेताचें म्हणजे दोन चार इयता पास झालेलें असें असावयाचें. ह्या मुलींना सासरींहि एकत्र कुटुंबात कामें करावीं लागत. त्याबरोबरच कालांतरानें त्यांना मातृत्वाची जबाबदारी संभाळावी लागे. १००–१५० वर्षांपूर्वीचा काळ बराच स्वस्ताईचा–समृद्धीचा होता. व्यक्तीला आर्थिक विवंचना फारशी भासत नसे. त्यामुळें वडील मंडळी विवाहप्रसंगीं 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा भलामोठा आशीर्वाद देत. आठ हा आकडा लाक्षणिक आहे; म्हणजे संसार, घर, चांगलें मोठें, भरलेलें असूं दे ही भावना

त्या आशीर्वादामागें होती. त्या काळांतील सरासरी जन्मप्रमाण हें आठापेक्षां कमी नव्हतें. अधिक मुलें असणें हें अभिमानाचें मानलें जाई. घरच्या उद्योगास वाढत्या माणसांचें श्रम मिळत. या दृष्टीनें अपत्यसंख्येस महत्त्व व मूल्य होतें. आपल्या मुलाबाळांच्या शिक्षण-संगोपनाची जबाबदारी प्रत्येक जोडप्याला वाहावी लागत नसे. मुलें कुणाचीं कितीहि असलीं तरी सगळ्यांचें खाणेंपिणें एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नांतून होई. त्यामुळें आपलें उत्पन्न पाहून संतति वाढवावी अशी जाणीव जोडप्यांना होण्याचें कारण पडत नसे.

विवाहाची सार्वत्रिकता

आपल्या देशांत प्रत्येक स्त्रीपुरुषाचा विवाह हा झालाच पाहिजे, अशी भावना आहे. स्त्रियांच्या बाबतींत तर ही भावना विशेष प्रकट होते. एखादा पुरुष अविवाहित राहिला तर चालेल, पण स्त्रीनें अविवाहित राहणें हें पाप मानलें जाई. त्यामुळें विवाहांची संख्याहि वाढत होती. त्यांतच बालविवाहाची भर पडली. त्यामुळें पुरुष व स्त्रिया जननक्षम झाल्यापासून प्रजोत्पत्ति ताबडतोब सुरू होई व दीर्घकाळपर्यंत चालत राही. भारताच्या लोकसंख्यावाढीला ही सामाजिक परंपरा विशेष कारणीभूत झालेली आहे.

स्त्रियांना कनिष्ठ दर्जा

आपल्या कुटुंबांत मुलाचें स्थान निराळें आहे. लक्ष्मीचा वरदहस्त वा तिचा शाप असलेल्याहि कुटुंबांत मुलीचा जन्म ही अशुभ घटना मानली जाते. उलट वंशविस्ताराचें साधन म्हणून मुलाची योग्यता व माहात्म्य आहे. मुलगा हा वंशाचा दिवा, कुटुंबांतील अक्षय धन असा मानला जातो. मुलगा व्हावा म्हणून प्रसंगीं नवस, पूजा व्रतवैकल्याचे मार्गहि अनेक स्त्रीपुरुष अव लंबितात. पुत्रमाहात्म्याच्या प्रभावामुळें पुत्रप्राप्तीसाठीं वाट पहात पहात अपत्यसंख्या वाढत जाते. व त्यामुळें लोकसंख्यावाढीवरहि त्याचा परिणाम झाला आहे. म्हणून पुत्रमाहात्म्य, विवाहांची सार्वत्रिकता व एकत्र कुटुंबपद्धति या तीन गोष्टी कुटुंबनियोजनाच्या संदर्भात सामाजिक पार्श्वभूमीच्या दृष्टीनें महत्त्वाच्या आहेत.

आर्थिकदृष्ट्या वैशिष्ट्यें

या सामाजिक कारणांमुळें भारताची लोकसंख्या सतत वाढत राहण्यास मदत झाली आहे. तसेंच भारताच्या लोकसंख्येचीं आर्थिक दृष्ट्या महत्त्वाचीं असलेलीं वैशिष्ट्यें पुढें दिलीं आहेत. लोकसंख्येबाबतचें धोरण ठरवितांना या वैशिष्ट्यांचा विचार करावा लागतो.

(१) **जगांत दुसरा क्रमांक**––१९६१ च्या जनगणनेप्रमाणें भारताची लोकसंख्या ४३ कोटी ८० लाख आहे. १९५१ ते १९६१ या दहा वर्षाच्या काळांत २१.४९ % वाढ झाली आहे. भारतीय लोकसंख्या ही जगाच्या लोकसंख्येच्या एक अष्टमांश आहे. सर्वांत जास्त चीनची लोकसंख्या असून भारताचा क्रमांक दुसरा आहे. १९६० सालच्या आंकडेवारीप्रमाणें जगाची लोकसंख्या २९० कोटी असून चीनची ६६ कोटी ९० लाख, भारताची ४० कोटी ३० लाख (अंदाजें), सोव्हिएट रशियाची २० कोटी ९० लाख व अमेरिकेची (यू. एस्. ए.) १७ कोटी ८० लाख अशी लोकसंख्या होती.

(२) **घनता**––भारताची लोकवस्ती सगळीकडे समप्रमाणांत झालेली नाहीं. पश्चिम बंगाल व केरळमध्ये खूप दाट लोकवस्ती आहे, तर आसाम व राजस्तानांत ती विरळ आहे. १९५१ सालीं भारताची घनता ३१६ होती, १९६१ सालीं ३८४ झाली. अमेरिकेची घनता फक्त ५६ आहे, तर जपानची ५८१ आहे.

(३) **वयोगट** –१९५१ सालच्या जनगणनेप्रमाणें १ ते १४ वर्षें वयापर्यंत ३८.३ %; १५ ते ५५ च्या दरम्यान ५३.४ % व ५५ च्या वरील ८.२ % अशी लोकसंख्येची वयोगटांत विभागणी झाली होती. १९६१ सालीं १५ ते ५९ वर्षें वयाच्या दरम्यानची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ५४.४१ % आहे.

१५ ते ५९ या वयोगटांतील लोकसंख्या ही आर्थिकदृष्ट्या क्रियाशील असूं शकते. शेती, कारखाने, व्यापार, वाहतुक, नोकऱ्या, इत्यादि विविध व्यवसायांत या वयोगटांतील लोकसंख्या उपयोगी पडते. या वयोगटांतील लोकसंख्येचें एकूण लोकसंख्येशीं प्रमाण जितकें अधिक असेल तितका

त्या समाजाजवळ श्रमशक्तीचा पुरवठा अधिक आहे असें मानलें जातें. १ ते १४ या वयोगटांतील भारतीय लोकसंख्येचें प्रमाण पूर्वी जास्त होतें. त्याचें कारण बालमृत्यूचें प्रमाण अधिक होतें. बालमृत्यू जास्त होत असतील तर त्याचा अर्थ असा होतो कीं समाजाला मोठ्या लोकसंख्येचा भार पोसावा लागतो, व त्याप्रमाणांत श्रमशक्ति मात्र मिळत नाहीं. गेल्या तीस वर्षांत भारतांतील बालमृत्यूचें प्रमाण कमी होत आहे. आरोग्याच्या सोयी ज्या प्रमाणांत वाढतील त्या प्रमाणांत बालमृत्यूचें प्रमाण आणखी कमी होईल.

बालमृत्यूचें प्रमाण कमी झालें की १५ ते ५९ या वयोगटांतील लोकसंख्येचें प्रमाण वाढतें. श्रमशक्तीचा पुरवठा वाढतो. पण तेवढ्यानें या वयोगटांतील सर्व लोकसंख्या आपोआप कोणता ना कोणता व्यवसाय करूं लागते असा मात्र अर्थ होत नाहीं. समाजांत उत्पादनसाधनें किती प्रमाणांत उपलब्ध आहेत यावर किती लोक आर्थिकदृष्ट्या क्रियाशील असतील हें अवलंबून राहतें. जर उत्पादनसाधनें कमी असतील तर मग बेकारीचें प्रमाण वाढतें.

भारतांत बेकारीचें प्रमाण बरेंच आहे. १९०१ ते १९६१ या काळांत बेकारीचें प्रमाण फारसें कमी झालेलें दिसत नाहीं. ही गोष्ट पुढील तक्त्यावरून स्पष्ट होईल.

	१५ ते ५९ वयोगटांतील लोकसंख्या %	आर्थिक दृष्ट्या क्रियाशील %
१९०१	५९·०३	४६·६१
१९११	६०·२३	४८·०७
१९२१	५९·६४	४६·९२
१९३१	६०·१९	४३·३०
१९५१	५७·०७	३९·१०
१९६१	५४·४१	४२·९८

१९५१ सालीं ५७·०७ टक्के लोक काम करूं शकत होते, पण प्रत्यक्षांत ३९·१० टक्के इतकेच लोक या ना त्या व्यवसायांत गुंतलेले होते. १९६१

सालीं ५४·४१ टक्के लोक काम करूं शकत होते, पण प्रत्यक्षांत मात्र ४२·९८ टक्केच काम करीत होते. म्हणजे जवळजवळ १२ टक्के लोक बेकार होते.

(४) **लिंग-प्रमाण**––दर हजार पुरुषामागे स्त्रियांची जी संख्या पडते तिला लिंग-प्रमाण असें म्हणतात. १९०१ सालीं हें प्रमाण १००० : ९७२ होते, तर १९६१ सालीं १००० : ९४० होतें. सबंध भारतभर हे हें प्रमाण सारखें नाहीं. केरळ व ओरिसा राज्यांत स्त्रियांची संख्या पुरुषांच्यापेक्षा जास्त आहे, तर आसाम, पंजाब आणि पं. बंगाल या राज्यांत स्त्रियांचें प्रमाण फारच कमी आहे. १९६१ सालीं भारतांत पुरुषांची संख्या २२ कोटी ६० लाख होती, तर स्त्रियांची २१ कोटी २० लाख होती. स्त्रियांची संख्या १ कोटी ४० लाखांनीं कमी आहे. यांतच विधवा-पुनर्विवाहाचें प्रमाण कमी आंहे. यामुळे ही एक सामाजिक समस्या निर्माण झाली आहे.

(५) **सरासरी आयुर्मर्यादा**––१९५१ सालीं भारतांतील पुरुषांचें सरासरी आयुर्मान ३२·४५ वर्षे होतें व स्त्रीचें ३१·६६ वर्षें होतें. १९५६–६१ या काळांतील पुरुषाचें सरासरी आयुर्मान ४१·६८ वर्षें व स्त्रीचें ४२·०६ वर्षें आहे. १९५१ ते १९६१ या दहा वर्षांत आयुर्मर्यादा वाढली हें खरें. पण इतर देशांच्या मानानें ती फार कमी आहे. अमेरिकेंत पुरुषाची सरासरी आयुर्मर्यादा ६५ वर्षें आहे, तर स्त्रीची ७० वर्षें आहे.

(६) **वाढीचा वेग**––१९४१ ते १९५१ या काळांत लोकसंख्येची वाढ १२·५ टक्क्यांनीं झाली. पण १९५१ ते १९६१ या काळांत २१·४९ टक्क्यांनीं झाली. गेल्या दहा वर्षांत वाढीचा वेग खूपच वाढलेला आहे.

(७) **जन्म-प्रमाण व मृत्यु-प्रमाण**––१९५१ सालीं दर हजारीं ४० जन्मसंख्या व दर हजारीं २७ मृत्युसंख्या होती. जन्मसंख्येचें व मृत्युसंख्येचें प्रमाण मध्यभारतांत जास्त आहे तर दक्षिण भारतांत कमी आहे.

(८) **ग्रामीण व शहरी**––१९५१ सालीं भारतांतील ग्रामीण लोकसंख्या ८२·७० टक्के व शहरी लोकसंख्या १७·३० टक्के होती. १९६१

सालीं ग्रामीण लोकसंख्या ८२·१६% व शहरी १७·८४ टक्के होती. शहरी लोकसंख्येंत वाढ झाली असली तरी ती फारच थोडी आहे.

जमिनीवर वाढता भार

आपला देश मुख्यतः शेतीप्रधान आहे–शे. ७० हून अधिक लोक शेतीवर आपली उपजीविका करतात. १९५१ च्या जनगणनेनुसार देशांतील एकूण जमिनीचें क्षेत्र ७२ कोटी एकर इतकें आहे. त्यापैकीं लागवडीखालील क्षेत्र ३२·३६ कोटी एकर इतकें आहे. म्हणजे दर डोई ०·८४ एकराइतकें जमिनीचें प्रमाण येतें. त्या जमिनींतून निघणाऱ्या पिकावरच कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवावा लागतो. जेव्हां कुटुंबाचा आकार वाढत जातो, म्हणजे खाणारीं तोंडें जेव्हां वाढतात, तेव्हां पूर्वीच्याच जमिनींतील पिकांवर अधिक माणसांची उपजीविका करावी लागते. जमिनीचें क्षेत्र पूर्वीइतकेंच असतें. जमिनींतून निघालेलें पीक जास्त माणसांत विभागून जातें, म्हणजे पूर्वीच्या पेक्षां आतां प्रत्येकीं कमी धान्य मिळतें. अशा रीतीनें वाढत्या लोकसंख्येमुळें जमिनीवरील भार वाढत जातो. १९५१ च्या जनगणनेनुसार १९०१ ते १९५१ या ५० वर्षांत कसणुकीखालच्या जमिनीचें प्रमाण दरडोई १०३ सेंटस् वरून ८४ सेंटस्-वर आलें आहे. याचें कारण साधें आहे. लागवडीखाली आणखी कांही जमीन आली असली तरी लोकसंख्या त्या मानानें फारच मोठ्या प्रमाणावर वाढली व त्यामुळें दर डोई क्षेत्र कमी झालें. त्यांतच वडिलार्जित जमिनीची सर्व भागांत समान विभागणी होत असल्यानें जमिनीचे लहान लहान तुकडे होत राहिले. प्रत्येक प्रकारच्या जमिनीचे भावागणिक तुकडे पडले. यामुळें बांधांत कांही जमीन वाया गेली. व एकंदरींत शेत जमिनीची उत्पादन-क्षमताहि कमी झाली.

परकीय गुलामगिरीचा परिणाम

ह्याच्या जोडीस परकीय गुलामगिरीच्या वातावरणांत एकंदर विकास, प्रगति कुंठित झाली होती. १९४७ सालीं भारत स्वतंत्र होईपर्यंत येथें ब्रिटिशांचें राज्य होतें. त्यांच्या अमदानींत आर्थिक शोषण अव्याहत चालू होतें. तें थांबावें म्हणून सरकारने कांहीं प्रयत्न केले नाहींत. कारण त्या सरकारला

या देशांत अधिकाधिक शोषण करून आपलें साम्राज्य वाढवावयाचें होतें. शेती हा पूर्वापार चालत आलेला व्यवसाय तसाच पुढे चालूं राहिला. ब्रिटिशांनीं शेतसारा पैशांत व सक्तीनें वसूल करण्याची पद्धत पाडली. त्यामुळें शेतकऱ्यांना आपला माल चटकन विकावा लागे. ब्रिटिशांनीं कायद्याची चौकट निर्माण केली. ही चांगली गोष्ट असली तरी सुरुवातीच्या काळांत सावकारांनीं त्याचा गैरउपयोग करून घेतला. त्यामुळें शेतकरी अधिकाधिक नाडला गेला. शेतींत भांडवल गुंतवणूक अजिबात झाली नाहीं.

याच्याच जोडीला ब्रिटिशांनी आपला कारखानदारी माल येथें आणून विकायला सुरुवात केली. त्यामुळें येथील परंपरागत उद्योग बंद पडलें. कारागिरांना शेतीकडेच धांव घ्यावी लागली, कारण अन्य उद्योग-धंदे फारसे वाढले नव्हते. अशा प्रकारें सर्व बाजूंनीं शेतीवरील लोकसंख्येचा भार वाढत राहिला, आणि लोकसंख्येच्या वाढीमुळें हा ताण दुणावला. वाढत्या लोकसंख्येला पुरेसें अन्न पुरविणें हें देखील भारतीय शेतीकडून निभेना. अन्नधान्यासाठी या कृषिप्रधान देशाला परकीयांच्या मदतीवर अवलंबून राहावें लागतें.

दुबळें आरोग्यमान :—भारतीय लोकसंख्या भरमसाट वाढते आहे. पण तिचें आरोग्यमान मात्र दुबळें आहे.

संतुलित आहारासंबंधी पुढील कोष्टक हें मार्गदर्शक मानलें जातें.

	वस्तु	दरमाणशीं दर दिवशी औंस
१	ज्वारी	११
२	गहूं	२
३	तांदूळ	१
४	तूर	१
५	हरभरा	२
६	भूईमूग	१
७	भाजीपाला	४
८	फळें	३
९	दूधदही	१०

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३५-९०२ वि: निर्लंध
क्रमांक २५२५ ४ दि: २५-९-५८

	वस्तु	दरमाणशीं दरदिवशी औंस
१०	तूप तेल	२
११	साखर गूळ	२

पण असला आहार भारतांतील ५ टक्के लोकांनादेखील मिळत नाहीं. कारण शेतींतून निघणाऱ्या उत्पादनाच्या मानानें लोकसंख्या भरमसाट झाली आहे. आहार चांगला न मिळाल्याने लोकांचें आरोग्यमान दुबळें राहणें स्वाभाविक आहे.

कमी आयुर्मान हें दुर्बल व कमजोर आरोग्यमानाचा परिणाम आहे. ह्या देशांतील कमजोर आरोग्यमानाचें प्रथम कारण म्हणजे हवामान व त्या दृष्टीनें लोकांचा आहार यांतील समतोल जवळजवळ बिघडलेलाच आहे. 'अठराविश्वें दारिद्र्य' असलेल्यांना दिवसाकाठीं दोन वेळां पुरेसें अन्न मिळणें ही मुख्य गरज आहे. संतुलित आहार स्वप्नांत सुद्धां मिळत नाहीं. त्यामुळें एखादी साथ आली, एखादी रोगराई पसरली तर मुळांत कमजोर असलेलें आरोग्यमान अधिकच दुर्बल होतें. भारतांत प्रत्येक प्रौढ माणसास दोन-तीन वर्षांपूर्वी (१९५८–५९) २३८० कॅलरीज धान्य मिळण्याची शक्यता होती. व समतोल आहार ह्या २८०० कॅलरीज इतका असला पाहिजे अशी आहारविषयक सल्लागार समितीनें नुकतीच शिफारस केली आहे. आहारांतील उणीव मुख्यतः सकस बाबींसंबंधींच आहे. कारण दूध, मासे, मांस, अंडीं, फळें, भाज्या ह्या गोष्टी सर्वसामान्य माणसाच्या आहारांत भरपूर वा योग्य त्या प्रमाणांत नसतात. लोकसंख्यावाढीचा वेग व आपल्या आहारपद्धति यामुळें सकस, पुरेसा आहार प्रत्येक प्रौढास मिळूं शकत नाहीं. आणि याचा परिणाम म्हणजे आपल्या देशांतील बहुसंख्य लोकांचें दुर्बल व कमजोर आरोग्यमान होय.

स्त्रियांचें आरोग्य

स्त्रीचें आरोग्यमान तर अधिकच दुबळें आहे. ती विशेष काळजी करण्यासारखीबाब आहे. प्रत्येक प्रसूतीनंतर स्त्रीच्या शरीरांत एक प्रकारची घट होत असते. ही घट भरून निघण्यास कांहीं काळ लागतो. म्हणून जन्माला येणाऱ्या बालकाचें आरोग्य जर चांगलें हवें असेल तर स्त्रीचें आरोग्य हें

सुदृढ असणें अगत्याचें आहे. स्त्रीच्या आरोग्यावर मुलाचें आरोग्य अवलंबून असतें.

बालकाचा जन्म ही कुटुंबांत महत्त्वाची गोष्ट मानली जाते. विशेषत: स्त्रीच्या जीवनांत प्रथम प्रसूति ही थोडी काळजीची बाब मानली जाते. 'पहिलटकरणीचें बाळंतपण' हा एक पुनर्जन्मच असतो. किंचित कुतूहल, वेदनांची परिसीमा, तृप्तीचें समाधान अशा अनेक संमिश्र भावनांनीं स्त्रीची प्रसूति होते. २८० दिवस उदरांत वाढविल्यानंतर अपत्यप्राप्ति होते. व त्यानंतर खरी जबाबदारी सुरू होते. म्हणून जन्मापूर्वी आईला स्वत:च्या प्रकृतीची व जन्मानंतर मुलाच्या वाढीची काळजी व जोपासना नीटपणें करावी लागते. भारतीय लोकसंख्यावाढीच्या प्रश्नांत बालमृत्यु व बाळंतिणींचे मृत्यु ही बाब मोठी गंभीर ठरली आहे. प्रसूतीनंतर मृत्यूचें प्रमाण ज्या अनेक देशांत फार जास्त आहे अशा देशांत भारताचा अद्यापहि समावेश होतो. प्रसूतिव्यवस्थेंत अनेक सुधारणा व योजना झाल्यामुळें प्रसूत्योत्तर मृत्यु व बाळंतपणानंतरचा आजार यांचें प्रमाण ५० % नी कमी झालें आहे. १९३८ सालीं सबंध देशाचें प्रमाण १००० जन्मसंख्येस २० होतें. तें ११५८ सालीं ग्रामीण भागांत १२.४ आहे. मोठ्या शहरी भागांत तें खूपच कमी म्हणजे १००० जन्मसंख्येस २.५ आहे. १९३७ सालीं प्रसूतीनंतरचे मृत्यु व आजार यांचें प्रमाण ३२ % होतें तें आता १९६१ सालीं २८ % वर आलें आहे. प्रसूतिपूर्व काळजी व उपचार जेथे दिलें जातात तेथे अशक्ततेचें प्रमाण कमी झालें आहे.

बालमृत्यूची समस्या

विषम आहार, जीवनसत्वें व नत्रयुक्तें यांच्या अभावामुळें क्षीण झालेली प्रतिकारशक्ति, या गोष्टी प्रसूतीनंतरच्या मृत्यूस कारणीभूत होतात. प्रसूतीनंतर मृत्यूचें प्रमाण कमी होण्यावरच भावी पिढीचें संगोपन व वाढ अवलंबून आहे. कारण आई हा बालकाच्या चारित्र्यनिर्मितींतील मोठा घटक आहे, महत्त्वाचा भाग आहे. आईच्या मायेला, प्रेमाला, वात्सल्याला पारखीं व वंचित झालेलीं बालकें हीं कांही बाबतींत दुर्दैवी ठरतात. भावनात्मक विकासाच्या दृष्टीनें मातेचा महिमा अगाध आहे. मातेचें कार्य बालजीवनाच्या विकासांत अनन्यसाधारण आहे. मूल जन्मल्यानंतर

पहिलीं कांहीं वर्षें त्याची काळजी, जोपासना व संगोपन हें सर्व अत्यंत पद्धतशीर, नीट व्यवस्थितपणें व्हावें लागतें. जन्मल्यापासून एक महिनाभर मृत्यूचें प्रमाण अधिक असतें. ह्या मानानें तें प्रमाण १-६ महिन्यांपर्यंत कमी असतें. बालमृत्यूचें प्रमाण आपल्या देशांत खूपच अधिक आहे. कारण जन्मलेल्या मुलांपैकीं १।९ मुलें एका वर्षाच्या आंतच मृत्युमुखीं पडतात. ह्या शतकाच्या पहिल्या ५० वर्षांत बालमृत्यूचें प्रमाण निम्म्यावर आलें आहे. १९०१ सालीं दर हजारी जन्मास २३२ मृत्युप्रमाण होतें तें १९५१ सालीं बरोबर निम्में–११६ झालें आहे. सर्वांत अधिक १९१८ सालीं २६७ होतें, तर सर्वांत कमी ११६ (१९५१ सालीं) झालें. ह्याच काळांत ब्रिटिश बेटांमधील प्रमाण १५४ (सन १९००) वरून ३० (सन १९५१) झालें. अमेरिकेंत तें १२२ (सन १९००) वरून २९ (सन १९५१) वर आलें आहे. आपल्या देशांतील १९२० ते १९५८ ह्या काळांतील प्रमाण पाहतां तें १९५ (सन १९२०) वरून ९० वर (सन १९५७) आलें आहे.

बालमृत्यूचे दोन भाग पडतात–पहिल्या महिन्यांतच मृत्युमुखीं पडणारीं व पहिल्या महिन्यापासून वर्षाचें आंत जाणारीं गरोदरावस्थेंत व बाळंतपणांतील आबाळीमुळें पहिल्या महिन्यांतच मुलें जातात. दुसऱ्या भागांतील मृत्यूंचीं कारणें योग्य त्या उपचाराचा अभाव, दिरंगाई हीं होत. आपल्या लोकसंख्येंतील बरीचशी संख्या अशा मृत्यूनें वाया जात आहे. प्रसूतीनंतरचे मृत्यु व बालमृत्यु हें एक प्रकारचें वाया जाणारें मानवधन आहे. एकंदर लोकसंख्येचे वयोगट ० ते १५, १६ ते ५९, ५९ च्या वर असे पडतात. भारतांत १९६१ च्या आंकडेवारीप्रमाणें पहिल्या गटांत ४०% लोकसंख्या, दुसऱ्या गटांत, (१६ ते ५९) ५२% लोकसंख्या व ५९ च्या वर ८% लोकसंख्या आहे. एकंदर उदरनिर्वाहाची जबाबदारी दुसऱ्या गटावरच अधिक पडते. आणि ह्याच गटांत बेकारीचें प्रमाण अधिक आहे. रोजगारीच्या दृष्टीनें काम करणारी लोकसंख्या ५२% आहे. त्यामुळें बेकारीचा व अर्धबेकारीचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला आहे. ह्या सर्व वैशिष्ट्यांचें प्रतिबिंब आपल्या प्रादेशिक व सबंध देशाच्या लोकसंख्येवर पडलें आहे.

प्रादेशिक वैशिष्टचें

भारतीय संघराज्यांत भाषा, राज्यकारभार व तत्सम गोष्टीनुसार १५ राज्यें सरकारें– राज्यें आहेत. कांही भाग केंद्रीय सरकारच्या शासनाखालीं आहे. भाषा, पोशाख, हवामान, भौगोलिक परिस्थिति यांमुळें ह्या १५ राज्यांत अनेक प्रकारची विविधता आहे. याचा परिणाम लोकसंख्या व लोकसंख्यावाढ यावरहि झाला आहे. राज्याचा आकार, उद्योगधंदे, स्थलांतर, जन्म-मृत्यूचें प्रमाण या प्रमुख गोष्टींमुळें लोकसंख्यावाढ कमी अथवा अधिक होते. मार्च १९६१ मध्यें आपल्या देशांत शिरगणती झाली. ह्या शिरगणतीनुसार सबंध देशाची लोकसंख्या ४३ कोटी ८० लक्ष झाली आहे. १९५१–१९६१ ह्या दहा वर्षांच्या काळांत २१·३४% वाढ झाली आहे. घनता ३८४ आहे. ही लोकसंख्या १५ राज्यें व केंद्रीय सरकारच्या शासनाखालचा प्रदेश यांमध्यें वसली आहे. गेल्या ६० वर्षांत देशाच्या व ह्या अनेक विविध राज्यांच्या लोकसंख्येंत किती वाढ किंवा घट झाली हें पाहाणें उद्‌बोधक होईल.

आसाम

गेल्या ६० वर्षांतील (१९०१-१९६१) लोकसंख्यावाढीच्या दृष्टीनें आसाम, केरळ व गुजरात यांचे पहिला, दुसरा व तिसरा असे क्रम लागतात. आसामची वाढ गेल्या ६० वर्षांत २१९.४% झाली आहे. तर दर चौरस मैलास आसाममध्यें लोकसंख्या २५२ आहे. ही लोकसंख्यावाढ होण्यास प्रमुख कारण आसामबाहेरील लोकांची झालेली आवक. मजुरांची आवक मुख्यतः आसाममध्यें चहाचे मळे, तेलखाणी खनिजपदार्थ खाणी, रेल्वे व रस्त्याच्या योजना व पूर्व पाकिस्तानामधून आलेले निर्वासित यांमुळें झाली आहे.

केरळ

केरळची ६० वर्षांतील वाढ १६३.८ % आहे. तर तेथील घनता सर्वांत अधिक आहे (११२५). फार मोठ्या प्रमाणावर बाहेरून लोकांची आवक झालेली नसतांनाहि केरळची वाढ ही वैशिष्टचपूर्ण आहे. केरळच्या लोकसंख्येच्या संदर्भांत तेथील साक्षरतेचें प्रमाण व स्त्रीपुरुष

प्रमाण हीं विचारांत घेतलीं पाहिजेत. साक्षरताप्रमाण सर्वांत अधिक म्हणजे दर हजारीं ४६२ व स्त्रीपुरुष प्रमाणहि सर्वांत अधिक म्हणजे १०२२ आहे. (दर हजार पुरुषांमागे १०२२ स्त्रिया) केरळचें वैशिष्ट्य म्हणजे दाट लोकसंख्या, बेकारीचें प्रमाण अधिक, स्त्रियांचें उच्च दर्जाचें सामाजिक स्थान, साक्षरताप्रमाण अधिक हें सारें असूनहि तेथील लोकसंख्या वाढीची परिस्थिति चिंताजनक आहे. केरळची वाढ ही अधिक अभ्यसनीय आहे.

गुजरात

लोकसंख्या–वाढींत गुजरातचा तिसरा क्रमांक लागतो. गेल्या ६० वर्षांतील गुजरातची लोकसंख्या वाढ १२६.८ % झाली आहे. ही वाढ शेती धंद्याची प्रगति व भरभराट आणि अनेक नवीन कारखाने, गिरण्या, इतर उद्योगधंदे सुरू झाल्यामुळें झाली असण्याची बरीच शक्यता आहे.

पश्चिम बंगाल

ह्या नंतरचे क्रम पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश, आंध्र, म्हैसूर या राज्याचे आहेत. कलकत्ता शहर औद्योगिक दृष्ट्या महत्त्वाचें असल्यामुळेंहि पश्चिम बंगालची लोकसंख्या अधिक दाट झाली आहे. या शतकाच्या आरंभीं म्हणजे १९०१ सालीं बंगालची दरचौरस मैली लोकसंख्या ४१९ होती. व अखिल भारतांत सर्वांत दाट लोकसंख्या बंगालमध्येंच होती.

महाराष्ट्र

महाराष्ट्राच्या वाढींत उतर प्रदेश, केरळ, मद्रास, आंध्र येथील भागांतून नोकरीनिमित्त आलेल्या लोकांचा वाटा कमी नाहीं. लोकसंख्यावाढींत महाराष्ट्राचा क्रमांक ५ वा लागतो. तरीपण गेल्या ६० वर्षांत व विशेषतः गेल्या १० वर्षांत (१९५१–१९६१) महाराष्ट्राची वाढ अनुक्रमें १०३.७ % व २३.४ % आहे. म्हणजे महाराष्ट्राची वाढ ही दुर्लक्षणीय खासच नाहीं.

राजस्थान व मध्यप्रदेश

राजस्थान व मध्यप्रदेश या दोन राज्यांतील गेल्या ६० वर्षांतील

वाढ ही अनुक्रमें ९५.७ % व ९२.१ % आहे. गेल्या दहा वर्षांतील वाढ ही भारतीय वाढीपेक्षां (२१.४९) जास्तच आहे. २६.१४ (राजस्थान) व २४·२५ (मध्यप्रदेश). शेतींतील भरभराट व मलेरिया–प्रतिबंधक मोहिमेमुळें ही वाढ झाली असण्याची बरीच शक्यता आहे.

आंध्र व म्हैसूर

आंध्र व म्हैसूर या भागांत मुळांतच दाट लोकसंख्या नाहीं. गेल्या दहा वर्षांतील वाढ आंध्रमध्यें १५.६३ % व म्हैसूरमध्यें २१.३६ % आहे. पण गेल्या ६० वर्षांत आंध्रची वाढ (८८.७) ही म्हैसूरच्या वाढीपेक्षां (८०.४) अधिक आहे.

कमी वाढीचे प्रदेश

बाकीचीं पांच राज्यें म्हणजे मद्रास, ओरिसा, बिहार, पंजाब व उत्तर प्रदेश. सर्व भारतांत उत्तर प्रदेश हा आकारानें मोठा असूनहि तेथील ६० वर्षांतील लोकसंख्या वाढ मात्र सर्वांत कमी (५१·७१) आहे. गेल्या दहा वर्षांतील वाढींत सर्वांत कमी वाढ काश्मीरच्या खालोखाल (९·७३) मद्रासची (११·७३) आहे. मद्रासची लोकसंख्या मुळांतच दाट आहे. १९०१ सालीं मद्रासच्या लोकसंख्येची घटना दर चौरस मैलीं ३८४ होती. व १९६१ मध्यें दर चौरस मैलीं ही ६७१ पर्यंत वाढलेली आहे. या राज्याच्या लोकसंख्येबाबत एवढें निश्चितपणें म्हणतां येईल कीं इतर प्रदेशांत कामधंद्यासाठीं जाणारांची संख्या अधिक आहे, व शेती उद्योग-धंदे यासंबंधीं विकासशील धोरण आहे, या बरोबरच लोकसंख्यावाढ नियंत्रित करण्यासाठीं तेथील राज्य सरकारनें स्वीकारलेलें वास्तव व योग्य धोरण याचाहि उल्लेख केला पाहिजे. यामुळेंच तेथील वाढ ही कमी झाली आहे. गेल्या ६० वर्षांत व गेल्या १० वर्षांत ओरिसाची वाढ ही अनुक्रमें ७०·५% व १९·९४% आहे. ही वाढ कमी असण्याचीं प्रमुख कारणें म्हणजे तेथील प्रतिकूल भौगोलिक परिस्थिति व उद्योगधंद्यांची अपुरी वाढ हीं होत. बिहारची परिस्थिति उत्तर प्रदेशासारखीच आहे. १९०१ सालीं दर चौरस मैली संख्या ४०६ होती. व १९६१ सालीं ती ६९१ आहे. बिहारची लोकसंख्या वाढ ७०·१% असली तरी गेल्या १० वर्षा-

तील वाढ ही भारतीय सरासरी वाढीपेक्षां (२१·९४%) कमी (१९·७८%) आहे. बिहारमध्यें कांहीं ठिकाणीं नवीन उद्योगधंदे सुरूं झाले असले तरी एकंदर राज्याच्या आर्थिक जीवनावर त्याचा विशेष परिणाम झालेला नाहीं असें दिसतें.

पंजाबचा प्रश्न अगदीं वेगळा आहे. गेल्या ६० वर्षांत पंजाबची वाढ ही देशांत सर्वांत कमी (५३%) असली तरी गेल्या १० वर्षांत (१९५१–६१) ही वाढ भारतीय सरासरी वाढीपेक्षां अधिक (२५·८%) आहे. फाळणीनंतर पश्चिम पंजाबमधून आवक मोठ्या प्रमाणावर झाली. जावक मात्र आवकपेक्षां मोठी नव्हती. गेल्या १० वर्षांत पंजाबची स्थिति स्थरावूं लागली आहे. अनेक उद्योगधंद्यांची मोठ्या प्रमाणावर सुरुवात झाली आहे. पण गेल्या १० वर्षांतील वाढ अनावर झाल्यानें गंभीर परिस्थिति निर्माण करण्यास कारणीभूत होईल असें वाटतें. ६० वर्षांतील वाढ़ ही ५३% तर १० वर्षांतील वाढ ही २५·८% आहे. म्हणजे १० वर्षांतील वाढ साठ वर्षांतील वाढीच्या जवळजवळ निम्मी आहे. वाढत्या उद्योग-धंद्याबरोबरच लोकसंख्या फार वाढणार नाहीं याची काळजी पंजाब-सारख्या राज्यांत विशेषत्वानें घ्यावी लागेल.

सर्वत्र एकच कार्यक्रम नको

असें हें लोकसंख्यावाढीचें विविध राज्यांतील तौलनिक स्वरूप आहे. सर्व राज्यांतील लोकसंख्यावाढ पाहतां लोकसंख्येची प्रमाणाबाहेर वाढ ही अखिल भारतीय प्रवृत्ति आहे असें म्हणतां येईल. पण ही वाढ रोखण्यासाठीं सर्वच राज्यांत सब घोडे बारा टक्के या न्यायानें एकच धोरण व एकत्र कार्यक्रम अवलंबितां उपयोगाचें नाही. म्हणून राज्याचा आकार, उद्योगधंद्यांची वर्तमान स्थिति, वाढीची अनुकूलता, रोजगारीसाठीं होत असलेलें स्थलांतर, स्त्री-पुरुष प्रमाण, दर चौरस मैलीं संख्या, सामाजिक परिस्थिति, सामाजिक समस्येमुळें होत असलेलें स्थलांतर या सर्व गोष्टींच्या अनुरोधानेंच धोरण आखणें, कार्यक्रम योजणें व अंमलांत आणणें इष्ट, योग्य व उचित ठरेल. प्रांतांतील आरोग्य, आजारांवरील उपचार व इलाज यांची व्यवस्था याचाही विचार करावा लागेल.

शहरीकरण

लोकसंख्यावाढीच्या प्रश्नांत शहरीकरण या घटनेचा विचार करावा लागतो. कामानिमित्त शहराकडे होत असलेलें स्थलांतर, खेड्यांतील अर्धरोजगारीस कंटाळून जवळपासच्या मोठ्या गांवांकडे व शहरांकडे होत असलेली खेडुताची धांव याचा विचार केला पाहिजे.

१९६१ च्या शिरगणतीनुसार ८२·१६% लोक खेड्यांत राहतात व शे. ७० हून अधिक लोक शेतीवर आपली उपजीविका करतात. ग्रामीण लोकसंख्येचें प्रमाण गेल्या १० वर्षांत (१९५१–६१) विशेष कमी झालें नाहीं. खेड्यांतील लोकांना शेतींत सहा–आठ महिने काम करावें लागतें. आपल्या खेडुतांचा खरा प्रश्न उरलेले चार-सहा महिने कोठे व कोणतें काम करावयाचें हा आहे. खेड्यांतच काम मिळण्याची शक्यता अगदी कमी असल्यामुळें शेतकरी जवळ-पासच्या मोठ्या गांवांतील एखाद्या कारखान्यांत, गिरणींत वा यंत्रोद्योगांत कांही महिने काम करतात. उद्योग-धंद्यांचें केंद्रीकरण हें बहुतेक सर्व मोठीं शहरें व त्यांच्या आसपासच झालें असल्यामुळें साहजिकच शहरें हीं खेड्यांतील लोकांना–पूर्ण बेकारांना व अर्धबेकारांना–काम पुरवीत होतीं. शहरें हीं खेडुतांना उदरनिर्वाहाचें साधन देतात, त्यामुळें शहरांतील लोकसंख्याहि वाढत आहे. १९५१–६१ या काळांत शहरी लोकसंख्येंत २४·८५% वाढ झाली आहे. शहरी लोक-संख्येंत १९४१–५१ मध्यें ४०% व १९३१–४१ मध्यें ३१% वाढ झाली आहे. एक लाखाहून जास्त लोकवस्तीचीं एकंदर १०३ शहरें आपल्या देशांत (केरळ खेरीज करून–कारण तेथील आकडेवारी उपलब्ध नाहीं) आहेत. भल्या शहरांची लोकसंख्याहि वाढली. उदाहरणार्थ पुणें शहराची लोकसंख्या १९०१-५१ हया ५० वर्षांच्या काळांत तिपटीहून अधिक वाढली आहे. सर्वांत जास्त वाढ १९४१–५१ या दशकांत (७०%) झाली. हया वाढीचें प्रमुख कारण म्हणजे युद्धकाळांत व युद्धोत्तर काळांत रोजगारीच्या संधींत वाढ व त्यामुळें वाढलेली आवक हें होय.

बेकारीचा प्रश्न

१९४१ ते १९५६ या पंधरा वर्षांच्या काळांतील पुण्याच्या कुटुंबाची आर्थिक पाहणी (४५ टक्के नमूना-प्रमाणानें (Sample)) करण्यात आली.

त्यांत असें दिसून आलें की नवीन कारखाने, उद्योगधंदे निघाले पण त्या मानानें म्हणण्यासारखी अधिक लोकांना रोजगारी मिळून बेकारी कमी झाली नाहीं. १९५१ च्या लोकसंख्येच्या आंकडचानुसार देशांत १३ कोटी ९० लक्ष लोकांना रोजगारी होती. १९५१ सालीं सबंध देशाची लोकसंख्या ३६ कोटी २० लक्ष (जेथे शिरगणती होऊं शकली नाहींअसे भाग धरूनहि) होती. त्या आंकडचानुसार असा अंदाज करतां येईल कीं एकंदर रोजगारी करणारांची संख्या १४ कोटी १० लक्ष होती. ह्यांतील ९ कोटी ९० लक्ष शेतींत काम.करणारे व ४ कोटी २० लक्ष शेती न करणारे होते. तिसऱ्या योजनेच्या आरंभीं बेकारांची एकंदर संख्या एक कोटी म्हणजे शहरी भागांत २०लक्ष व ग्रामीण भागांत ८० लक्ष इतकी असेल. तिसऱ्या योजनेच्या काळांत आणखी १ कोटी ५९ लक्ष श्रमिकांची–४१ लक्ष शहरी भागांत व १ कोटी १८ लक्ष ग्रामीण भागांत–भर पडेल. म्हणजे तिसऱ्या योजनेच्या मुदतींत एकंदर २ कोटी ५९ लक्ष अधिक लोकांना रोजगारी पुरवावी लागेल. ही सारी आंकडेवारी इतकी बोलकी आहे कीं ह्या देशांत रोजगारीचा प्रश्न लोकसंख्यावाढीच्या प्रश्नाबरोबर तितकाच तीव्र, गंभीर व निकडीचा. असा आहे. आणि हेंहि आपल्या लोकसंख्यावाढीच्या प्रश्नाचें एक वैशिष्टच झालें आहे.

जीवनमानांत घट व अन्नपुरवठ्याची बिकट समस्या

रोजगारी, लोकसंख्यावाढ व उद्योगधंदे या तीन घटकांत एक प्रकारचें व्यस्त प्रमाण निर्माण होऊन बेकारीचा मोठा प्रश्न आपल्या समोर निर्माण झाला आहे. जीवनमान वाढूं शकत नाहीं व अन्नपुरवठ्याचा प्रश्नहि बिकट होत आहे, असे हे दोन महत्त्वाचे परिणाम ह्या विषम, व्यस्त परिस्थितीमुळें झाले आहेत. १९५१ च्या शिरगणतीनुसार ५६·९% लोकसंख्या १५ ते ५९ वयोगटांतील आहे आणि १९६१ च्या शिरगणतीनुसार हा आंकडा ५४·४१% इतका आहे. बेकार लोकसंख्या हें राष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक स्वास्थ्याला एक आव्हान आहे. कारण सैतानाची प्रवृत्ति अशा माणसांच्या मनांत ठाण धरून बसायला फार वेळ लागत नाहीं. ती एक विध्वंसक, समाजविरोधी शक्ति होण्याचा बराच संभव असतो. म्हणून कुटुंबाचें, राज्याचें व देशाचें सामाजिक व आर्थिक स्वास्थ्य हें अधिका-

धिक बेकारांना काम, रोजगार देण्याच्या प्रयत्नांवर व त्यांना मिळणाऱ्या यशावर बहुतांशीं अवलंबून असतें. समाज सुखी व्हावयाचा असेल तर समाजांतील सर्व धडधाकट लोकांना उत्पादक काम मिळालें पाहिजे. उत्पादक कामांतूनच देशाची संपत्ति वाढत असते. म्हणून आपल्या देशांत ह्या प्रश्नाचें विशेष अगत्य आहे.

आपल्या देशांतील लोकसंख्यावाढ ही सर्व भाषिक, प्रादेशिक, आर्थिक, सामाजिक, विविध जातीगटांत बहुतांश सारखी आहे. नुकत्याच झालेल्या शिरगणतीनुसार ८२·१६% लोक खेड्यांत राहतात. बहुतांश लोकसंख्यावाढ ही ग्रामीण भागांतच दिसून येणें अगदी स्वाभाविक आहे. अर्थात् शहरी लोकसंख्यावाढहि अजिबात दुर्लक्षून चालणार नाहीं. लोकसंख्यावाढ कोणत्या वर्गांत विशेषत्वानें झाली आहे हें आतां आपण पाहूं.

दलित वर्गांत अधिक वाढ

लोकसंख्यावाढीचें प्रमाण विविध आर्थिक व सामाजिक गटांत वेगवेगळें पाहावयास मिळतें. खेडुतांत, शहरांतील कामगार–मजूर व तत्सम व्यावसायिकांत प्रजोत्पादनाचें प्रमाण हें अधिक असतें. रुपये ५०० हून अधिक मासिक उत्पन्न असणाऱ्यांची कुटुंबसंख्या २–३ मुलांइतकी असते. कमी उत्पन्न व जास्त प्रजोत्पादन असें हें प्रमाण व नातें पाहावयास मिळतें. कमी उत्पन्न असणाऱ्यांना कुटुंबनियोजनाचें महत्त्व न पटल्यामुळें व जीवनांत अन्य कोणतेंहि प्रलोभन व समाधान नसल्यामुळें प्रजोत्पादनाचें प्रमाण वाढलेलें पाहावयास मिळतें. अर्थात् असें घडणें हें अगदी स्वाभाविक आहे.

कुटुंबाच्या जीवनमूल्यांत अपत्य हें एक महत्त्वाचें मूल्य आहे, वैभव आहे, ठेवा आहे. व परिवार हें अनेक मूल्यांचें साकार चित्र आहे. ह्या चित्रामागील, त्या मूल्यांमागील भूमिका महत्त्वाची आहे. त्याचा विचार आपण पुढील प्रकरणांत करूं.

* * *

४ : : परिवार नियोजनाची गरज

मागील प्रकरणांत भारतीय लोकसंख्येचीं वैशिष्टचें आपण पाहिलीं. आपल्या लोकसंख्यावाढीचा वेग खूप मोठा आहे ही गोष्ट त्यांतून स्पष्ट होते. आतां आपल्या जीवनमानाचा विचार करूं.

निकृष्ट जीवनमान

जीवनमान हें उत्पन्नावर अवलंबून असतें हें आपण मागें पाहिलें आहे. कुटुंबाचें जें उत्पन्न असतें तेवढचांत नित्य गरजेच्या वस्तु किती प्रमाणांत घेतां येतील हें अवलंबून असतें. कुटुंबीयांची संख्या कायम राहिली आणि उत्पन्न वाढलें तर कुटुंबाचें जीवनमान सुधारतें, कारण कांही वस्तु अधिक घेतां येतात, व कांही वस्तु नव्यानें घेतां येतात. कुटुंबाचें उत्पन्न कायम राहिलें व संख्या मात्र वाढली तर जीवनमान घटतें.

भारतांतील नागरिकाचें १९६०–६१ सालीं दर डोई वार्षिक उत्पन्न रु. ३३० होतें. म्हणजे प्रत्येक व्यक्तीला वर्षभरांत रु. ३३० त मिळतील इतक्या नित्य गरजेच्या वस्तु घेतां येत होत्या. मात्र ही आंकडेवारी सरासरीची आहे. म्हणजे असें कीं एकूण राष्ट्रीय उत्पन्न जर सर्वांना सारखें वाटून मिळालें तर प्रत्येकाला रु. ३३० मिळणार. पण आपल्या देशांत संपत्तीची व उत्पन्नाची वाटणी विषम आहे हें सर्वांना माहीत आहे. कांही जणांना बरेंच जास्त उत्पन्न मिळतें, तर बहुतेकांना बरेंच कमी उत्पन्न मिळतें. महाराष्ट्रांत वर्षाला रु. ३३० किंवा महिन्याला रु. २७।। इतका खर्च करणारे लोक खेडचांत फक्त ८.३ टक्के व शहरांत ३२.७ टक्के आहेत. म्हणजे खेडचांतील ९२ टक्के लोकांचें व शहरांतील ६७ टक्के लोकांचें वार्षिक उत्पन्न सरासरीपेक्षां कमी आहे. याचा अर्थ असा कीं त्यांचें जीवनमान हें आणखी खालचें असणार.

तरी पण दर डोई वार्षिक उत्पन्न हें जीवनमानाची पातळी स्थूल-मानानें दर्शवितें असें आपण गृहीत धरूं. आपलें जीवनमान कसें आहे हें इतरांच्या तुलनेनेंच समजतें. दर डोई वार्षिक उत्पन्नाचे आंकडे इतर

देशांत पुढीलप्रमाणें आहेतः--अमेरिकाः रु. ९६८०; इंग्लंडः रु. ४५२०; जपानः रु. १२०९; सीलोनः रु. ५६७; इस्राएलः रु. २९७५. म्हणजे इंग्लंड-अमेरिकेपेक्षां आपलें जीवनमान फारच कमी आहे, एवढेंच नव्हे तर सीलोनपेक्षांहि तें कमी आहे. सीलोन हा आशिया खंडांतील भारताच्या अगदी जवळचा देश आहे. पण त्याच्या तुलनेनेंहि आपलें जीवनमान निम्में आहे.

आपलें जीवनमान वाढवायचें असेल तर त्यासाठी देशाचें उत्पन्न वाढविलें पाहिजे. उत्पन्न वाढेल तसतशी त्याची समप्रमाणांत वाटणी व्हावी अशी व्यवस्था झाली पाहिजे हें खरें. पण मुळांत उत्पन्न वाढलें पाहिजे, म्हणजेच जीवनमान सुधारूं शकेल.

आर्थिक विकासाची निकड

देशाचें उत्पन्न वाढवायचें म्हणजे प्रत्येक क्षेत्रांतील उत्पादन वाढवायचें. अन्न, वस्त्र, लोखंड, औषधें-सर्वच गोष्टींचें उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करायचा त्यासाठी शेतीसुधारणेच्या विविध योजना हातीं घ्याव्या लागतात, नवेनवे कारखाने काढावे लागतात. रस्ते-रेल्वे यांचीहि वाढ झाली पाहिजे. या सर्व गोष्टी म्हणजेच आर्थिक विकासाचे कार्यक्रम. भारतासारख्या अर्धविकसित देशाचा आर्थिक विकास जलद गतीनें घडून आला पाहिजे. तरच येथील बहुसंख्य जनतेचें जीवनमान सुधारूं शकेल.

आर्थिक नियोजन

आर्थिक विकासासाठीं भारतानें १९५१ सालीं नियोजनाचा स्वीकार केला. त्यावर्षी पहिली पंचवार्षिक योजना बनविण्यांत आली. पांच वर्षांत काय करायचें याचा विचार करण्याबरोबरच नियोजनाचीं दीर्घकालीन उद्दिष्टेंहि त्यांत मांडण्यांत आलीं होतीं. १९७३-७४ सालीं म्हणजे चोवीस वर्षानंतर आपलें दर डोई उत्पन्न दुप्पट करावें, व जीवनमानांत ७० टक्क्यांनीं सुधारणा करावी असें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें होतें. १९५१ सालीं दर डोई उत्पन्न रु. २८४ होतें. १९७४ सालीं तें रु. ५६८ करायचें असें ठरलें, व तें शक्य होईल असेंहि वाटलें. पण तिसरी योजना बनवितांना असें लक्षांत आलें की लोकसंख्येच्या वाढीचा वेग पूर्वी वाटला

त्यापेक्षां जास्त आहे. तेव्हां १९७६ सालीं रु. ५३० पर्यंत तरी दर डोई उत्पन्न वाढवावें असा प्रयत्न करण्याचें आता ठरलें आहे.

म्हणजे दर डोई उत्पन्न २४ वर्षांत दुप्पट करायचें होतें तें आता २७–२८ वर्षांत तरी जमेल कीं नाही याबद्दल शंका आहे. लोकसंख्या वाढीमुळें जीवनमान वाढविण्यांत कशी अडचण येत आहे हें यावरून स्पष्ट होईल.

पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा अनुभव असा आहे कीं ठरविलेलीं उद्दिष्टें गांठण्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागली. आणि तरीहि तीं उद्दिष्टें शंभर टक्के साध्य झालीं असें नाहीं. पहिल्या योजनेसाठीं रु. १९६० कोटी खर्च करण्यांत आले. दुसरी योजना रु. ४६०० कोटींची होती. इतक्या मोठ्या प्रमाणावर खर्च करण्याची आपल्या देशाची ताकत नाहीं. बहुसंख्य जनता गरीब आहे. त्यामुळें स्वेच्छेनें बचत करणें किंवा सक्तीनें लादलेले कर देणें दोन्ही गोष्टी कठीण आहेत. स्वेच्छेनें बचत कमी होईल हें दिसतच होतें. म्हणून पहिल्या दोन योजनांच्या, म्हणजे दहा वर्षांच्या काळांत सर्वसामान्य जनतेवरील अप्रत्यक्ष कराचा बोजा दर वर्षीं रु. १५० कोटींवरून दर वर्षीं रु. ८५० कोटींपर्यंत वाढविण्यांत आला. तिसरी योजना रु. १०, ४०० कोटींची आहे. व त्यांतहि रु. १७१० कोटींची करवाढ करावी लागणार आहे.

इतक्या मोठ्या प्रमाणावरील करवाढ भारतांतील सर्वसामान्य जनतेला झेपण्यासारखी नाहीं. तरी पण भारताच्या भावी पिढ्यांचा अभ्युदय व्हावा म्हणून वाटेल तेवढा त्याग व कष्ट भारतीय जनता करीत आहे. पण प्रयत्नांची पराकाष्ठा केली तरी आपल्या योजनांना लागणारा पैसा देशांतल्या देशांत उभारणें शक्य झालेलें नाहीं. १९५०–५१ सालीं आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या फक्त ५ टक्के रक्कम परत भांडवल म्हणून गुंतविली जात होती. १९५५–५६ सालीं हें प्रमाण ६$\frac{3}{4}$ टक्के व १९६०–६१ सालीं ११ टक्के असें वाढविण्यांत आलें. हें प्रमाण तिसऱ्या योजनेच्या अखेरीस १४–१५ टक्क्यापर्यंत, चौथ्या योजनेच्या अखेरीस १७–१८

टक्क्यांपर्यंत वं पांचव्या योजनेच्या अखेरीस १९–२० टक्क्यांपर्यंत वाढवायचें आहे. दर वर्षी राष्ट्रीय उत्पन्नाच्या २० टक्के गुंतवणूक ही आदर्श मानली जाते. भारतानें तो आदर्श गांठायला १९७६ साल उजाडावें लागणार आहे. व त्याचा अर्थ असा की त्यासाठी मोठ्या प्रमाणावर बचत व गुंतवणूक करावी लागणार आहे.

पण इतके परिश्रम घेऊनहि आपल्या योजनांसाठी लागणारा पैसा आपण देशांतल्या देशांत उभा करूं शकत नाहीं. पहिल्या योजनेंत आपल्याला रु. १८८ कोटी (एकूण खर्चाच्या १० टक्के) व दुसऱ्या योजनेंत रु. १०९० कोटी (एकूण खर्चाच्या २४ टक्के) इतकी मदत परकीयांकडून घ्यावी लागली. तिसऱ्या योजनेंत रु. २२०० कोटींची (एकूण खर्चाच्या २६ टक्के) मदत परकीयांकडून घ्यावी लागणार आहे. आपल्या आर्थिक विकासासाठी आपल्याला दुसऱ्याच्या तोंडाकडे बघत बसावें लागतें. त्यांतच जर आपली लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढत राहिली तर परकीयांकडून मदत घेऊनहि आपलें जीवनमान पाहिजे त्या प्रमाणांत उंचावणार नाहीं.

अन्नपुरवठ्याची समस्या

अन्न ही समाजाची पहिली गरज आहे. कोणत्याहि देशांतील लोकांना अन्नाचा पुरवठा पुरेसा झाला पाहिजे. जो कृषिप्रधान देश आहे त्यानें आपल्या लोकसंख्येला पुरेल इतकें अन्नधान्य देशांतल्या देशांत निर्माण करावे अशी अपेक्षा कोणीहि करील. पण भारतांतील परिस्थिति तशी नाहीं. अन्नधान्याबाबत आपण अद्यापहि स्वावलंबी नाहीं. आपल्याला त्यासाठी परकीयांच्या मदतीवर अवलंबून राहावे लागते.

येथे आणखी एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. आपलें जीवनमान खालचें आहे याचा अर्थ आपला आहारहि निकृष्ट आहे. दररोज दर माणशीं १८।। औंस धान्य मिळालें पाहिजे. पण सध्या दररोज प्रत्येक माणूस १५ औंस धान्य खातो. अधिक धान्य खायचें म्हटलें तर तेवढें उत्पादन वाढवावें लागेल.

अन्नधान्याचें उत्पादन मात्र फार मोठ्या प्रमाणावर वाढूं शकत नाहीं. १९५१ ते १९६१ या दहा वर्षांत लोकसंख्या २१।। टक्क्यांनीं वाढली तर अन्नधान्यउत्पादन हें फक्त ३३ टक्क्यांनीं वाढलें. १९५१ सालीं आपण अन्नधान्याची परदेशाकडून आयात करीत होतों, १९६१ सालींहि आयात करावी लागली. कारण अन्नधान्याचें उत्पादन वाढलें तरी सगळ्यांना पुरेल इतकें उत्पादन होत नाहीं. १९५७ सालीं ३५ लाख टन, १९५८ सालीं ३१ लाख टन, १९५९–६० सालीं ३८ लाख टन, १९६०–६१ सालीं ५० लाख टन इतकें अन्नधान्य आपल्याला परदेशांतून आणावें लागलें. १९६०–६१ सालीं परदेशांतून आणलेल्या अन्नधान्याची किंमत रु. १९२·८४ कोटी इतकी होती. म्हणजे वाढत्या लोकसंख्येला पुरेसा अन्नपुरवठा करतां यावा यासाठीं आपल्याला दरवर्षीं इतकी मोठी रक्कम परकीयांना द्यावी लागते. याचा परिणाम असा होतो कीं परकीय देशांतून आपल्याला आर्थिक विकासासाठीं निकडीनें पाहिजे असलेली यंत्रसामग्री आणता येत नाहीं. म्हणजे वाढत्या लोकसंख्येमुळें उत्पादनवाढीच्या कार्यक्रमांत असा अडथळा येतो.

तिसऱ्या योजनेच्या अखेरीस आपणाला दरवर्षीं ८ कोटी ८० लाख टन अन्नधान्य लागेल असा अंदाज आहे. म्हणून अन्नधान्याचें उत्पादन दरवर्षीं १० कोटी टन इतकें व्हावें असा प्रयत्न तिसऱ्या योजनेंत करायचा आहे. त्यासाठीं रु. १२८० कोटी खर्च करावे लागतील. अन्नधान्याचा पुरवठा देशांतल्या देशांत समाधानकारकपणें होण्याची खात्री नसल्यानें १९६० सालीं भारतानें अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर अन्नधान्य मिळण्याविषयीं करार केला आहे. त्या कराराप्रमाणें चार वर्षांत अमेरिकेकडून आपल्याला १ कोटी ६० लाख टन गहू व १० लाख टन तांदूळ मिळणार आहे. याचा अर्थ असा की अन्नधान्याच्या पुरवठ्यासाठीं आपल्याला आणखी कांही वर्षे परकीय मदतीवर अवलंबून राहावे लागणार आहे.

बेकारीची समस्या

लोकसंख्यावाढीमुळें आर्थिक विकासाच्या कार्यक्रमांत अडथळे येतात ते आणखी एका बाजूनें. ती बाजू म्हणजे रोजगारीची. देशांत

श्रम करणारीं जेवढीं माणसें असतील त्या सगळ्यांना कामधंदा पुरविणें अत्यंत निकडीचें आहे. कामधंदा पुरवायचा म्हणजे मोठ्या प्रमाणावर भांडवल लागतें. आपल्या देशांत भांडवलाची तर कमतरता आहे. पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांत आपण किती मोठ्या प्रमाणावर भांडवल-गुंतवणूक केली तें आपण वर पाहिलें आहे. असें असूनहि दुसऱ्या योजनेच्या शेवटीं देशांत ९० लाख लोक बेकार आणि १ कोटी ८० लाख लोक अर्धबेकार होते. तिसऱ्या योजनेच्या काळांत श्रम करूं शकणाऱ्यांच्या संख्येंत आणखी १ कोटी ७० लाखांची भर पडेल असा पूर्वीचा अंदाज होता. पण आतां १९६१ ची शिरगणती झाल्यानंतर असें दिसतें कीं लोकसंख्येची वाढ आधीच्या अंदाजापेक्षा अधिक वेगानें होत आहे. म्हणजे श्रम करणारांच्या संख्येंत याहिपेक्षां अधिक भर पडणार. आणि तिसऱ्या योजनेंत रु. १०४०० कोटी खर्च करूनहि फक्त १ कोटी ४० लाख लोकांना काम देतां येईल. म्हणजे दुसऱ्या योजनेच्या अखेरीस बेकारांची जितकी संख्या होती त्यापेक्षां तिसऱ्या योजनेच्या अखेरीस अधिक लोक बेकार राहतील. लोकसंख्येची वाढ नियंत्रित केली नाहीं तर ही समस्या आणखी बिकट बनेल.

कार्यक्षमता

उत्पादन वाढवायचें तर त्यासाठीं नुसते कारखाने वाढवून भागत नाहीं. प्रत्येक मजूर आठ तासांत पूर्वीपेक्षां जास्त काम कसें करूं शकेल हें पाहिलें पाहिजे. यालाच मजुरांची कार्यक्षमता वाढविणें असें म्हणतात.

भारतीय मजुरांची कार्यक्षमता वाढविण्यासाठीं मुख्यतः तीन मार्गांनीं उपाययोजना करावी लागणार आहे. त्यांना सर्वसाधारण व तांत्रिक शिक्षण मोठ्या प्रमाणावर द्यावें लागेल. तसेंच त्यांचें आरोग्य सुधारावें लागेल. त्यासाठीं वैद्यकीय मदतीबरोबरच सकस आहाराची गरज आहे. आणि तिसरा मार्ग म्हणजे त्यांना सुधारलेलीं अवजारें-आयुधें देणें. त्यासाठीं अधिक भांडवलाची गरज असते.

हे त्रिविध कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर हातीं घ्यायचे असले तर त्यासाठीं खर्चहि बराच करावा लागेल. त्यांतच जर लोकसंख्या वाढली

तर हें खर्चाचें प्रमाण आणखी वाढणार; व पर्यायानें कार्यक्षमता सुधारण्याचे उपाय योजता येणार नाहींत. वाढत्या लोकसंख्येमुळें मजुरांची कार्यक्षमता वाढवितां येत नाहीं, व त्यामुळें उत्पादनवाढीचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर यशस्वी होत नाहींत, अशी हा दुष्ट कारणपरंपरा आहे.

लोकसंख्येचें नियंत्रण अत्यावश्यक

या सर्व बाजूंनीं विचार करता असें दिसतें कीं सर्वसाधारण लोकांचें जीवनमान वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक विकासाचे कार्यक्रम हातीं घेणें हा जसा एक मार्ग, तसेंच लोकसंख्येची वाढ रोखणें हाहि तितकाच किंबहुना अधिक महत्त्वाचा मार्ग होय. म्हणून कुटुंबनियोजन किंवा परिवारनियोजन हा आपल्या आर्थिक नियोजनाचा एक अंगभूत भाग आहे असें आपण मानलें पाहिजे. व त्याप्रमाणें धोरण ठेवून पंचवार्षिक योजनांत परिवार–नियोजनाच्या कार्यक्रमांचा मोठ्या प्रमाणावर अंतर्भाव केला पाहिजे.

कौटुंबिक दृष्टिकोन

लोकसंख्यावाढ नियंत्रित करणें, व त्यासाठीं परिवारनियोजनाची कास धरणें ही आपल्या देशाची गरज आहे. त्याचप्रमाणें आपल्या कुटुंबाचें नियोजन करणें ही प्रत्येक कुटुंबाचीहि गरज आहे. जीवनमान खालावूं नये, शक्य तितकें उंचवता यावें हें त्यामागील एक कारण आहे. शिवाय इतरहि कांहीं कारणें आहेत. त्यांचा विचार आतां क्रमशः करूं.

स्त्रीपुरुष विवाहस्थानीं एकत्र येतात. संसार थाटतात. कालांतरानें त्यांच्या जबाबदाऱ्या वाढतात. कोणत्या त्या जबाबदाऱ्या ? सर्वप्रथम जबाबदारीचें चक्र अपत्यजन्मानंतर सुरूं होतें, पण तत्पूर्वीहि चक्रास गति येत असते. वैवाहिक जीवनांत अपत्यजन्म ही एक महत्त्वाची घटना आहे. त्या घटनेमुळें वैवाहिक जीवनाला वेगळा अर्थ येतो. कारण अपत्य हें एक मूल्य आहे. अपत्य हा एक अमोल ठेवा आहे, अपत्य हें एक वैभव आहे.

"तुझ्यामुळें मी झालें आई । बाळा होऊं कशी उतराई ॥"

ह्या काव्यपंक्तींत अपत्य–महिमा वर्णिला आहे. अपत्यप्राप्तीनें, अपत्यसुखामुळें स्त्रीला आपलें जीवन, वैवाहिक आयुष्य कृतकृत्य झाल्यासारखें वाटतें. सार्थकतेची भावना व कृतज्ञताबुद्धि स्फुरते. म्हणूनच अपत्यजन्माला एक प्रकारचा भावनिक अर्थ आहे, भावनात्मक सामर्थ्य आहे. अपत्यजन्म ही कांहीं केवळ जीवशास्त्रीय घटना नाहीं. तर त्या घटनेच्या मागे भावनिक व वैचारिक पार्श्वभूमि आहे. पतिपत्नींच्या अमर प्रेमाला आलेलें अपत्य हें फळ आहे, पतिपत्नीच्या सहविचाराचें व सहभावनेचें तें एक प्रतीक आहे. पतिपत्नींच्या सहजीवनाचें तें एक द्योतक आहे.

पतिपत्नींची इच्छा

म्हणूनच अपत्य हें पतिपत्नींना हवेसें, इच्छित वाटणारें आहे. जेव्हां तें हवेसें असतें तेव्हां तें लाभलें कीं मगच त्या अपत्याला आईचें प्रेम, वडिलाचें वात्सल्य हें मिळत असतें. जन्माला येणारें अपत्य हें दूध, अन्न आदि आहारावर जितकें वाढतें त्याहूनहि आईवडिलांच्या मायेची ऊब, घरांतील जिव्हाळ्याचें वातावरण, व भावनेचा ओलावा यांवरच अधिक प्रमाणांत वाढतें. किंबहुना ती अपत्याची अगदी सर्वप्रथम गरज आहे. याची काळजी आईवडिलांनीं घेणें अगदीं अगत्याचें असतें. म्हणून अपत्यप्राप्ति ही पतिपत्नींची भावनिक तयारी झाल्यानंतरच व्हावी. नाहींतर जन्माला येणाऱ्या मुलांना त्यांचा प्रेम, वात्सल्य, जिव्हाळा मिळण्याचा जन्मसिद्ध हक्क हवा त्या प्रमाणांत मिळणार नाहीं. ही परिस्थिति म्हणजे पति वा पत्नी यांपैकी एकाच्याच विचारानुसार वा इच्छेनुसार झालेलें अपत्य. येथे पतिपत्नींच्या इच्छांत पत्नीचा विचार वा इच्छा अधिक महत्त्वाची आहे. कारण तिलाच नऊ महिने गरोदरपणांत जबाबदारी घ्यावयाची असते. व प्रसूतिवेदना तिलाच सहन करावयाच्या असतात. अपत्यजन्मानंतरहि पहिलीं कांहीं वर्षें स्त्रीलाच–मातेलाच–संगोपनाचें आवश्यक तें कार्य करावयाचें असतें. म्हणून वाङ्मयीन सृष्टींत मातेचा महिमा–

"जिच्या हातीं पाळण्याची दोरी, ती जगातें उद्धारी"

"स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी"

अशा काव्यपंक्तींत वर्णिला आहे. पत्नीच्या इच्छेप्रमाणेंच पतीच्या विचारालाहि स्थान आहे. जन्मास येणाऱ्या अपत्याचें संगोपनकार्य मुख्यतः आईला करावयाचें असतें, तर त्या संगोपनकार्यास व जबाबदारीस आर्थिक व भावनिक सुरक्षिततेचें पाठबळ मुख्यतः पित्यास उभें करावयाचें असतें. हें संगोपनकार्य व जबाबदारी उत्तम तऱ्हेनें पार पाडावयाची असल्यास दोन अपत्यांतील कालांतर व एकंदर अपत्यसंख्येची मर्यादा ही योग्य अशी असावी लागते. हें कालांतर व मर्यादा पतिपत्नींनीं आपलें उत्पन्न, कौटुंबिक जबाबदाऱ्या, घराची रचना–आकार, पतिपत्नींच्या शैक्षणिक आकांक्षा, आरोग्य, मुलांसंबंधीं अपेक्षा, त्यांचें आरोग्य, शिक्षण, विवाह व वृद्धापकाळांतील तरतूद आदि साऱ्या गोष्टींचा संपूर्ण सारासार व व्यापक विचार करूनच ठरवावयाची असते.

किती मुलें असावींत हें पतिपत्नींनीं ठरवावयाचें काम आहे. प्रत्येक कुटुंबासाठीं अमुक एक संख्या निश्चितपणें सांगणें शक्य नाहीं. पण दोन वा तीन मुलें असावींत असें एक सर्वसाधारण मार्गदर्शक तत्त्व सांगतां येईल. एखाद्या कुटुंबांत जर याहून जास्त मुलें असलीं तर लगेच तें अनियंत्रित कुटुंब आहे असें म्हणतां येणार नाहीं. सर्व मुलांना किमान संधि, आरोग्य, शिक्षण लाभलें आहे किंवा नाहीं हा खरा प्रश्न आहे. मुलांची संख्या, वरील गोष्टी व पतिपत्नींची इच्छा व विचार यांत एक सूत्र राखलें पाहिजे. हें सूत्र व मेळ जेव्हां प्रत्येक कुटुंबाच्या पातळीवर साधला जाईल तेव्हांच तो राष्ट्रीय पातळीवरहि साधला जाण्याची सुरुवात होईल.

आर्थिक ओढाताण

आर्थिक बाबतींतील झगडा सध्या तीव्र झाल्यामुळें कुटुंबप्रमुखास घरांतील मुलांच्या भावनिक वाढीकडे फारसें लक्ष देता येईनासें झालें आहे. आईवडील उदरनिर्वाहासाठीं घराबाहेर पडल्यानंतर घराकडे थोडेसें दुर्लक्ष होणें अगदी स्वाभाविक आहे. घरांतील मुलांची संख्या ही जर प्रमाणाबाहेर असली तर आर्थिक दुरवस्थेच्या पोटीं मुलांच्या भावनिक सवयींना योग्य व आवश्यक असें वळण लागत नाहीं. तीं मुलें उपेक्षित

राहतात. उपेक्षित अवस्थेंतून हीं मुलें वाममार्गी होण्याची बरीच शक्यता असते. वाममार्गी मुलें हीं कुटुंबापासून कालांतरानें अलग होतात. कारण त्यांच्या समस्यांना तोंड देण्यासाठीं वेगळ्या प्रयत्नांची, वेगळ्या संस्थांची जरूरी असते. शिक्षण, आरोग्य, संस्कार, वळण यापासून वंचित झालेलीं मुलें हीं सामाजिकदृष्ट्या समस्या बनतात. अशा मुलांचें शिक्षण, आरोग्य रोजगारी व पुनर्वसन असे चतुर्विध प्रश्न समाजकार्य करणाऱ्या संस्थांना सोडवावयाचे असतात. अशा मुलांची संख्या जेव्हां व्यापक स्वरूप धारण करते तेव्हां तें सामाजिक कार्याना एक प्रकारचें आव्हान असतें. अनियोजित कुटुंबांतूनच असे सामाजिक प्रश्न निर्माण होत असतात.

परिवाराचें आरोग्य

आरोग्य हा परिवाराचा मूलाधार आहे. तें जर उत्तम असेल तरच जीवनांतील संपत्तीला, प्रतिष्ठेला व सुखसोयींना कांही अर्थ आहे. आरोग्याची व्याख्या आजच्या यंत्रयुगांत केवळ शारीरिक आरोग्यापुरतीच राहिली नाहीं तर ती मानसिक व सामाजिक क्षेत्रांसहि लागू आहे. आरोग्याचा परिणाम मनावरहि होत असतो. शरीर सुदृढ असेल तरच मनहि निरोगी राहतें, हें खरें आहे. या दृष्टीनें परिवारनियोजनांत आई, वडील व मुलें यांच्या आरोग्यास विशेष स्थान आहे.

घरांतील स्त्रीची प्रकृति जर ठीक असेल तरच ती घरकाम व इतर आनुषंगिक जबाबदाऱ्या संभाळूं शकेल. स्त्रीचें आरोग्य वारंवारच्या प्रसूतीनें ढासळण्याची शक्यता व भीति असते. एका प्रसूतीनंतर स्त्रीला किमान २–३ वर्षेपर्यंत विश्रांति मिळावयास हवी. ही विश्रांति पुनः जरा गरोदरपण लवकर आलें नाहीं तरच स्त्रीला मिळूं शकते. गरोदरपणांत व प्रसूतींत स्त्रीच्या शरीरप्रकृतीवर ताण पडलेला असतो. हा ताण पर्यायानें मानसिकहि असतो. गरोदरपणांत स्त्रीचें मन दैनंदिन कामाच्या चिंता, आधीच्या मुलांची जबाबदारी, नवीनासंबंधीं कुतूहलयुक्त काळजी अशा संमिश्र भावनांनीं व्याप्त असतें. स्त्री प्रथमच गरोदर असेल तर मनाला अधिक चिंता असतात. कारण गरोदरपण संपून व्यवस्थित प्रसूति होईल किंवा नाहीं, नवबालक काय असेल, मुलगा कीं मुलगी, कसें असेल व पुढें कसें होईल, हे सारे प्रश्न स्त्रीच्या

मनांत वारंवार येत असतात. आपल्या देशांतील प्रसूत्योत्तर मृत्यूचें प्रमाण कमी नाहीं. म्हणून विवाहित स्त्रीला ४५ वर्षांपर्यंत गरोदरपणाविषयीं कांहीं तरी नियोजन, नियम, विचार करावा लागतो. त्या दृष्टीनें अंतराअंतरानें मुलें होऊं देणें महत्त्वाचें आहे. म्हणजे झालेल्या मुलाकडे, स्वतःच्या प्रकृतीकडे, इतर मुलांकडे व पतीकडे योग्यसें लक्ष स्त्री देऊं शकेल. कारण नवीन अपत्य जन्मलें कीं, इतर भावंडांनाहि आपल्या मातृप्रेमांत आणखी एक वाटेकरी आला आहे असें हळू हळू वाटायला लागतें. म्हणजे भावंडांमधील प्रेम आणि आई व नवजात बालक यांचा जिव्हाळा एक नवीन स्वरूप धारण करतो.

वैद्यकीय शास्त्राच्या दृष्टीनें जशी गरोदरपणाची संख्या वाढत जाते, तसा बाळंतपणानंतरच्या मृत्यूचा धोकाहि वाढतो. ४ थ्या बाळंतपणाच्या वेळीं पहिल्या वेळेइतकाच धोका असतो, तर ६ व्या खेपेस तो दुप्पट होतो. व १० व्या वेळेस तो पहिल्यावेळेच्या धोक्याच्या पांचपट होतो.

स्त्रीचें स्थान

ज्या स्त्रीपुरुषांना अपत्य नाहीं अशांनाहि योग्य तो सल्ला व मार्गदर्शन मिळावयास हवें. कारण कुटुंबनियोजनकार्यांत अपत्यहीनांनाहि स्थान आहे. किंबहुना ती एक नवीन जुळवणूकच असते. पतीलाहि आपण दुर्लक्षिलें जात आहोंत असें वाटतां कामा नये याची काळजी पत्नीला घ्यावी लागते. स्त्रीला मुलें व पति यासंबंधींच्या प्रेम-जिव्हाळ्यांत एक प्रकारचें तारतम्य व विवेक राखावा लागतो. यांत्रिक संस्कृतीच्या उदयानंतर स्त्रीपुरुष यांचें नातें केवळ पतिपत्नी एवढेंच राहिलें नाहीं. स्त्रीला स्वतंत्र व्यक्तित्व आहे, वेगळें अस्तित्व आहे, निराळें कर्तृत्व आहे. आणि म्हणूनच तिचें स्थान बदललें आहे. स्त्रीपुरुष संबंधांत एक प्रकारची समता निर्माण झाली आहे. स्त्री ही केवळ घरांतच राहणार नाहीं. घराबाहेरील अनेक क्षेत्रांत ती आपल्या कुवतीनुसार कर्तृत्व दाखवूं शकते. स्त्रीला आपलें कर्तृत्व व व्यक्तित्व प्रकट करतां यावें म्हणून तिच्या जबाबदाऱ्या मर्यादित व योग्य प्रमाणांत राहिल्या पाहिजेत. कुटुंबनियोजनामुळें स्त्रीला आपलें व्यक्तित्व व कर्तृत्व दाखविण्यास अधिक अवसर व संधि लाभणार आहे. कारण मग तिचा जन्म 'रांधा, वाढा' यासाठीं नसून

व्यक्तिविकासाच्या कामीहि लागणार आहे. ग्रामीण स्त्रीच्या बाबतींत तर कुटुंबनियोजनाची अत्यंत आवश्यकता आहे. ग्रामीण स्त्रीची परिस्थिति जरा वेगळी आहे. ग्रामीण स्त्रीचें दुःख नागरी स्त्रीपेक्षां अधिक आहे. आपल्या देशांतील ग्रामीण समाज सहस्र वर्षे अजगराप्रमाणें सुस्त पडला आहे. दुष्ट रूढींचें दास्य, आर्थिक दैन्य व कौटुंबिक दुःख यांनीं तो गांजलेला आहे, पीडलेला आहे. अशा ग्रामीण परिस्थितींतील स्त्री ही अधिकच उपेक्षित, दुर्लक्षित व संधि व सोयी यांना वंचित राहिली आहे.

आरोग्यानंतर शिक्षणाचा विचार करूं. शिक्षण हें मुलांना जीवनांत स्वतःच्या पायावर उभें करण्यासाठीं एक साधन आहे. हें साधन मिळवून देतांना आईवडिलांना आर्थिक स्थितीचाही विचार करावा लागतो. आपल्या मुलांपैकीं प्रत्येकानें कोण व्हावें, कोणता व्यवसाय ध्यावा, कोणतें शिक्षण ध्यावें, हयाची योजना आईवडिलांना करावी लागते. मुलांची संख्या आर्थिक उत्पन्नाच्या मानानें मर्यादित असेल तर मुलांना योग्य तें मनाजोगतें शिक्षण देतां येईल, नाहींतर मुलांच्या शिक्षणांत–पदवींत समतोल व समान संधितत्त्व राहणार नाहीं. कारण प्रत्येकाला समान संधि पैशाअभावीं देतांच येणार नाहीं. म्हणजे मुलांचा विकास, मुलांचें जीवन हें खुरटल्यासारखें होईल. अंतीं परिवाराचें जीवन हें प्रगतिशील राहणार नाहीं. कुटुंबांतील सर्वांनाच सारख्या, समान संधि शिक्षणाच्या बाबतींत मिळूं शकणार नाहीं.

कुटुंबनियोजनामुळें कुटुंबाचें जीवनमान वाढण्याची बरीच शक्यता असते. कारण थोडे उत्पन्न आधीपेक्षां अधिक लोकावर खर्चिले गेले की बचत, शिल्लक कांही राहणार नाही. तेंच उत्पन्न मर्यादित वाजवी संख्येवर विभागले कीं बचत वाढेल, शिल्लक वाढेल आणि कांहीं काळांनंतर कुटुंबांत इतर नवीन गोष्टींवर खर्च होऊ लागेल. जीवनमान वाढविण्याचें दृष्टीनें, चांगले छंद, हौस हे पुरविण्याचें दृष्टीनें पुरेसा खर्च केला जाण्याची परिस्थिती व सोय निर्माण होईल. पैसा असेल तरच नवीन सोयी, नवीन आवडी, नवीन वस्तु घेता येतात, एरव्ही नाही. यामुळें कुटुंबांत अधिक आनंद, कार्यक्षमता, उत्साह निर्माण होईल,

मर्यादित कुटुंब राहिलें म्हणजे कांही काळानंतर बेकारी, अर्धबेकारीचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर राहणार नाही. असलेल्या लोकसंख्येला भरपूर काम देता येईल. आर्थिक व्यवस्थेवर बेकारांच्या प्रचंड संख्येचा ताण राहणार नाही. उंचावलेलें जीवनमान कार्यक्षमता वाढवून अधिक उत्पादनास प्रेरक ठरेल व त्यामुळें मोठ्या प्रमाणावर भांडवलनिर्मिति होईल आणि अवघ्या राष्ट्राचें आर्थिक जीवन, रोजगारी, उद्योगधंदे सुधारण्यास मदत होईल.

कुटुंबनियोजनाचें उद्दिष्ट सर्वांगीण विकासाचें आहे. देशांतील राष्ट्रीय बचतींत भर, आर्थिक जीवनांत सुधारणा, वैयक्तिक पारिवारीक जीवनांत आरोग्य, शिक्षण व उत्पन्न यांचा समतोल ह्या गोष्टी साध्य होतील व म्हणून कुटुंबाचें सुखी, समृद्ध जीवन, या बरोबरच ग्रामीण व नागरी स्त्रीचा बौद्धिक व सांस्कृतिक विकास होईल. आजवर स्त्री, विशेषतः ग्रामीण स्त्री कौटुंबिक जबाबदारीनें व काळजीनें व्यथित होती. नवें कांहीं पहावें, नवें कांहीं शिकावें, नवें कांहीं अनुभवावें असें तिला कांहीं वेळा वाटत असूनहि फारसें केव्हांच शक्य झालें नाहीं. ती आज नवें कांहीं अनुभवेल, नवजीवनाचा थोडासा प्रत्यय घेईल व कांहींसें भरीव, वेगळे तिच्या हातून घडेल अशी परिस्थिती निर्माण होऊं शकेल. तसेंच पुरुषाची, मुलांची व पर्यायानें कुटुंबाची व समाजाची नवी वाटचाल सुरू होईल. या वाटचालीमागील दृष्टि नवी, आधुनिक व पुरोगामी आहे. ही नवीन दृष्टि शोधण्यास पाश्चिमात्य व आपल्या देशांतील विचारवंतांचे, समाजसुधारकांचे प्रयत्न कारणीभूत झाले आहेत. त्या प्रयत्नांची माहिती आपण पुढील प्रकरणांत घेऊ.

* * *

५ : : कुटुंबनियोजनाची पार्श्वभूमि

कुटुंबाचें नियंत्रण व मर्यादा ही कल्पना प्राचीन काळापासून आजतागायत चालत आली आहे. आपल्या देशांत फार पूर्वीपासून यासंबंधीं विचार केलेला होता. बृहदारण्यक उपनिषद् व इतर संस्कृत ग्रंथांत या संबंधीं उल्लेख व माहिती आहे. गर्भधारणा टाळण्यासाठीं कांहीं उपाय सुचविले आहेत.

आधुनिक काळ

१९ व्या शतकांत औद्योगिक क्रांति झाली. विज्ञानयुगास प्रारंभ झाला. शास्त्रांत, तंत्रांत सुधारणा झाली, प्रगति झाली. नवीन शोध लागले. वैद्यकीय शास्त्रांत प्रगति होऊन प्राप्त झालेल्या नवीन उपचार-औषधांमुळें मानवी जीवन अधिक सुरक्षित व स्वास्थ्यमय झालें. असाध्य रोगांना यशस्वीरीत्या तोंड देणें शक्य झालें. माणसाचें आयुष्य वाढलें मृत्यूचें प्रमाण कमी झालें. त्यामानानें जन्मप्रमाण फारसें कमी झालें नाहीं. त्यामुळे लोकसंख्येंतील घट बरीच कमी झाली, पण वाढ फारशी कमी झाली नाहीं. म्हणून कमी मृत्यु, अधिक जन्म यामुळें लोकसंख्या वाढ झाली. लोकसंख्यावाढीचा नवीन प्रश्न निर्माण झाला. आणि त्या प्रश्नास आज कांहीं देशांत यक्षप्रश्नाचें स्वरूप प्राप्त झालें.

लोकसंख्यावाढीवर उपाय

लोकसंख्यावाढ कमी व्हावी म्हणून अनेक उपाययोजना निघाल्या. बालहत्या ही युरोपांत ख्रिस्ती काळापर्यंत प्रचलित होती. जपानमध्यें बालहत्येची प्रथा १९ व्या शतकाच्या आरंभापर्यंत टिकली होती. जन्मनियंत्रणाच्या अनेक पद्धति जगांतील अनेक देशांत माहीत होत्या, व त्या कमीअधिक प्रमाणांत पाळल्या जात. त्यांत सर्व प्रकार होते. कृत्रिम उपायांचा अवलंब, जादूटोणा, मंत्रतंत्र, यांचा प्राचीन संस्कृत, चिनी, जपानी, व इस्लामी ग्रंथांत आणि ॲरिस्टॉटल व सोरेनीस यांच्या लिखाणांत उल्लेख आहे. यावरून कुटुंब मर्यादित ठेवण्याची

लोकांची तीव्र इच्छा दिसून येते. पण कुटुंबनियोजन ही मोहीम अशा स्वरूपांत सुरू झाली नव्हती.

पाश्चात्य देशांतील विचारमंथन

पाश्चिमात्य देशांत कुटुंबनियोजनकार्यास मोहिमेचें स्वरूप येण्यापूर्वी वैचारिक जागृति करण्याचें कामीं थॉमस माल्थस, जॉन स्टुअर्ट मिल, फ्रॉन्सिस प्लेस, चार्लस ब्रॅडलॉ, श्रीमती ॲनी बेझंट, जॉर्ज ड्राईस्डेल, प्रो. हाईम्स् यांचे ग्रंथ, पुस्तिका व प्रकाशनें यांचा वाटा मोठा आहे. थॉमस माल्थसच्या लोकसंख्येबद्दलच्या पुस्तकानें १९ व्या शतकांतील बुद्धिजीवी वर्गावर चांगलाच पगडा बसविला. माल्थसची विचारप्रणाली ही नंतरच्या तंत्रविद्येच्या प्रसारामुळें, शोधांमुळें बरीचशी लंगडी पडली. परंतु लोकसंख्यावाढीचा मूळ प्रश्न कायमच राहिला. १८५७ सालीं चार्लस् ब्रॅडला व श्रीमती ॲनी बेझंट यांनीं केल्टनचें 'फ्रूट्स् ऑफ फिलॉसफी' हें पुस्तक इंग्लंडमध्यें प्रसिद्ध केलें. व त्यामुळें त्यांना अटक करण्यांत आली. त्यांच्या खटल्यामुळें लोकमत जागृत झालें व तें कुटुंबनियोजनाच्या बाजूनें विचार करूं लागलें. कोर्टानें त्यांच्या बाजूनें निकाल दिल्यामुळें कुटुंबनियोजन-साधनांसंबंधी माहिती सांगण्याचा, प्रचार करण्याचा लोकांचा हक्क प्रस्थापित झाला.

पुढे ड्रायस्डेल, ब्रॅडला व ॲनी बेझंट यांनीं 'माल्थुसीयन लीग' नांवाची संस्था स्थापन केली. या संस्थेच्या अनेक शाखा ठिकठिकाणीं सुरू झाल्या व त्यांचेतर्फे मर्यादित कुटुंबाचा व कुटुंबनियंत्रणाचा प्रचार व चर्चा अगदी मोकळेपणानें होऊं लागली. १८७६-१८९१ या पंधरा वर्षांच्या इंग्लंडमधील भावी कार्यासाठीं वैचारिक, तात्त्विक व बौद्धिक पार्श्वभूमि तयार करण्यासाठीं माल्थुसियन लीग, केल्टन यांनी व इतरांचे ग्रंथांनीं मोठीच कामगिरी बजावली. ग्रंथ, पुस्तिका यांनीं व चार्लस् ब्रॅडला व ॲनी बेझंट यांच्या प्रचारकार्यामुळें कुटुंबनियोजनासंबंधी बरीच लोकजागृति झाली.

डॉ. मारी स्टोप्स्

डॉ. मारी स्टोप्स् ही एक नवीन दृष्टीची महिला कुटुंबनियोजन

कार्यात पुढाकार घेऊं लागली. कुटुंबनियोजन, संततिनियमनाचें कार्य इंग्लंमधील जनमानसांत रुजविण्याची मोठी कामगिरी डॉ. स्टोप्स् यांनीं बजावली आहे. डॉ. स्टोप्स् यांनीं १९२३ सालीं मातांसाठीं केंद्र स्थापन केलें. मानवतेच्या भावनेनें डॉ. स्टोप्स् यांचें कार्य सुरू झालें. नको असलेल्या गरोदरपणापासून स्त्रियांना वाचवावें, ह्यासाठीं त्यांचे सारे प्रयत्न चालले होते. त्यांनीं नंतर विधायक संततिनियमन व वांशिक प्रगति-साठीं एक संस्था स्थापन केली. थोडयाच काळांत वॉलवर्थ महिला कल्याण केंद्र सुरूं झालें. डॉ. नॉर्मन हेअर यांचा या कल्याण केंद्राशीं संबंध होता १९३० सालीं हें केंद्र " नॅशनल बर्थ कंट्रोल असोसिएशन ऑफ इंग्लंड ' मध्यें समाविष्ट झालें. १९३९ सालीं त्या असोसिएशननें आपलें नांव बदलून " फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन " हें नांव स्वीकारलें. नांवांतील हा बदल विचारांतील प्रगति दाखवितो. पूर्वी बर्थ कंट्रोल हें नांव होतें. पण संततिनियमन करून भागणार नाहीं, कुटुंबनियोजनाचा समग्र दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे, हा नवा विचार मान्य झाल्यामुळेंच " फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ", म्हणजे " कुटुंबनियोजन मंडळ " असें नवें नांव धारण करण्यांत आलें. व त्यामुळें कुटुंबनियोजनाचें कार्य व्यापक झालें. केवळ संततिनियमन एवढेंच राहिलें नाहीं तर कुटुंबाच्या योजनेचा व्यापक विचार आतां त्या ठिकाणीं आला.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 930e2

अमेरिकेंतील कार्य

अमेरिकेंतील ह्या कार्याचें नेतृत्व श्रीमती मॉर्गारिट सँगर यांचेकडे जातें. श्रीमती सँगर व्यवसायानें परिचारिका व तडफदार वृत्तीच्या होत्या. अमेरिकेंत कुटुंबनियोजन मोहिमेचा मोठया प्रमाणावर प्रचार होण्यास त्यांचें प्रयत्न मुख्यतः कारणीभूत झाले आहेत. ह्या कामाचें स्वरूप व भर कांहीं काळानंतर संततिनियमनावरून कुटुंबनियोजन, नियोजित कुटुंब-रचना याकडे गेला. जीवनाचे प्रश्न अपत्याच्या संख्येभोवतीच फिरत नाहींत, त्याचे स्वरूप व्यापक, जीवनस्पर्शी आहे. सर्वच तरुण स्त्रीपुरुषांना (विवाहित व विवाहबद्ध होणारे)–विवाहपूर्व मार्गदर्शन, सल्ला, माहिती मिळण्याची आवश्यकता असते. हा बदल, १९४२ सालीं श्रीमती सँगर

यांच्या संस्थेच्या 'प्लॅन्ड पेरेंटहुड फेडरेशन् ऑफ अमेरिका' या नांवांत दिसून आला.

१९४६ मध्यें स्वीडनमधील कुटुंबनियोजन कार्याच्या प्रमुख श्रीमती इलीस जेन्म्सन यांच्या प्रयत्नानें 'इंटरनॅशनल प्लॅन्ड् पेरेंट्हुड कमिटी' स्थापन झाली. पुढे १७ सदस्य देशांची 'इंटर नॅशनल प्लॅन्ड पेरेंटहुड फेडरेशन' निर्माण झाली. ह्याच सुमारास वंशसुधारशास्त्रज्ञांनीं कुटुंब-नियोजन कार्यास पाठिंबा दिला. व त्यामुळें वंशसुधारशास्त्र कुटुंबनियोजन-कार्यांत सहभागी झालें.

भारतांतील व महाराष्ट्रांतील कार्य

भारतांतील परिवार नियोजन कार्याचें नेतृत्व कै. प्रो. रघुनाथ धोंडो कर्वे यांच्याकडे जातें. अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत त्यांनीं संततिनियमनाच्या कार्यास सुरुवात केली.. आपल्या कार्यांच्या प्रचारासाठीं त्यांनीं 'समाज-स्वास्थ्य' या नांवाचें मासिक अनेक वर्षे चालविलें. व १९२५ सालीं मुंबईत १ लें कुटुंबनियोजन केंद्र चालूं केलें. समाजस्वास्थ्यकारांना तत्कालीन परिस्थितीचा प्रखर विरोध सहन करावा लागला. व स्वमतासाठीं, विचारासाठीं व कार्यासाठीं विल्सन कॉलेजमधील नोकरी १९२५ सालींच सोडावी लागली. कारण कॉलेज अधिकाऱ्यांना प्रो. कर्वे यांचा संततिनियमनासंबंधीचा विचार मान्य नव्हता व त्यांनीं त्या प्रचारास हरकत घेतली. 'समाजस्वास्थ्य' मधील लेखांची महाराष्ट्रांत या कार्यासंबंधी जागृती निर्माण करण्यास मोठीच मदत झाली आहे. कै. र. धों. कर्वे यांचे कार्य मिशनरी वृत्तीनें बुद्धिवादी निष्ठेनें व समाज-सुधारकांच्या तळमळीनें भरलेलें होतें. म्हणून भारतीय कुटुंबनियोजन कार्याच्या इतिहासांत कै. प्रो. र. धों. कर्वे यांचें स्थान अग्रभागी राहील.

इतरत्र प्रयत्न

कांहीं वर्षांनीं मद्रासमध्यें 'निओ माल्थुसीअन लीग' ही संस्था स्थापन झाली. ११ जून १९३० रोजीं म्हैसूर सरकारनें राज्यांतील पहिलें संततिनियमन केंद्र सुरू करण्याविषयी हुकूम काढला. आणि जगांतील सर्वप्रथम सरकारी केंद्र सुरू करण्याचा मान मिळविला. १९३२ सालीं

मद्रास विद्यापीठाच्या प्रतिनिधिमंडळानें कुटुंबनियोजन–साधनांचें शिक्षण देण्याची सूचना मान्य करून शैक्षणिक दृष्टया या कामांत पहिलें व महत्त्वाचें पाऊल टाकलें. १९३३ सालीं मद्रास सरकारनें सबंध प्रांतांत संतति-नियोजन केन्द्रें उघडण्याची योजना मान्य केली. संततिनियोजनाच्या प्रचारास आता थोडेसें विस्तृत स्वरूप आलें. महिला संस्थाहि या कामासाठीं पुढें आल्या. जानेवारी १९३२ मध्यें अखिल भारतीय महिला परिषदेनें लखनौ येथील अधिवेशनांत असें आग्रहपूर्वक मांडलें की "मान्यता मिळालेल्या केंद्रामधून स्त्री–पुरुषांना संततिनियमनाचीं साधनें वापरण्यासंबंधीं माहिती देण्यांत यावी."

१ डिसेंबर १९३५ रोजीं मुंबईत 'सोसायटी फॉर दी स्टडी अँड प्रमोशन ऑफ फॅमिली प्लॅनिंग' ही संस्था स्थापन झाली. कुटुंबनियोजनाचा अभ्यास व प्रसार यासाठीं ही संस्था काम करूं लागली. लेडी कावसजी जहांगीर ह्या या संस्थेच्या पहिल्या अध्यक्ष होत्या. ले. क. साहिबसिंग सोखी यांनीं एकवेळीं या कामांत बराच पुढाकार घेतला. कुटुंबनियोजन कार्याचें लोण हळूहळू मुंबईच्या कामगार विभागांतही पोहोचलें. व १९३६ सालीं परळ येथें कापडगिरणी भागांत स्त्रियांसाठीं पहिलें मोफत केंद्र सुरू झालें. पारेख हॉस्पिटल (सँण्डर्स्टरस्ता, मुंबई) चें संतति नियमन केंद्र डिसेंबर १९३७ मध्यें सुरूं झालें. केंद्राच्या कामाबरोबरच कुटुंबनियोजन कार्याचें शिक्षण देणें आवश्यक होतें. यासाठीं कै. डॉ. पिल्ले यांनी शिक्षणवर्ग सुरू केले.

आर्थिक नियोजन व कुटुंबनियोजन

हिंदी राष्ट्रीय सभेनें १९३५ सालीं राष्ट्रीय नियोजन समिति स्थापन केली. समितीचे अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू होते. समितीनें कुटुंबनियोजनासंबंधीं स्पष्टपणें शिफारसपूर्वक म्हटलें आहे कीं "सामाजिक अर्थव्यवस्था, कौटुंबिक सुख, राष्ट्रीय नियोजन यासाठीं कुटुंबनियोजन व मुलांची मर्यादित संख्या आवश्यक आहे आणि सरकारनें या कार्यास चालना व प्रोत्साहन देण्यासाठीं धोरण आखावे. संततिनियंत्रणाच्या स्वस्त व सुलभ साधनांच्या माहितीचा प्रचार व आग्रह अगत्याचा आहे.

संततिनियोजनकेन्द्रें सुरू करावींत व उपद्रवी साधनांचा वापर व जाहिरात यांना प्रतिबंध करण्यासाठीं आवश्यक ते उपाय योजले जावेत. वेडचा वा तज्जन्य सांसर्गिक रोगानें पछाडलेल्या रोग्यांची संततिप्रतिबंधक शस्त्र-क्रिया करण्याचा वंश-सुधार-कार्यक्रमांत समावेश असावा." आपल्या देशांतील सर्वांत मोठ्या राजकीय पक्षानें संततिनियमनाचा एवढ्या निःसंदिग्धपणें पुरस्कार करावा, ही घटना आगामी घडणाऱ्या गोष्टीची व धोरणाची चाहूलच होती असें म्हणावयास हरकत नाहीं.

१९३९ सालीं उत्तरप्रदेशांतील "बर्थ कंट्रोल वर्ल्ड वाइड" ने व उज्जैनेच्या मातृ सेवा संघानें संततिनियमनकेन्द्रें सुरू केलीं. १९४० सालीं अशीं केन्द्रें सुरू करण्यासंबंधींचा ठराव भारताच्या राज्य परिषदेंत (Council of States) श्री. पी. एन. सप्रू यांनीं मांडून तो पास करवून घेतला. याचवेळीं लंडनमधील फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनच्या वतीनें श्रीमती वेना दत्त यांनीं संततिनियमन-मोहीम संघटित करण्यासाठीं भारतभर मोठा दौरा काढला. १९४६ सालीं भारत सरकारच्या हेल्थ सर्व्हे व डेव्हलपमेंट समितीनें मातांना वैद्यकीय मदत देणाऱ्या प्रसूतिकेंद्रें, बालकल्याणकेंद्रें, दवाखानें, रुग्णालयें व सार्वजनिक संस्था आदींना कुटुंबनियोजनाचा प्रचार करण्याची शिफारस केली. गरोदरपण उपद्रव-कारक (मातांना व मुलांना) होईल अशा स्त्रियांनाहि कुटुंबनियोजन-विषयक सूचना देण्याची शिफारस या समितीनें केली.

रूढ समजुतींचा अडसर

कुटुंबनियोजनासारख्या वैयक्तिक व नाजूक प्रश्नासंबंधी लोकांच्या मनांत गैरसमज असणें स्वाभाविक आहे. 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा आशीर्वाद नवविवाहितांना मिळणाऱ्या व मुलगा हा वंशसातत्याचें साधन आहे असें मानणाऱ्या आपल्या देशांत मुलें ही ईश्वराची देणगी आहे, जो चोंच देतो तो चाराहि देईल असें मानलें जातें. जीवनांत जें जें घडत राहील तें तें ईश्वरी इच्छेमुळें-दैवामुळें होत आहे, असें आपल्या देशांत मानलें जातें. कन्याजन्माची घटना आपल्या देशांत फारशी आनंदाची मानली जात नाहीं. या देशांत मुलाला महत्त्व आहे. पुत्राचें कर्तृत्व हीच

कौतुकाची बाब मानली जाते. म्हणजे स्त्रीचें कुटुंबव्यवस्थेंतील स्थान हें दुय्यम दर्जाचें आहे. स्त्रीच्या सुखदुःखाचा, हालअपेष्टेचा, अडचणीचा विचार सहानूभूतिपूर्वक जेवढ्या मोठ्या प्रमाणांत व्हावा तेवढा आपल्या देशांत होत नाहीं. वास्तविक पाळणा लांबविणें हा शब्दप्रयोग रूढ असला तरी कुटुंबनियोजन म्हणजे अंतराअंतरानें मुलें होऊं देणें, हवेसें वाटणारें मूल होऊं देणें, हा विचार आपल्या शहरी व खेडूत लोकांना अद्याप योग्य तऱ्हेनें पटला नाहीं. कुटुंबनियोजनकार्य हें अंतीं कामवासना, विवाह व परिवार यासंबंधीं एक नवी दृष्टि, नवा आचार, विचार-प्रणाली जनमानसांत रुजविण्याचें काम आहे. या कामांत अनंत अडचणी आहेत. त्याचा विचार स्थिर वैचारिक पातळीवर व्हावयास वेळ लागतो. हें काम झटपट रंगाऱ्यासारखें नाहीं सातत्यपूर्वक व्यवस्थित, पद्धतशीर प्रयत्नांची आवश्यकता या कामांत आहे. ही एक चळवळ आहे. या चळवळींत स्वातंत्र्योत्तर कालांत आपल्या सरकारनें प्रमुख भाग घेतला आहे. त्याचा तपशील पुढील प्रकरणांत पाहूं.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक ३५८०० दिनांक १२-८-५८
वर्गांक १५१५ नोंद दि. १५-८-५८

६ : स्वातंत्र्योत्तर काळांतील प्रयत्न

१५ ऑगस्ट १९४७ रोजीं आपला देश स्वतंत्र झाल्यानंतर देशाच्या विकासासाठीं सर्व क्षेत्रांत नवीन योजना आंखण्यांत येत आहेत व त्या अंमलांत आणण्यासाठीं निरनिराळे कार्यक्रम सुरू झाले आहेत. मार्च १९५० मध्यें भारत सरकारनें राष्ट्रीय नियोजन मंडळाची नेमणूक केली. नियोजन मंडळ देशाच्या सर्वांगीण विकासासाठीं अनेक योजना–कार्यक्रम आखूं लागलें. मंडळाच्या आरोग्य–कार्यक्रम–समितीनें ११ एप्रिल १९५१ रोजीं लोकसंख्यावाढ व कुटुंबनियोजन यासंबंधीं अहवाल तयार करण्यासाठीं एक उपसमिति नेमली. या उपसमितीचा अहवाल वर्षभरांत पूर्ण झाला. त्यांतल्या शिफारशींप्रमाणें दोन समित्यांच्या नेमणुकीची सूचना पुढें आली. (१) लोकसंख्या–धोरण आणि (२) लोकसंख्या–संशोधन व कार्यक्रम या दोन विषयांसाठीं त्या समित्या सुचविल्या गेल्या.

कुटुंबनियोजनाबाबतचा दृष्टिकोन

या आधीं जागतिक आरोग्य संघटनेच्या वतीनें डॉ. अब्राहाम स्टोन यांना भारत सरकारनें 'सुरक्षित काळ साधना'च्या अभ्यासाच्या योजनेबाबत सल्लागार म्हणून बोलाविले. त्यावेळचे शिरगणतीप्रमुख श्री. गोपाल स्वामी यांनीं शिरगणती–अहवालांत संततिनियमनाची आवश्यकता आग्रहपूर्वक मांडली होती. या सर्व सूचना, अहवाल, उपसमित्यांचें काम यांचा परिणाम म्हणून नियोजन मंडळानें डिसेंबर १९५२ मध्यें कुटुंब-मर्यादा व लोकसंख्यानियमनाच्या त्रिसूत्री–कार्यक्रमाची शिफारस केली : (१) भारतांतील जलद लोकसंख्यावाढीस कारणीभूत झालेल्या परिस्थितीची अचूक माहिती मिळविणें. (२) संततिनियमनाचीं योग्य साधनें शोधून काढणें व त्यांचा देशाच्या कानाकोपऱ्यांत प्रसार व्हावा यासंबंधी उपाययोजना करणें. (३) संततिनियमनाचें काम हें सरकारी रुग्णालयें व सार्वजनिक आरोग्यसंस्था यांच्या कामाचा अविभाज्य भाग बनविण्याच्या दृष्टीनें मार्गदर्शन करणें.

सरकारी पातळीवर प्रयत्न करणारा पहिला देश

नियोजन मंडळानें पहिल्या पंचवार्षिक योजनेंत कुटुंबनियोजनाच्या कार्यासाठीं पासष्ट लाख रुपयांची तरतूद केली. ही रक्कम पुरेशी होती कीं नव्हती हा वादाचा मुद्दा असला तरी हें काम सरकारी पातळीवर सुरू करणारा भारत हा पहिलाच देश आहे.

सरकारनें नेमलेल्या "कुटुंबनियोजन–संशोधन व कार्यक्रम समिती"नें या प्रश्नाबाबतची भूमिका स्पष्ट शब्दांत मांडलेली आहे. ती थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे. कुटुंब हा समाजाचा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. तेव्हा संततिनियमन किंवा दोन मुलांत वयाचें अंतर भरपूर असणें एवढ्याच अर्थानें या प्रश्नाकडे पाहिलें जाऊं नये. तर कुटुंबाचा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास होण्याला अनुकूल वातावरण निर्माण करणें हें कुटुंबनियोजनाच्या कामाचें ध्येय असलें पाहिजे. त्या दृष्टीनें केवळ संततिनियमनावर भर देऊन चालणार नाहीं, तर लैंगिक शिक्षण, विवाह–मार्गदर्शन व वैवाहिक आरोग्य, दोन मुलांत अंतर ठेवण्यासाठीं माहिती, इत्यादि कुटुंबकल्याणास आवश्यक त्या सर्व गोष्टींचा कुटुंबनियोजन कार्यक्रमांत अंतर्भाव झाला पाहिजे. वंध्यत्व दूर करण्याची सोयहि या कार्यक्रमांत असावी असेंहि या समितीनें म्हटलें आहे.

नजिकच्या भविष्यकाळांत मात्र कुटुंबमर्यादेसाठीं मुलांत अंतर ठेवण्यासंबंधीच मुख्यतः सल्ला व मार्गदर्शन द्यावें लागेल.

दोन योजनांतील कार्य

पहिल्या पंचवार्षिक योजनेचे प्रमुख तज्ज्ञ योजनाकार व अर्थशास्त्रज्ञ या मंडळींनीं लोकसंख्यावाढीचें गांभीर्य जाणून रु. ६५ लाख रकमेची तरतूद केली. या तरतुदीनुसार राज्य सरकारांना, आठ स्थानिक संस्थाना, व ३५ समान कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदानें देण्यांत आलीं. या काळांत २१ ग्रामीण केंद्रें व १२६ नागरी केंद्रें सुरू करण्यांत आलीं.

पहिल्या योजनेंत या कार्याची सुरवात झाली तर दुसऱ्या योजतनें त्यास अधिक गति आली. दुसऱ्या योजनेंत या कामासाठीं रु. ४.९७

कोटींची तरतूद करण्यांत आली होती. यापैकीं सर्वांत अधिक रक्कम प्रत्यक्ष साधनें घेण्यासाठीं होती. संततिनियमनाचें शिक्षण व संशोधन यांच्यासाठीं सारखेच म्हणजे जवळ जवळ रु. ५० लाख खर्च व्हावयाचे होते. २५०० केंद्रें ग्रामीण भागांत व ५०० केंद्रें नागरी भागांत सुरू करण्याचा संकल्प सोडला होता. प्रत्येक नागरी केंद्रें ५०,००० लोकवस्तीसाठीं व ग्रामीण केंद्र ६६,००० लोकसंख्येसाठीं काम करील.

१९६१ अखेर (म्हणजे दोन्ही योजनांत मिळून) नागरी भागांत ६७६ व ग्रामीण भागांत ११२१ केंद्रें स्थापन झालीं.

ग्रामीण भागांत प्रसार हवा

आपल्या देशांतील बहुसंख्य लोक (सुमारें ८२ टक्के) ग्रामीण भागांत राहतात. हा भाग अशिक्षित असल्यानें व इतर कांही कारणांनींहि तेथील लोकसंख्यावाढीचा वेग मोठा आहे. म्हणून देशाच्या लोकसंख्या-वाढीचा वेग नियंत्रित करायचा असेल तर मुख्यतः ग्रामीण भागावर लक्ष केंद्रित केलें पाहिजे. या प्रश्नाचें महत्त्व अधिकाधिक लोकांना समजलें पाहिजे. तो विचार कृतींत आणण्यासाठीं जनतेला मोठ्या प्रमाणावर शिक्षण देण्याची गरज आहे. त्यासाठीं दुसऱ्या योजनेंत सात प्रकारच्या शिक्षणकार्यक्रमांची सुरवात झाली असून ती योजना वाढविण्यांत आली आहे.

शिक्षणक्रम

१. या कामाचें संपूर्ण शिक्षण देण्यासाठीं शिक्षण केंद्र.

२. प्रात्यक्षिक, प्रायोगिक ग्रामीण केंद्र.

३. फिरते शिक्षण गट

४. निवडक केंद्रांचें प्रादेशिक–शिक्षण–केंद्रांत रूपांतर व वाढ.

५. कुटुंबकल्याण कार्यकर्त्यांसाठीं प्रादेशिक शिक्षण केंद्रें.

६. जेथें शिक्षित कार्यकर्तावर्ग व केंद्रसाहित्य उपलब्ध असेल तेथें छोट्या मुदतीचे शिक्षणक्रम.

७. डॉक्टर व त्यांना साहाय्य करणारे यांच्यासाठी असलेल्या नेहमीच्या शिक्षणक्रमांत कुटुंबनियोजनाचा समावेश करणें.

पहिल्या प्रकारचें शिक्षण केंद्र मुंबईला १९५७च्या जूनमध्यें सुरू झालें. या केंद्रांत डॉक्टर, समाजकार्यकर्ते व परिचारिका यांच्यासाठीं एक दोन महिन्यांचा अभ्यासक्रम असून आतांपर्यंत या केंद्रांतून हा अभ्यासक्रम ५०० हून अधिक प्रशिक्षणार्थींनीं पुरा केला आहे. अभ्यासक्रम पुरा केलेले डॉक्टर्स, समाजकार्यकर्ते, परिचारिका आपल्या क्षेत्रांत गेल्यानंतर कुटुंबनियोजनकार्य करीत आहेत व त्याचें शिक्षण इतरांना देत आहेत.

कुटुंबनियोजन कार्यांत संशोधनास भरपूर वाव आहे. त्या दृष्टीनें लोकसंख्याविषयक वैद्यकीय व जीवशास्त्रीय संशोधनासाठीं रु. ५० लाख रकमेची तरतूद दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत केली आहे. कुटुंब नियोजन साधनांसंबंधींचें संशोधन मुंबई, कलकत्ता, लखनौ येथील संशोधन केंद्रें आणि महाविद्यालयीन व पदव्युत्तर संस्थांमधून चालूं आहे. पोटांत घ्यावयाच्या गोळ्यासंबंधीहि संशोधन चालूं आहे.

तिसरी योजना

एप्रिल १९६१ पासून आपली तिसरी पंचवार्षिक योजना सुरू झाली आहे. या योजनेंत कुटुंबनियोजनास एक विशेष स्थान आहे. कारण तें काम आद्य महत्त्वाचें आहे असें मानलें गेलें आहे. व त्यासाठीं रु. ५० कोटींची तरतूद करण्यांत आली आहे. कुटुंबनियोजन कार्यक्रमांत शिक्षण, साधनांची निर्मिति, व प्रसार प्रचार यासाठीं हा खर्च होणार आहे. या कार्यक्रमास गति देण्यासाठीं पांच कलमी योजना मांडली गेली आहे. त्या योजनेचें ठळक स्वरूप पुढीलप्रमाणें आहे :

(१) कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम व्यापक करण्यासाठीं आवश्यक ती सामाजिक पार्श्वभूमि तयार व्हावी म्हणून शिक्षणाच्या द्वारा जनमत जागृत करणें. या कार्याच्या आवश्यकतेचा प्रचार करून जनतेला त्याचें महत्त्व पटविणें, व त्यासाठीं मानसिक व सामाजिक दृष्ट्या जनतेला तयार करणें.

(२) आरोग्यरक्षणाचा कार्यक्रम व कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम यांची सांगड घालणें.

(३) कुटुंबनियोजनाला मदत करण्यासाठीं सोयी उपलब्ध करणें, औषधोपचार केंद्रांतून शस्त्रक्रियेची सोय व कृत्रिम साधनांचें वाटप करण्याची व्यवस्था ठेवणें.

(४) वैद्यकीय महाविद्यालयें व इतर वैद्यकीय स्वरूपाच्या शिक्षण-विषयक कार्यक्रमांत वाढ करणें.

(५) कुटुंबनियोजनाच्या मोहिमेंत स्थानिक समाजसेवकांचा अधिकाधिक उपयोग करून घेण्याची व्यवस्था करणें.

कुटुंबनियोजनाचे मार्ग

कुटुंबनियोजन कार्यक्रमांत साधनांचें स्थान महत्त्वाचें आहे. कुटुंब-नियोजनाचीं साधनें दोन प्रकारचीं आहेत.

(१) नैसर्गिक व (२) प्रात्यक्षिक स्वरूपाचीं. नैसर्गिक प्रकारांत तीन मार्ग आहेत:

१) संभोग वर्ज्य

२) अपूर्ण संभोग

३) सुरक्षित काळीं संभोग

१. संभोग वर्ज्य

या प्रकारामध्यें जोपर्यंन्त मुलें होऊं नयेत असें वाटतें, तोपर्यंन्त पतिपत्नी संभोग अजिबात टाळतात. हा मार्ग सामान्य माणसाच्या दृष्टीनें बराच कठीण आहे.

मानसिक नियंत्रण व संभोगाविना जीवन घालविण्याची तयारी या दोन गोष्टींवर या मार्गाची यशस्विता अवलंबून आहे. हा प्रकार व मार्ग फार काळ पतिपत्नी स्वीकारूं शकणार नाहींत. कारण त्यामुळें दोघांच्याहि प्रकृतीवर मानसिक नियंत्रणामुळें अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता व संभव असतो.

२. अपूर्ण संभोग

या प्रकारामध्यें पुरुष संभोगसमयीं आपलें वीर्य स्त्रीयोनींत पडूं न

देण्याची खबरदारी घेतो. या मार्गांत स्त्रीपुरुषाच्या संभोगसुखांत अपूर्णता राहते. व पुरुषांत असमाधानवाढीचा संभव असतो.

३. सुरक्षित काळीं संभोग

या पद्धतीला "ताल" पद्धति किंवा इंग्रजीमध्यें रिदम (Rhythm) पद्धति म्हणतात. ही पद्धति पुढें दिलेल्या तीन मूलभूत गोष्टींवर आधारलेली आहे.

१) स्त्रीबीज महिन्यांत एकदांच तयार होतें.

२) आगामी मासिक स्रावाच्या पूर्वी १४ दिवस स्त्री बीज फॅलोपियन नलिकेमध्यें सरकलेलें असतें.

३) स्त्रीबीज त्या नलिकेमध्यें आल्यानंतर ४८ तासच जिवंत राहूं शकते. पुंबीज अधिकाधिक ७२ तास जिवंत स्थितींत राहूं शकतें. मासिक पाळीच्या चक्रामध्यें फक्त मधल्या ६–७ दिवसांच्या अवधींतच गर्भधारणा होऊं शकते. इतर दिवशीं संभोग केला तरी सुद्धा गर्भधारणा-होण्याची शक्यता बरीच कमी असते. ह्या पद्धतींत एक उणीव म्हणजे सुरक्षित काळाची अनिश्चिति. आजारपण, कामामुळें आलेला शीण, चिंता, काळजी, मानसिक त्रास आदि कारणानीं मासिक पाळी पुढें मागें होऊं शकते. त्यामुळें ह्या पद्धतींत नैसर्गिक चूक होण्याची बरीच शक्यता असल्यानें ह्या पद्धतीच्या यशाची खात्री देता येत नाहीं. सुरक्षित काळ सामान्यतः महिन्यांत १५ दिवसांचा असतो.

कृत्रिम साधनें

वरील तीनहि मार्ग या ना त्या कारणानें खात्रीशीर, निश्चित वा समाधानकारक नाहींत. म्हणूनच ते व्यवहार्य नाहींत. तेव्हां कृत्रिम साधनांचा वापर हा मार्ग अधिक उपकारक आहे.

साधनांच्या पद्धतीचें वैशिष्टय असें कीं गर्भधारणा जितका काळ नको असेल, तोंपर्यंत पाळणा लांबविण्यासाठीं साधनांचा वापर करता येतो. व ज्यावेळीं मूल व्हावेसें वाटेल तेव्हांपासून साधनांचा वापर करूं नये. साधनांचा वापर किती वर्षें करावयाचा हें प्रत्येक जोडप्यानें ठरवावयाचें असतें.

यापुढें मूल होऊंच नये असें वाटत असेल तर त्यासाठीं कायमच्या स्वरूपाचा शस्त्रक्रियेचा उपाय आहे. चांगलीं कुटुंबनियोजन साधनें हीं परिणामकारण, सुरक्षित व सुलभ असतात. साधनें दोन प्रकारचीं. (१) बीजनाशक व (२) बीजविरोधक आहेत. बीजनाशक साधनें पुंबीज व स्त्रीबीज यांची गाठच पडूं देत नाहींत. या प्रकारच्या साधनांत उपकरणें आहेत.

या कुटुंबनियोजन साधनांपैकी कांहीं साधनें फक्त पुरुषांनीं वापरावयाचीं असतात तर कांहीं फक्त स्त्रियांसाठीं आहेत. पुरुषाचीं साधनें– रबरी पिशवी (काँडॉम). स्त्रीनें वापरावयाचीं साधनें –

१) रबरी टोपी (डायफ्रॅम)

२) बीजनाशक मलम (जेली)

३) फेंसाच्या गोळ्या (Foam Tablets)

शस्त्रक्रिया

शस्त्रक्रिया हें कुटुंबनियोजनांतील अनेक साधनांपैकीं एक साधन आहे, एकमेव नव्हे. शस्त्रक्रियेनंतर संतति केव्हाच होणार नसल्यामुळें शस्त्रक्रिया (पुरुषाची वा स्त्रीची) करण्यापूर्वी मुलांची संख्या, मुलगे किती व मुली किती, त्यांचीं वयें, पुरुषाचें व स्त्रीचें वय, पुरुषाची, स्त्रीची व मुलांची प्रकृति, पति–पत्नींचीं लेखी संमति या बरोबर स्त्री-पुरुषांची मानसिक, भावनिक तयारी अजमावणेंहि आवश्यक व महत्त्वाचें आहे.

शस्त्रक्रियेनंतरचे संभाव्य मानसिक परिणाम पति-पत्नींना नीट समजावून द्यावे लागतील. एखाद्या स्त्रीचें वा पुरुषाचें वैवाहिक जीवनांतील अंतरीचें दुःख सहानभूतिपूर्वक समजून घ्यावें लागेल. ही सर्व प्रक्रिया जरा लांबची, दीर्घसूत्री असली तरी अंतीं ती पति-पत्नींच्या व कुटुंबाच्या हितासाठींच आहे. भारतांतील प्रचंड लोकसंख्या व तिच्या वाढीचा जलदवेग ध्यानांत घेतां योग्य स्त्रीपुरुषांच्या शस्त्रक्रियेस महत्त्वाचें स्थान आहे. पण सरसकट शस्त्रक्रिया हा मार्ग उपकारी ठरणार नाहीं. शस्त्रक्रियेस कांहीं काळापुरतेंच, लोकसंख्यावाढ रोखण्याच्या दृष्टीनें निर्णायक स्थान

आहे. पण शस्त्रक्रिया हा भारतीय वैवाहिक पद्धतींतील सांस्कृतिक भाग होऊं नये या दृष्टीनें कुटुंबनियोजन--साधनांचा प्रसार होणें हेंच अधिक श्रेयस्कर आहे.

मद्रास राज्याने शस्त्रक्रिया पद्धतीचा जोरदार प्रचार केल्यामुळें तेथील लोकसंख्या वाढ बरीच रोखली गेली आहे. महाराष्ट्र राज्यानें गेल्या एकदोन वर्षांत कुटुंबनियोजन मोहिमेंत शस्त्रक्रियेचा व्यापक प्रमाणावर प्रचार करून शस्त्रक्रियाशिबिरांचा उपक्रम सुरू केला आहे. यामुळें जनमानसांत नवी जागृति निर्माण करण्याचें काम मोठ्या प्रमाणावर होत आहे.

पण शस्त्रक्रियेच्या मार्गाची उपयुक्तता मान्य करूनहि असें म्हणावेसे वाटतें कीं जे स्त्री-पुरुष शस्त्रक्रियेसाठीं आज योग्य नाहींत, जे नवविवाहित आहेत किंवा जे लवकरच विवाहबद्ध व्हावयाचे आहेत अशा सर्वांसाठीं कुटुंबनियोजन साधनांची माहिती, मार्गदर्शन, सल्ला, प्रचार हें सारें अगदी व्यापक प्रमाणावर चांगल्या गतीनें, योग्य दिशेनें व्हावयास हवें. कुटुंबनियोजन साधनें व शस्त्रक्रिया यांच्या सुयोग्य तारतम्यांतूनच लोकसंख्यावाढीचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

नवा दृष्टिकोन स्वीकारण्याची आवश्यकता

कुटुंब नियोजन हा विचार आहे, तो एक दृष्टिकोन आहे. जगांतील कोणतेहि प्रश्न प्रभावी विचारपरिवर्तनानेंच सुटत असतात. हा विचार अधिकाधिक लोकांप्रत पोहोचविणें, ती कल्पना जनमानसांत रुजविणें हें कठीण काम आहे. फोर्ड फौंडेशनच्या साहाय्यानें लवकरच भारतांतील कांहीं प्रमुख ठिकाणीं कुटुंबनियोजन संशोधनकेंद्रें निघणार आहेत. या केंद्रांतून कुटुंबनियोजनाची कल्पना व विचार किती लवकर अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवून पटविता येईल, यासंबंधीं संशोधन होईल. कुटुंबनियोजनाचें कार्य हें अंतीं लोकशिक्षणाचें, समाजप्रबोधनाचें कार्य आहे. ह्यांतून समाजमानस बदलणार आहे.

लोकमत जागृत व्हावयाचें आहे. कुटुंब, विवाह, अपत्यें यासंबंधींची एक नवी दृष्टि, नवा विचार स्वीकारण्याची ही एक प्रक्रिया आहे. हें

कार्य झटपट रंगाऱ्याप्रमाणें होणार नाहीं. यक्षिणीची कांडी फिरविल्याप्रमाणें सारी परिस्थिति एकदम बदलणार नाहीं–तर त्यासाठीं सतत, सुव्यवस्थित, सुसूत्र प्रयत्नांची गरज आहे. कुटुंबनियोजन हा देशांतील अवघ्या जनतेचा कार्यक्रम आहे. जनतेच्या सहकार्याविना हा कार्यक्रम यशस्वी होणार नाहीं. हा कार्यक्रम यशस्वी झाल्यानंतर लोकसंख्येचा प्रश्न सुटण्यास साहाय्य होणार आहे.

त्यासाठीं विशेषतः ग्रामीण भागांतील लोकांनीं स्वतःची जबाबदारी ओळखली पाहिजे. लोकसंख्या प्रश्नाचें महत्त्व जाणून तें इतरांना पटवून दिलें पाहिजे, व त्यासाठीं आवश्यक ती उपाययोजना करण्याची त्यांची तयारी केली पाहिजे. ग्रामीण भागांतील राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, प्राथमिक व दुय्यम शिक्षक, समजदार शेतकरी, ग्रामसेवक, तलाठी, सहकारी सोसायटयांचे व ग्रामपंचायतींचे सेक्रेटरी यांनीं हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठीं सर्व दिशांनीं प्रयत्न केले पाहिजेत. सरकारनेंहि आपल्या कार्यक्रमांत या सर्वांचें सहकार्य घेण्याची तरतूद केली पाहिजे.

दुसरी बाजू

कुटुंबनियोजन ही लोकसंख्याप्रश्नाची एक बाजू आहे. लोकसंख्येची वाढ नियंत्रित करणें हें जसें आर्थिक विकासासाठीं आवश्यक आहे, तसेंच श्रमशक्तीची कार्यक्षमता वाढावी यासाठीं लोकांचें आरोग्य सुधारणें व त्यांना सर्वसाधारण आणि तांत्रिक शिक्षण देण्याची व्यापक प्रमाणावर सोय करणें याचीहि गरज आहे. आपलें लोकसंख्याविषयक धोरण ठरविताना सरकारी यंत्रणेनें याचाहि विचार केला पाहिजे, व त्याप्रमाणें कार्यक्रम आंखले पाहिजेत. आतापर्यंतच्या तिन्ही योजनांत यादृष्टीनें कांही तरतूद करण्यांत आली आहे हें खरें. पण लोकसंख्याप्रश्नाचाच तो एक भाग आहे–असें समजून त्याला योग्य तें महत्त्वाचें स्थान देण्याची गरज आहे अर्थात् त्याचा तपशीलवार विचार करणें या पुस्तकांच्या मर्यादेपलिकडचें आहे म्हणून इथे फक्त वरील सूचना करून ठेवणें एवढेंच उचित होईल.

अशा रीतीनें लोकांची-म्हणजेच श्रमशक्तीची कार्यक्षमता वाढविली कीं आपल्या आर्थिक विकासाच्या प्रयत्नांना विशेष बळकटी येईल. या व

इतर कार्यक्रमांमुळें वाढत जाणाऱ्या राष्ट्रीय उत्पन्नांतील वाटेकऱ्यांची संख्या बेताबेतानेंच वाढूं दिली म्हणजे सर्वसामान्य जनतेचें जीवनमान उंचावणें सुलभ होईल.

* * *

कुटुंबनियोजनाविषयीं नेहमी जे प्रश्न विचारले जातात, ज्या शंका मांडल्या जातात त्यांतील कांही निवडक प्रश्नांचीं व शंकांचीं उत्तरें पुढें दिलीं आहेत.

प्रश्न १ला–कुटुंबनियोजन म्हणजे काय ?

उत्तर–कुटुंबाची आर्थिक स्थिति, कुटुंबांतील इतर मुलांच्या गरजा, पत्नीची प्रकृति व अन्य कौटुंबिक अडचणी यांचा विचार करून पाळणा लांबविण्यासाठीं किंवा पाळणा थांबविण्यासाठीं केलेला साधनांचा वापर म्हणजे कुटुंबनियोजन होय. मुलें हीं केवळ देवाची देणगी असें न मानतां पतिपत्नींची शारीरिक, मानसिक व आर्थिक तयारी असतांना व आंतरिक इच्छा असतांना मुलांचा जन्म होऊं देणें म्हणजे कुटुंबनियोजन. शास्त्रीय साधनांचा वापर व्यवस्थित, योग्य त्या पद्धतीने केला तर कुटुंबनियोजन व्यवस्थितपणें होऊं शकतें.

प्रश्न २रा:–कुटुंबनियोजनाचा फायदा काय ?

उत्तर:–कुटुंबांतील सर्वच घटकांना कुटुंबनियोजनाचा फायदा होतो. मुलाला प्रेमळ आई-वडील लाभतात–कारण दोघांनाहि तें मूल हवेंसें असतें. त्यामुळें त्या मुलास आई-वडिलांचें प्रेम, माया, जिव्हाळा, आपुलकी, निगा, काळजी, या सर्व भावनांचा आधार मिळतो. हा आधार मुलांच्या वाढीच्या दृष्टीनें आवश्यक असतो. दुसरें गरोदरपण येण्यापूर्वी आईलाहि पुन्हा पुरेशी शक्ति मिळविण्यासाठीं संधि मिळते. गरोदरपणांत, प्रसूतीचे वेळीं व प्रसूत्योत्तर काळांत स्त्रीच्या शरीरांत एक प्रकारची घट झालेली असते ती घट भरून येण्यासाठीं कांही काळ जावा लागतो. आपण मुलाला व पत्नीला एक प्रकारची सुरक्षितता देऊं शकतों ह्या जाणिवेमुळें वडिलांना समाधान वाटतें. कुटुंबांतील एकमेकांचे संबंध प्रेमाचे राहतात. मुलांची संख्या मर्यादित ठेवली म्हणजे कुटुंबाचें जीवनमान घसरत नाही.

सर्व मुलांना शिक्षणाची चांगली संधि मिळते. त्यामुळें पुढें त्यांना बेकार राहण्याची पाळी येत नाही. म्हणून मूल, आई, वडील, इतर भावंडें या सर्वांच्या दृष्टीनें कुटुंबनियोजन हें निकडीचें व फायदेशीर आहे. विशेषतः स्त्रीला आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करतां येतो, कारण मुलांचें लेंढार ही तिच्या मार्गांतील धोंड दूर होते.

प्रश्न ३रा:–दोन मुलांमधील वयाचें अंतर किती असावें ?

उत्तर:–दोन मुलांमधील अंतर किती असावें हें ठरवितांना मुख्यतः आईची प्रकृति विचारांत घेतली पाहिजे. आधीच्या बाळंतपणामुळें आलेला थकवा व शरीराची झालेली झीज भरून निघण्यास वेळ लागतो. सर्वसाधारण स्त्रीच्या बाबतींत यासाठीं सुमारें दोन वर्षें लागतात. दोन वर्षांच्या अवधींत पहिलें मूल स्वतःचीं नित्यकर्में स्वतः करूं लागतें. त्याच्याकडे आईला फार लक्ष द्यावें लागत नाहीं. म्हणून दोन वर्षें हें पुरेसें अंतर मानतां येईल. पण आईची प्रकृति जास्त अशक्त असेल तर मग याहिपेक्षां अधिक कालावधि मध्ये गेलेला बरा.

प्रश्न ४था:–कुटुंबनियोजनामुळें वैवाहिक संबंधावर वाईट परिणाम होतो कां ?

उत्तर:–मुळीच नाहीं. उलट नको असलेल्या गरोदरपणाची भीति नसल्यामुळें पति-पत्नींचे संबंध अधिक चांगले, जिव्हाळ्याचे होतात. पति, वा पत्नी किंवा दोघांनाहि वाटत असलेल्या या भीतीमुळेंच लैंगिक संबंध एकमेकांना नाकारावेसे वाटतात–असें वाटल्यामुळेंच पति-पत्नींना भावनात्मक असुरक्षितता वाटते व अंतीं विवाहसौख्यास धोका उत्पन्न होतो. असें झाल्यानंतर मग त्यांचे अनिष्ट परिणाम मुलांवरहि होणारच. तेव्हा कुटुंबनियोजनामुळें वैवाहिक संबंधांवर वाईट परिणाम होण्याऐवजी चांगलाच परिणाम होतो.

प्रश्न ५वा:–शस्त्रक्रिया केव्हां करावी ? शस्त्रक्रियेनंतर कोणत्या प्रकारची काळजी घ्यावी ? शस्त्रक्रियेचे काय परिणाम होतात ?

उत्तर:–कुटुंबनियोजनाच्या मार्गांत शस्त्रक्रिया ही मुलांची संख्या मर्यादित करण्यासाठीं केली जाते. शस्त्रक्रिया पुरुषाची किंवा स्त्रीचीहि

होऊं शकते. शस्त्रक्रिया झाल्यानंतर मूल होत नाहीं. म्हणून शस्त्रक्रियेचा निर्णय घेण्यापूर्वी कांहीं गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत:–

(१) पतीचें वय ३५ वर्षांपेक्षां कमी असूं नये.

(२) पत्नीचें वय ३० वर्षांपेक्षां कमी असूं नये.

(३) शस्त्रक्रियेचा निर्णय घेतेवेळीं जोडप्याला कमींत कमी तीन मुलें (मुलगे व मुली दोन्ही मिळून) असावींत. त्यांपैकीं मोठा मुलगा आठ वर्षांचा असावा.

(४) शस्त्रक्रियेचा निर्णय घेतेवेळीं पति-पत्नींची प्रकृति व मुलांची प्रकृति पाहावी लागते.

(५) शस्त्रक्रियेचा निर्णय घेतांना नंतर मुलें होणार नाहीत हें पति-पत्नींना नीट समजावून द्यावें लागतें. शस्त्रक्रियेचा निर्णय हा पति-पत्नींच्या संमतीनें घेतला जावा. एकाचीहि जरी हरकत वा नाखुषी असेल तरी शस्त्रक्रिया होऊं नये आणि तोंपर्यंत म्हणजे संमति व तयारी होईपर्यंत पति-पत्नींनीं साधनें वापरावींत. कारण शस्त्रक्रिया झाल्यानंतर कुणालाहि (पतीला वा पत्नीला) पश्चात्ताप करण्याची पाळी येऊं नये. म्हणून पति-पत्नींची भावनिक तयारी झाल्यानंतरच शस्त्रक्रियेचा निर्णय निश्चित व्हावा. एकाच्याहि मनांत शंका, पूर्वग्रह, गैरसमजुती असल्यास त्या सर्व व्यवस्थितपणें दूर करून शस्त्रक्रियेची संपूर्ण माहिती देऊन मनांतील भीति, काळजी, त्रास गेला पाहिजे.

शस्त्रक्रियेची इच्छा दर्शविणाऱ्या जोडप्याचा विचार त्या जोडप्याची परिस्थिति व गुण यांवर व्हावा. "सब घोडे बारा टक्के–" या न्यायानें संकुचित विचार व शस्त्रक्रियेसंबंधीं निर्णय होऊं नये. शस्त्रक्रियेचा विचार केवळ लोकसंख्या-वाढ रोखण्याचें दृष्टीनें करावयाचा नसून शस्त्रक्रियेनंतर जीवन सुखी, समाधानी आनंदी, व्हावें ही तळमळ यामागें आहे. शस्त्रक्रियेनंतर जर कांहींचें जीवन विकलित, निराश, भग्न झालें तर अंतीं समाजाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीनें तें धोक्याचें व भयावह आहे. पुरुषाच्या शस्त्रक्रियेनंतर तीन महिने जरा जपून राहावें लागतें. म्हणजे या तीन महिन्यांच्या काळांत साधनें वापरून संभोग

घ्यावा लागतो. कारण शस्त्रक्रियेनंतर पुरुषाचें पुंबीज लगेच नष्ट होत नाहीं. कारण शस्त्रक्रिया ज्या ठिकाणीं केली जाते त्याच्या पुढील बाजूस वीर्याचा सांठा असतो. शस्त्रक्रियेपूर्वी त्या ठिकाणीं असलेल्या वीर्यांत पुंबीजें असणें शक्य आहे. म्हणून शस्त्रक्रियेनंतर दीड-दोन महिन्यांनीं डॉक्टरकडून वीर्याची तपासणी करून घ्यावी व त्यांत पुंबीजें नाहींत याची खात्री करून घ्यावी. पुंबीजें नाहींत याची खात्री करून घेतल्यानंतरच मग साधन-विरहित संभोग घ्यावा.

स्त्रीच्या बाबतींत शस्त्रक्रिया जरा कठीण व त्रासाची असते. शस्त्रक्रिया प्रसूतीनंतरच्या ३-४ दिवसांत करणें सुलभ व सोयीचें असतें. स्त्रीबीजें गर्भाशयांत नेणाऱ्या दोन नलिका असून ह्या त्या शस्त्रक्रियेंत शिवण्यांत येतात. ही शस्त्रक्रिया तज्ज्ञ शस्त्रवैद्याकडूनच करवून घ्यावयाची असते. शस्त्रक्रियेनंतर रुग्णालयांत १० दिवस विश्रांतीसाठीं राहावें लागतें आणि या विश्रांतीनंतर २-३ महिने फार श्रमाचें काम करणें इष्ट नसतें. म्हणजे विश्रांतीची आवश्यकता असते. पुरुषाची किंवा स्त्रीची शस्त्रक्रिया झाल्यानंतर पुरुषाच्या वा स्त्रीच्या प्रकृतीवर कांहीहि परिणाम होत नाहीं. गरोदर न होण्याशिवाय स्त्रीच्या नेहमीच्या दैनंदिन जीवनांत कोणताहि वाईट परिणाम होत नाहीं. पुरुषहि शस्त्रक्रियेनंतर फक्त प्रजोत्पादन करूं शकत नाहीं एवढाच फरक होतो. स्त्री-पुरुषांची कामवासना, परस्परांचें संभोगसुख वा समाधान यासंबंधीं वाईट परिणाम होत नाहीं. कसलीही उणीव भासत नाहीं.

महारोगी, मानसिक विकृतीचे रोगी, व असाध्य दुर्धर रोगानें पछाडलेले रोगी यांची शस्त्रक्रिया केलीच पाहिजे. चांगली प्रजा निर्माण व्हावी म्हणून वाईट प्रजानिर्मितीस प्रतिबंध बसला पाहिजे, असाहि एक विचार आहे, व तो योग्य आहे.

प्रश्न ६ वा-- कुटुंबनियोजनाचीं साधनें वापरल्यानें अनाकर्षण, तिटकारा किंवा संभोगाचा अतिरेक होण्याची भीति असते काय ?

उत्तर :-- कुटुंबनियोजनाचीं साधनें वापरल्यानें अशा प्रकारचे परिणाम होण्याची शक्यता नाहीं. साधनें वापरल्याने संभोगांत कसल्याहि

प्रकारची कमतरता किंवा उणीव राहात नाहीं. समाधान पूर्ण होतें. त्यामुळें अनाकर्षण किंवा तिटकारा वाटण्याचें कारण नाहीं.

साधनें वापरण्यापूर्वी मुलें होतील या भीतीनें जर पतिपत्नी संभोग टाळीत असले तर साधनें वापरायला सुरवात केल्यानंतर कांही काळ संभोगाचा अतिरेक होण्याची शक्यता आहे. पण तें फार काळ टिकत नाहीं. सर्वसाधारणपणें पतिपत्नींतले नित्याचे संभोग-संबंध सुरू होतात. केवळ साधनें वापरल्यानें संभोगाचा अतिरेक होण्याची शक्यता नाहीं.

* * *

परिशिष्ट

भारतीय लोकसंख्येच्या प्रश्नाशीं संबंधित अशी कांही उपयुक्त आंकडेवारी पुढे दिली आहे.

तक्ता क्र. १—भारताची लोकसंख्या: राज्यवार आकडेवारी

,, ,, २—भारताची लोकसंख्या: उद्योगानुसार वर्गीकरण

,, ,, ३—राज्यें व केंद्रशासित विभाग यांचे १९५१ सालीं असलेलें क्षेत्र व जनगणनेनुसार क्रम.

,, ,, ४—लोकसंख्यावाढीचे राज्यवार आंकडे

,, ,, ५—भारताची लोकसंख्या: वयोगट

,, ,, ६—भारताची लोकसंख्या: श्रमशक्ति

,, ,, ७—महाराष्ट्र राज्य: संकीर्ण आकडेवारी

,, ,, ८—महाराष्ट्रांतील लोकसंख्यावाढ

,, ,, ९—महाराष्ट्राची लोकसंख्या: जिल्हावर माहिती

,, ,, १०—महाराष्ट्राची लोकसंख्या: उद्योगानुसार वर्गीकरण.

संदर्भ ग्रंथ

1. Swastha Hind—Family Planning Number
   Vol. III No. 1 January 1959

2. Introduction to Family Planning—
   Family Planning Training and Reaserch Centre, Bombay 4 Demographic Training and Reaserch Centre, Bombay, 71.

3. Dr. V. K. R. V. Rao's speech at the Demographic Training and Research Centre, Bombay, 71.

४. कुटुंब योजना--भारतीय कर्करोग संशोधन केंद्र, मुंबई १२

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५८०७ वि: ललिंदर
क्रमांक २५१५ नों: दि: २५-८-८४

REFBK-0013092

तक्ता क्र. १

भारताची लोकसंख्या : राज्यवार आंकडेवारी
(१९६१ जनगणना)

राज्य /प्रदेश	क्षेत्र फळ चौरस मैल	लोक संख्या			वर्गीकृत जाती	वर्गीकृत जमाती	साक्षर	काम करणारे
		एकूण	पुरुष	स्त्रिया				
१ आंध्र प्रदेश	१,०६,२८६	३,५९,८३,४४७	१,८१,६१,६७१	१,७८,२१,७७६	४९,७३,५५४	१३,२४,३६८	७६,२६,५२७	१,८६,६३,०४२
२ आसाम	४७,०९१	१,१८,७२,७७२	६३,२८,१२९	५५,४४,६४३	७,३३,२०६	२०,६८,३६४	३२,४८,०५२	५१,३७,४११
३ बिहार	६७,१९६	४,६४,५५,६१०	२,३३,०१,४४९	२,३१,५४,१६१	६५,३६,८७५	४२,०४,७७०	८५,४७,८४५	१,९२,३४,५६५
४ गुजरात	७२,२४५	२,०६,३३,३५०	१,०६,३३,९०२	९९,९९,४४८	१३,६७,२५५	२७,५४,४४६	६२,८३,२५६	८४,७४,५८८
५ जम्मू काश्मीर	—	३५,६०,९७६	१८,९६,६३३	१६,६४,३४३	२,६८,५३०	—	३,९२,७६१	१५,२३,६२१
६ केरळ	१५,००२	१,६९,०३,७१५	८३,६१,९२७	८५,४१,७८८	१४,२२,०५७	२,०७,९९६	७९,१९,२२०	५६,३०,३३३
७ मध्य प्रदेश	१,७१,२१७	३,२३,७२,४०८	१,६५,७८,२०४	१५७,९४,२०४	४२,५३,०२४	६६,७८,४१०	५५,४४,८६२	१,६९,२९,१७७
८ मद्रास	५०,३३१	३,३६,८६,९५३	१,६९,१०,९७८	१,६७,७५९७५	६०,७२,५३६	२,५२,६४६	१,०५,८०,६१६	१,५३,५१,६२१
९ महाराष्ट्र	१,१८,७१७	३,९५,५३,७१८	२,०४,२८,८८२	१,९१,२४,८३६	२२,२४,९१४	२३,९७,१५९	१,१७,९३,०७८	१,८९,४८,४८१
१० म्हैसूर	७४,२१०	२,३५,८६,७७२	१,२०,४०,९२३	१,१५,४५,८४९	३१,१७,२३२	१,९२,०९६	५९,९०,५८५	१,०७,२६,३४६
११ ओरिसा	६०,१४६	१,७५,४८,८४६	८८,७०,५८६	८७,,७८,२६०	२७,६३,८५८	४२,२३,७५७	३८,०१,२४५	७६,६१,५२९
१२ पंजाब	४७,२०५	२,०३,०६,८१२	१,०८,९१,५७६	९४,१५,२३६	४१,३९,१०६	१४,१३२	४९,१७,३९६	७१,०१,१४६
१३ राजस्थान	१,३२,१५२	२,०१,५५,६०२	१,०५,६४,०८२	९५,९१,५२०	३३,५९,६४०	१३,०९,४४७	३०,६५,५६८	९५,८३,८४०
१४ उत्तर प्रदेश	१,१३,६५४	७,३७,४६,४०१	३,८६,३४,२०१	३,५१,१२,२००	१,५४,१७,२४५	—	१,२९,१३,१८३	२,८८,५०,१४१
१५ पश्चिम बंगाल	३३,८२९	३,४९,२६,२७९	१,८५ ९९,१४४	१,६३,२७,१३५	६९,५०,७२६	२०,६३,८८३	१,०२,२५,६६४	१,१५,८०,१९५
१६ अंदमान व निकोबार	३,२१५	६३,५४८	३९,३०४	२४,२४४	—	१४,१२२	२१,३७२	३१,१९४
१७ दिल्ली	५३७	२६,५८,६१२	१४,८९,३७८	११,६९,२३४	३,४१,५५५	—	१४,०२,२९८	८,५४,४५१
१८ हिमाचल प्रदेश	१०,८८५	१३,५१,१४४	७,०२,६९७	६,४८,४४७	३,६९,९१६	१,०८,१९४	२,३१,६६४	८,०५,४८७
१९ लखदीव मिनिकाय व अमिनदीवी बेटें	११	२४,१०८	११,९३५	१२,१७३	—	२३,३९१	५,६१०	१२,४४९
२० मणिपूर	८,६२८	७,८०,०३७	३,८७,०५८	३,९२,९७९	१३,३७६	२,४९,०४९	२,३७,२७६	३,५७,९२०
२१ त्रिपुरा	४,०३६	११,४२,००५	५,९१,२३७	५,५०,७७८	१,१९,७२५	३,६०,०७०	२,३१,१८८	४,३७,२२९
२२ दादरा आणि नगरहवेली	१८९	५७,९६३	२९,५२४	२८,४३९	१,१८४	५१,२६१	५,४९५	३७,७९४
२३ गोवा दीव आणि दमण	१,४२६	६,२६,९,७८	३,०२,९५३	३,२४,०२५	—	—	—	—
२४ नेफा	३१,४३८	३,३६,५५८	१,७७,६८०	१,५८,८७८	—	५,०४२	२४,२६०	२६ ,१६४
२५ नागालँड	६,३३६	३,६९,२००	१,९१,०२७	१,७८,९७३	१२६	३,४३,६९७	६६,११७	२,१९' ३१०
२६ पाँडेचरी	१८५	३,६९,०७९	१,८३,३४७	१,८५,७३२	५६,८६१	—	१,३८,१४९	१,३८'३७०
२७ सिक्किम	२,७४४	१,६२,१८९	८५,१९३	७६,९९६	७,२००	३७,१७०	१९,९९९	१,०३'९९८
भारत	११,७८,९९५	४३९२,३५,०८२	२२,६२,९३,६२०	२१,२९,४१४६२	६,४५,११,३१३	२,९८,८३,४७०	१०,५३,३३,२८१	१८,८४,१७'३६५

तक्ता क्र. २

भारतची लोकसंख्या : उद्योगानुसार वर्गीकरण (१९६१ जनगणना)

राज्य /प्रदेश	एकूण लोकसंख्या	काम करणारांची संख्या	शेतकरी (Cultivator)	शेत मजूर (Agricultural Labourer)	खाणी-पशु-पालन, मच्छिमारी इतर	घरगुती उद्योग	इतर उद्योग	काम	व्यापार (साठवण, इतर)	वाहतूक दळणवळण, इतर	इतर सेवा
१ आंध्रप्रदेश	३,५९,८३,४४७	१,८६,६३,०४२	७४,८६,८१९	५३,३६,४९४	५,६०,९५८	१८,१५,१५४	४,७५,६७५	,२५०	७,९८,१४७	२,३७,९६०	१७,३१,५८५
२ आसाम	१,१८,७२,७७२	५१,३७,४४१	३३,२३,५००	१,८७,४१६	५,१८,१००	२,८०,३५३	१,०३,६३४	,८३८	१,८४,७०७	७५,६१२	४,८४,२५१
३ बिहार	४,६४,५५,६१०	१,९२,३४५	१,०३,६१,९७१	४४,१८,४७५	६,५२,१८३	१०,५७,९००	४,२५,८९६	,३४२	५,२२,९४९	२,३०,५४३,	१४,५६,३०६
४ गुजरात	२,०६,३३,३५०	८४,७४,५८८	४५,१९,९६०	१२,५२,०००	१,०४,८५०	५,५५,६०६	५,३६,१५९	,०४३	४,११,१५६	१,५९,०६१	८,४६,६५३
५ जम्मू काश्मीर	३५,६०,९७६	१५,२३,६२१	११,५३,४०३	१८,४१७	२५,४७९	९५,६२८	३३,४५३	८,७३४	३३,६२०	१३,२३०	१,४१,६५७
६ केरळ	१,६९,०३,७१५	५६,३०,३३३	११,७८,१०३	९,७८,३९६	४,८७,३५९	४,८८,५६२	५,२९,४७२	०,७०२	३,२१,९३३	१,५२,५१३	१४,२३,२९३
७ मध्यप्रदेश	३,२३,७२,४०८	१,६९,२९,१७७	१,०६,११,५०८	२८,१५,२००	४,९२,२८७	८,४१,३९५	३,३६,८४५	२,२५८	३,८३,६३७	१,५७,९२०	१०,९८,१२७
८ मद्रास	३,३६,८६,५५३	१,५३,५१,६२१	६४,५७,८३३	२८,२८,३७४	४,३५,४९८	१२,०६,८१२	८,४८,३०२	५,३२७	७,५८,३०१	२,५३,६०१	२३,५७,५७३
९ महाराष्ट्र	३,९५,८३,७१८	१,८९,४८,४८१	८७,३७,०७५	४५,१०,००२	४,०९,३९१	८,३२,१६९	१३,०४,३३५	५,६१६	८,५६,०५०	६,७६,८१२	१६,१७,०३१
१० म्हैसूर	२,३५,८६,७७२	१,०७,२६,३३४	५८,०६,६६४	१७,६१,११०	३,३६,०७६	७,८८,७१०	४,२१,८८०	,८९,९३८	३,९१,०२०	१,०६,३१८	१०,०४,६३०
११ ओरिसा	१,७५,४८,८४६	७६,६१,५२९	२३,५३,०१२	१३,०३,५११	१,३१,९९६	५,३०,८०९	८६,१९७	३०,८५८	१,४७,४६२	५१,७१६	१०,२५,९६८
१२ पंजाब	२,०३,०६,८१२	७१,०१,१४६	३९,९६,७३१	५,४३,७९५	६६,१५०	५,४०,८४९	३,५४,०५८	१,४०,२४३	३,८५,५७१	१,४२,४७२	९,२१,३७७
१३ राजस्थान	२,०१,५५,६०२	९५,८३,८४०	७०,५५,०७९	३,९३,६३१	१,७१,०८१	५,९८,१८२	१,७२,०२५	१,०९,१६२	२,८८,१५७	१,१७,९०९	६,७८,६१४
१४ उत्तरप्रदेश	७,३७,४६,४०१	२,८८,५०,१४१	१,८४,२८,३७६	३२,६१,१७८	१,७१,८५९	१८,०१,७४६	८,००,८३५	२,१३,९१९	१०,६२,८८२	३,९९,२३५	२७,१०,०८१
१५ प. बंगाल	३,४९,२६,२७९	१,१५,८०,१९५	४३,५८,७७९	१७,७१,७०८	५,७७,८८१	४,८६,३११	१३,१९,१६०	१,५१,२९०	८,७२,२०४	३,९२,२२५	१५,४९,६३७
१६ अंदमान व निकोबार बेटें	६३,५४८	३१,१९४	६,४१५	३४८	७,२९३	४,६५९	१,१९४	५,४४२	१,०९०	४०३	४,३९५
१७ दिल्ली	२६,५८,६१२	८,५४,४५१	५,५४,०५८	७,३२५	८,६६६	१६,७१०	१,७०,३५४	३५,३६०	१,४६,७२७	४९,५६९	३,६४,३१२
१८ हिमाचल प्रदेश	१३,५१,८४४	८,०५,४८७	६,७०,५८९	१,१३,३३२	८,८९७	४४,८४९	६,७३५	१३,७१०	७,१७७	२,९२०	३९,२७८
१९ लखदिव, मिनी-कॉय व अमीन-दीव बेटें	२४,१०८	१२,४४९	१३९	—	५८३	१०,३०५	३७४	२३४	११२	१४९	५५३
२० मणिपूर	७,८०,०३७	३,५७,९२०	२,३४,१७८	२,१८४	८०५	७९,१६६	१,१०६	२,२३६	११,८८९	३,०३३	२३,३२३
२१ त्रिपूरा	११,४२,००५	४,३७,२२९	२,८०,८८१	३२,९१२	१२,१९३	२५,१५३	१०,८३९	४,१००	१८,५२१	४,७७९	४७,८५१
२२ दादरा व नगर-हवेली	५७,९६३	२७,७९४	२५,७१८	४,९४९	१,९९५	६०८	८५	३०८	२२६	१११	७१४
२३ गोवा, दिव व दमण	६,२६,९७८	—	—	—	—	—	—	—	—	—	—
२४ नेफा	३,३६,५५८	२६,१६४	१५३	१०	३४२	४७६	१७	१,७१७	४०७	८६९	२२,१७७
२५ नागालँड	३,६९,२००	—	१,९३,४८३	२,५०१	५१७	९५	६१९	३७५	१,२३७	७२४	१९,७५९
२६ पाँडेचरी	३,६९,०७९	१,३८,३७०	२२,०५४	३८,८०७	७,६७८	७,५०६	१७,३१७	३,६५९	१३,३५२	३,२७९	२४,७१८
२७ सिक्किम	१,६२,१८९	१,०३,९९८	९२,८६२	२,२३०	१८२	३७४	६८	१,७९२	१,६०६	१९७	४,६४७
भारत–	४३,९२,३५,०८२	१८,८४,१७,३६५	९,१५,०९,९१६	३,१४,८२,३०५	५१,९०,२९९	१,२०,३१,०८७	७९,५६,६१४	२०,५५,४४९	७६,४०,०४५	३०,०३,१९०	१,९५,४८,४१०

तक्ता क्र. ३

राज्यें व केंद्रशासित विभाग यांचे १९५१ सालीं असलेलें क्षेत्र व जनगणनानुसार क्रम.

राज्य किंवा प्रदेश	भारताच्या लोकसंख्येशीं प्रदेशाच्या लोकसंख्येची टक्केवारी	भारताच्या क्षेत्रफळाशीं प्रदेशाच्या क्षेत्राची टक्केवारी	क्षेत्रफळाच्या दृष्टीनें क्रम	१९५१ च्या लोकसंख्येनुसार क्रम
१ उत्तरप्रदेश	१६.८१	९.६५	४	१
२ बिहार	१०.५९	५.७१	८	२
३ महाराष्ट्र	९.०२	१०.०८	३	३
४ आंध्रप्रदेश	८.२०	९.०३	५	४
५ पश्चिम बंगाल	७.९६	२.८७	१३	५
६ मद्रास	७.६८	४.२७	१०	६
७ मध्यप्रदेश	७.३८	१४.५४	१	७
८ म्हैसूर	५.३८	६.३०	६	८
९ गुजरात	४.७०	६.१४	७	९
१० पंजाब	४.६३	४.०१	११	१०
११ राजस्थान	४.६०	११.२२	२	११
१२ ओरिसा	४.००	५.११	९	१२
१३ केरळ	३.८५	१.२७	१५	१३
१४ आसाम	२.७१	४.००	२२	१४
१५ जम्मू व काश्मीर	०.८१	— —	— —	१५
केंद्रशासित विभाग				
१६ दिल्ली	०.६१	०.०५	२२	१६
१७ हिमाचल प्रदेश	०.३१	०.९२	१६	१७
१८ त्रिपुरा	०.२६	०.३४	१९	१८
१९ मणीपूर	०.१८	०.७३	१७	१९
२० नागालँड	०.०८	०.५४	१८	२१
२१ पाँडीचरी	०.०८	०.०२	२४	२०
२२ नेफा	०.०८	२.६७	१४	२२
२३ सिक्कीम	०.०४	० २४	२१	२३
२४ अंदमान-निकोबार बेटें	०.०२	०.२७	२०	२४
२५ दादरा-नगरहवेली	०.०१	०.०२	२३	२५
२६ लखदीव बेटें	०.०१	०.००१	२५	२६

लोकसंख्यावाढीचे राज्यवार आंकडे (१९०१ ते १९६१)

राज्य	लोकसंख्या १९०१ (लक्ष)	लोकसंख्या १९६१ (लक्ष)	१९०१ ते १९६१ या साठ वर्षांतील वाढ (लक्ष)	१९०१ ते १९६१ या साठ वर्षांतील वाढ (टक्केवारी)	घनता (दरचौरस मैलीं लोकसंख्या) १९६१
१ आंध्र	१,९७	३,६०	१,६३	८८·७	३३९
२ आसाम	३७	१,१९	८२	२१९·४	२५२
३ बिहार	२,७३	४,६५	१,९२	७०·१	६९१
४ गुजरात	९१	२,०६	१,१५	१२६·८	२८६
५ केरळ	६४	१,६९	१,०५	१६३·८	११२५
६ मध्यप्रदेश	१,६९	३,२४	१,५५	९२·१	१८९
७ मद्रास	१,९३	३,३७	१,४४	७४·८	६७१
८ महाराष्ट्र	१,९४	३,९५	२,०१	१०३·७	३३२
९ म्हैसूर	१,३१	२,३५	१,०४	८०·४	३१८
१० ओरिसा	१,०३	१,७६	७३	७०·५	२९२
११ पंजाब	१,३३	२,०३	७०	५३·०	४३१
१२ राजस्थान	१,०३	२,०१	९८	९५·७	१५२
१३ उत्तर प्रदेश	४,८६	७,३८	२,५२	५१·७	६५०
१४ पश्चिम बंगाल	१,६९	३,५०	१,८१	१०६·४	१०३१
भारत*	२३,५०	४३,६४	२०,१४	८५·७	३८४

*टीप: भारताच्या आंकडेवारींत वरील चौदा राज्यांच्या आंकड्यांच्या बेरजेप्रमाणेंच जम्मू-काश्मीर व सर्व केंद्रशासित प्रदेश यांच्या आंकड्यांचाहि अंतर्भाव झालेला आहे.

तक्ता क्र. ५

भारताची लोकसंख्या. वयोगट (१९६१ जनगणना)

	वयोगट	एकूण लोकसंख्येशीं प्रमाण %
बालकें व लहान मुलें	० ते ४	१३·५
मुलें व मुली	५ ते १४	२४·८
तरुण स्त्री-पुरुष	१५ ते २४	१७·४
	२५ ते ३४	१५·६
मध्यमवयीन स्त्री-पुरुष	३५ ते ४४	११·९
	४५ ते ५४	८·५
वृद्ध स्त्री-पुरुष	५५ ते ६४	५·१
	६५ ते ७४	२·२
	७५ च्या वर	१·०
एकूण		१००·००

भारताची लोकसंख्या : श्रमशक्ति (१९६१ जणगणना)

सन	लिंग	काम करणारांचें एकूण लोक-संख्येशीं प्रमाण %	१५-५९ या वयोगटांतील लोकसंख्येचें एकूण लोक-संख्येशीं प्रमाण %	काम करणारांचें १५-५९ या वयोगटांतील लोक-संख्येशीं प्रमाण %
१९०१	एकूण	४६.६१	५९.०३	७८.९५
	पुरुष	६१.११	५८.९३	१०३.६८
	स्त्री	३१.७०	५९.१४	५३.६०
१९११	एकूण	४८.०७	६०.२३	७९.८१
	पुरुष	६१.९०	६०.३५	१०२.५६
	स्त्री	३३.७३	६०.११	५६.१३
१९२१	एकूण	४६.९२	५९.६४	७८.६५
	पुरुष	६०.५२	५९.८४	१०१.१३
	स्त्री	३२.६७	५९.४४	५४.९६
१९३१	एकूण	४३.३०	६०.१९	७१.९५
	पुरुष	५८.२७	६०.५९	९६.१७
	स्त्री	२७.६३	५९.७७	४६.२३
१९५१	एकूण	३९.१०	५७.०७	६८.४९
	पुरुष	५४.०५	५७.५५	९३.९०
	स्त्री	२३.३०	५६.५७	४१.१९
१९६१	एकूण	४२.९८	५४.४१	७८.९९
	पुरुष	५७.१२	५४.७७	१०४.२८
	स्त्री	२७.९६	५४.०३	५१.७४

तक्ता क्र. ७

महाराष्ट्र राज्य : संकीर्ण आंकडेवारी. (१९६१ जनगणना)

क्षेत्रफळ– १,१८,७१७ चौरस मैल (३,०६,३४६ चौरस किलोमीटर).

लोकसंख्या–	पुरुष	स्त्रिया	एकूण
ग्रामीण–	१,४२,३०,९३४	१,४१,६०,२२३	२,८३,९१,१५१
शहरी–	६१,९७,९४८	४९,६४,६१३	१,११,६२,५६१
एकूण–	२,०४,२८,८८२	१,९१,२४,८३६	३.९५,५३,७१८

दर चौरस मैली घनता– ३३३.

लिंगभेद–(दर हजार पुरुषांमागे स्त्रिया)–शहरी–८०१. ग्रामीण–९९५
एकूण महाराष्ट्र–९३६.

एकूण जिल्हे– २६
,, शहरें– २६६ (१० हजार पेक्षां अधिक वस्ती)
,, शहरें– १२ (एक लाखापेक्षां अधिक वस्ती)
,, खेडीं– ३५,८५१ (१० हजारपेक्षां कमी वस्ती)

साक्षरतेचें प्रमाण– स्त्रिया–१६.८% एकूण–३०.०%
पुरुष–४२.०%

तक्ता क्र. ८

महाराष्ट्रांतील लोकसंख्यावाढ [जिल्हावार]–१९५१–६१

१० वर्षांत १०% पर्यंत– रत्नागिरी.

" " ११% ते १५% –

" " १६% ते २०% –कुलाबा, जळगांव, अमरावती, यवतमाळ, वर्धा, परभणी, चांदा, भंडारा.

" " २०% ते २५% –सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, उस्मानाबाद, बीड, नांदेड, बुलढाणा, अकोला.

" " २६% ते ३०% –पुणें, ठाणें, नाशिक, नगर, औरंगाबाद धुळें.

" " ३०%हून अधिक–महामुंबई.



तक्ता क्र. ९

महाराष्ट्राची लोकसंख्या : जिल्हा

जिल्हा	क्षेत्रफळ चौरसमैल	लोकसंख्या एकूण	पुरुष	स्त्रिया
१) मह-मुंबई	१८६	४१,५२,०५६	२४,९६,१७६	१६,५५,८८०
२) ठाणें	३,६५८	१६,५२,६७८	८,६१,११७	८,९१,५६१
३) कुलाबा	२,७१६	१०,५८,८५५	५,१४,५३४	५,४४,३२१
४) रत्नागिरी	५,०२५	१८,२७,२०३	८,१६,८०४	९,१०,३९९
५) नाशिक	६,०२०	१८,५५,२४६	९,५३,५३१	९,०१,७१५
६) धुळें	५,०२२	१३,५१,२३६	६,८६,९४२	६,६४,२९४
७) जळगांव	४,५७३	१७,६५,०४७	९,०२,००१	८,६३,०४६
८) अहमदनगर	६,५८६	१७,७५,९६९	९,०५,३१३	८,७०,६५६
९) पुणें	६,०३३	२४,६६,८८०	१२,६८,७१०	११,९८,१७०
१०) सातारा	४,०४१	१४,३०,१०५	६,९८,५५५	७,३१,५५०
११) सांगली	३,२९९	१२,३०,७१६	६,२८,७५४	६,०१,९६२
१२) सोलापूर	५,८०९	१८,६०,११९	९,६०,६५५	८,९९,४६४
१३) कोल्हापूर	३,१४१	१५,७६,४९३	८,११,६९३	७,८४,८८०
१४) औरंगाबाद	६,३१४	१५,३२,३४१	७,८१,६३५	७,५०,७०६
१५) परभणी	४,८५४	१२,०६,२३६	६,११,७८७	५,९४,४४९
१६) बीड	४,२६८	१०,०१,४६६	५,०८,८२७	४,९२,६३९
१७) नांदेड	४,८००	१०,७९,६७४	५,४७,९७४	५,३१,७००
१८) उस्मानाबाद	५,५०४	१४,७७,६५६	७,५८,२३५	७,१९,४२१
१९) बुलडाणा	३,७५१	१०,५९,६९८	५,४१,०२६	५,१८,६७२
२०) अकोला	४,०९५	११,८९,३५४	६,१३,८३२	५,७५,५२२
२१) अमरावती	४,७२३	१२,३२,७८०	६,३७,८६१	५,९४,९१९
२२) यवतमाळ	५,२४६	१०,९८,४७०	५,५७,०१०	५,४१,४६०
२३) वर्धा	२,४२९	६,३४,२७७	३,२२,८९४	३,११,३८३
२४) नागपूर	३,८४२	१५,१२,८०७	७,८४,१६१	७,२८,६४६
२५) भंडारा	३,५८२	१२,६८,२८६	६,३५,१७४	६,३३,११२
२६) चांदा	९,२००	१२,३८,०७०	६,२३,६८१	६,१४,३८९
महाराष्ट्र राज्य	१,१८,७१५	३,९५,५३,७१८	२,०४,२८,८८२	१,९१,२४,८३६

वार माहिती (१९६१ जनगणना)

वर्गीकृत जाती	वर्गीकृत जमाती	साक्षर	काम करणारे
१,२३,५२७	२२,४५५	२४,३३,२०४	१६,८६,६६८
२२,७२२	५,००,५५८	५,०४,७०५	७,७७,७५६
१३,८८७	९५,३५४	२,६०,०८१	४,९५,८२५
३७,९३९	३,१०१	५,२०,५३८	८,२०,७७६
६७,८४५	४,५३,७०७	४,९८,९०६	९,१४,०५७
४८,०५४	५,१३,३४४	३,३९,७९३	६,३८,८४८
६१,३१९	९८,७१०	६,००,३४४	८,१३,३७३
१,५७,५००	१,०९,८२७	४,६९,७२९	८,९२,८०१
१,२१,२३७	९०,३३३	८,४६,४००	१०,५३,१४३
७,७४,८७५	२,४१७	४,८५,९२९	६,९२,४९५
१,०२,०८०	५९५	३,४५,४७९	५,३१,४७८
२,३८,८६३	९,०८९	४,६७,७५९	८,१५,२५३
१,८१,७७९	१,५१८	४,१९,८९६	७,२८,५३१
९२,७१५	२४,४५५	२,७३,९७५	८,१०,८२४
८३,९७६	३४,८३८	१,८५,४४८	६,५४,२७४
१,३५,२७२	२,३६९	१,१५,१३९	५,४२,०४५
१,१८,८७९	४०,५१७	१,६३,५००	५,६३,१७०
१,१७,८९२	३९६	२,५२,०१४	७,६९,३१९
५६,२१४	—	२,८६,०५०	५,४३,५८६
५५,८६६	—	३,७१,०८३	५,८५,२६१
४८,७०२	५४,९११	४,१५,२३८	५,७८,०७३
४२,५२३	१,५५,६०९	२,५७,८८२	५,९५,०६०
१५,१४३	—	१,९३,११४	३,१६,६३८
५४,३८८	—	५,२१,७४३	७,०२,९७०
२१,०७४	—	३,०५,२८६	७,४०,९८७
४२,६४३	१,८३,४३१	२,१३,८३५	७,१५,२६०
२२,२६,९१४	२३,८७,१५९	१,१७,९३,०७०	१,८९,४८,४८१

तक्ता क्र. १०

महाराष्ट्राचो लोकसंख्या: उद्योगा

	जिल्हा	एकूण लोक संख्या	काम करणारांची संख्या	शेतकरी	शेतमजूर
१	महा-मुंबई	४१,५२,०५६	१६,८६,६६८	४,८४०	१,९४९
२	ठाणें	१६,५२,६७८	७,७७,७५६	२,८३,१५६	१,१८,२७७
३	कुलाबा	१०,५८,८५५	४,९५,८२५	३,२९,५६७	०,५४,०३३
४	रत्नागिरी	१८,२७,२०३	८,२०,७७६	६,१६,४१७	४९,९७६
५	नाशिक	१८,५५,२४६	९,१४,०५७	४,९१,४३२	१,८०,७९५
६	धुळें	१३,५१,२३६	६,३८,८४८	२,९४,२२७	२,३२,९१३
७	जळगांव	१७,६५,०४७	८,१३,३७३	३,४६,०२२	२,९५,८२७
८	अहमदनगर	१७,७५,९६९	८,९२,८०१	५,२४,३४५	१,९६,१०७
९	पुणें	२४,६६,८८०	१०,५३,१४३	५,५७,५८३	९७,७९३
१०	सातारा	१४,३०,१०५	६,९२,४९५	४,८५,३०७	७६,९५८
११	सांगली	१२,३०,७१६	५,३१,४७८	३,५२,७१८	७२,१९९
१२	सोलापूर	१८,६०,११९	८,१५,२५३	३,५५,१०१	२,११,३८१
१३	कोल्हापूर	१५,७६,४९३	७,२८,५३१	४,६७,६४३	१,०५,३६७
१४	औरंगाबाद	१५,३२,३४१	८,१०,८२४	४,२७,५१९	२,४२,३५५
१५	परभणी	१२,०६,२३६	६,५४,२७४	२,५८,०५८	२,४०,९८२
१६	बीड	१०,०१,४६६	५,४२,०४५	२,८८,००९	१,६१,२८६
१७	नांदेड	१०,७९,६७४	५,६३,१७०	२,४८,०६५	२,०२,४१७
१८	उस्मानाबाद	१४,७७,६५६	७,६९,३१९	३,५८,९५०	२,८३,५८४
१९	बुलडाणा	१०,५९,६९८	५,४३,५८६	२,३१,१२१	२,२८,४२९
२०	अकोला	११,८९,३५४	५,८५,२६१	१,९९,८२८	२,७६,१८८
२१	अमरावती	१२,३२,७८०	५,७८,०७३	१,५९,८३३	२,९८,२३५
२२	यवतमाळ	१०,९८,४७०	५,९५,०६०	२,०३,५९४	३,०३,९३७
२३	वर्धा	६,३४,२७७	३,१६,६३८	१,०७,१४७	१,३७,६५७
२४	नागपूर	१५,१२,८०७	७,०२,९७०	२,२४,९४७	१,५२,८२३
२५	भंडारा	१२,६८,२८६	७,४०,९८७	४,१३,८१७	१,१९,२६०
२६	चांदा	१२,३८,०७०	७,१५,२६०	४,०७,८२९	१,७९,२४४
	महाराष्ट्र राज्य	३,९५,५३,७१८	१,८९,४८,४८१	८७,३७,०७५	४५,१०,००२

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३९९०० दि: २६.७.८५
क्रमांक ७५१५ बी दि: १५-९-८५

समाज प्रबोधन संस्था

राजकीय

१.	लोकशाहीचा कारभार	–सदाशिव आठवले.	रु. २.००
२.	राजकीय पक्षांसाठी आचारसंहिता (संकलित निबंध)		रु. २.००
3.	Code of Conduct for Political Parties (A Symposium)		रु. २.००
४.	राजकीय पक्षांसाठी आचार संहिता : अहवाल	–पन्नालाल सुरा	
५.	लोकमत	–सदाशिव आठव	

आर्थिक

१.	आर्थिक विकासाचा प्रश्न [दुसरी आवृत्ति]	–दे. अ. दाभोलकर	रु. १.५०
२.	भारतीय शेती	–स. ह. देशपांडे	रु. २.६०
३.	लोकसंख्येचा प्रश्न	–ज. शं. आपटे.	रु. २.००

वैज्ञानिक

१.	विश्वरचना	–ना. वा. कोगेकर	रु. १.२५
२.	अंतरीक्ष प्रवास	–ना. वा. कोगेकर.	रु. २.००

संकीर्ण

१.	आपला महाराष्ट्र	–पन्नालाल सुराणा.	रु. २.५०
२.	अपंगत्वावर विजय	–उषा मोहनी	रु. २.६०
३.	व्यक्तिमत्त्वाचा विकास	–ग. वि. अकोलकर	रु. २.६०

आगामी

१.	कृषि औद्योगिक अभ्यास योजना	–अहवाल.
२.	शास्त्रीय विचारपद्धति	–अ. भि. शहा.
३.	सहकार : तत्त्व व व्यवहार	–गो. स. कामत.

सभासद–ग्राहक–योजनेच्या सभासदांना २५ टक